म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. १०२६



# भगिनी निवेदिता

REFBK-0011591

नायक कुलकर्णी

अनुक्रमांक 32८९3 वि: चरित्र
क्रमांक 9०2६ नो: दि: ४/9/६

# भगिनी निवेदिता

## संक्षिप्त चरित्र व कार्य

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. ११५९

लेखक

**काशिनाथ विनायक कुलकर्णी**

REFBK-0011591
REFBK-0011591

किंमत साडेतीन रुपये

१९६१

© काशिनाथ विनायक कुलकर्णी

प्रथम मुद्रण :
१९ ऑक्टोबर १९६१
२७ आश्विन १८८३

मुद्रक : वा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई २
प्रकाशक : का. वि. कुलकर्णी, हरदासवाडी, पो० कल्याण, जि० ठाणें
प्रमुख विक्रेते : श्रीसमर्थ ग्रंथ भवन, बनाम हॉल लेन, मुंबई ४

# निवेदन

भगिनी निवेदितांचे जीवनाचा परिचय लेखकास श्रीरामकृष्ण परमहंस – विवेकानंद वाङ्मयामार्फत झाला व मराठींत असें चरित्र उपलब्ध नाहीं असें आढळून आल्यामुळें तें वाचकांपुढें मांडण्यांत येत आहे.

समाजाच्या कोणत्याही क्षेत्रांत संघटना व विघटना यांचा झगडा चालू असतांना त्यागावर आधारलेलीं जीं शाश्वत जीवनमूल्यें नवचैतन्य उत्पन्न करून समाजाचे सर्वांगीण उन्नतीस उपयोगी ठरतात त्यांचें दर्शन या चरित्रांत होत असल्यानें आज पन्नास वर्षांनंतरसुद्धां त्याची उपयुक्तता अबाधित आहे.

आधारभूत अशी माहिती मुख्यतः ज्या ग्रंथांतून घ्यावी लागली त्यांचा उल्लेख पुस्तकाचे शेवटीं कृतज्ञतापूर्वक करण्यांत येत आहे.

तयार झालेलें' हस्तलिखित पाहून त्यांत उपयुक्त सुधारणा सुचविण्याचें तसेंच 'पुरस्कार' लिहून देण्याचें काम श्री. केशव बाळकृष्ण जोशी, सॉलिसिटर, यांनीं अत्यंत आत्मीयतेनें केलें याबद्दल लेखक त्यांचा ऋणी आहे.

भगिनींच्या हस्ताक्षरांतील त्यांचें एक पत्र 'प्रबुद्ध भारत' मासिकांत पूर्वी आलें होतें तें जसेंच्या तसें या पुस्तकांतून प्रसिद्ध करण्यास प्रकाशकांनीं उदार मनानें त्वरित अनुमति दिली याबद्दल लेखक उपकृत आहे.

छपाईचें काम पूर्ण सौजन्यानें व सहकारी वृत्तीनें वेळेवर करून दिलें याबद्दल कर्नाटक मुद्रणालयास धन्यवाद.

लेखक

हरदासवाडी

पो. कल्याण

१९-१०-६१

# पुरस्कार

मनुष्याला या आयुष्यांत फुलें वेचण्याचा योग यावा यासारखें सद्‌भाग्य नाहीं. " माझ्या इंग्लंडमधील कार्याचे रोपास जीं फुलें आलीं त्यांतील सर्वोत्कृष्ट फूल म्हणजे भ. निवेदिता " * आशा आपुलकीच्या, भावनात्मक व गोड शब्दांत ज्यांच्या कार्याचा गौरव स्वामी विवेकानंद यांनीं केला, त्या भगिनी निवेदितांचें संक्षिप्त चरित्र व कार्य मराठी वाचकांना उपलब्ध व्हावें या हेतूनें माझे मित्र श्री. का. वि. कुलकर्णी यांनीं हें छोटेसें पुस्तक लिहिलें आहे. ऑक्टोबर १८९५ च्या सुमारास स्वामीजी विलायतमध्यें असतांना त्यांचीं जीं प्रभावी व्याख्यानें झालीं त्या व्याख्यानांस श्रोते म्हणून कु. मार्गारेट् नोबल् ( भावी भगिनी निवेदिता ) या जात होत्या. आपल्या भावी आयुष्याचें ध्येय ठरविण्याच्या बाबतींत त्यांच्यावर, स्वामीजींचें महान व भव्य व्यक्तिमत्व ( dynamic personality ), त्यांचें जोरदार, अर्थपूर्ण व लोहचुंबकाप्रमाणें आकर्षक असें वक्तव्य, त्यांचें इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व व भाषणाचा अस्खलित ओघ व यांहींपेक्षां विशेष म्हणजे त्यांचें निष्काम, निर्भीड, निर्भय, निरहंकार व अत्यंत विद्वत्ताप्रचुर असें कार्यकर्तृत्व या सर्व गुणांचा सखोल परिणाम झाला व कु. नोबल् यांनीं स्वामीजींचें शिष्यत्व पतकरण्याचा निश्चय केला. त्यांचीं सर्व व्याख्यानें त्यांनीं काळजीपूर्वक ऐकलीं व त्यांतील विषयांचें मनन केलें, इतकेंच नव्हे, तर त्यांवर निदिध्यास केला. शेवटीं सत्संग हाच तरणोपाय हें जाणून कु. नोबल् या विलायत सोडून

---

* " Nivedita is the fairest flower of my work in England"
— Swami Vivekanand

घरादाराचा मोह बाजूला सारून भारतांत आल्या, त्यांनीं आपलें उर्वरित सर्वस्व व सर्व आयुष्य भारताच्या सेवेंत खर्च केलें व त्या स्वामीजींच्या परमाशिष्या अखेरपर्यंत राहिल्या. खरोखर स्वामी विवेकानंद म्हणजे महासागराप्रमाणें रत्नांची खाणच होत. पण विशेष हा कीं 'सागराबाहेरील किंवा महासागरापलीकडील रत्नेंही त्यांनीं जमा केलीं हें भारताचें महाभाग्य होय व यायोगें त्यांनीं भारताचा महाभारत केला. किंबहुना स्वा. विवेकानंद हे मूर्तिमंत क्षीरोदधि होते व भाविक उपमन्यूंची भूक त्यांनीं पीठ-पाण्यावर न भागवितां शिकवणरूपी महान् दुग्धामृत त्यांना उपलब्ध करून दिलें आहे. "सर्वोपनिषदो गावो, दोग्धा गोपालनंदनः ...." या श्लोकांत म्हटल्याप्रमाणें स्वामीजींची जिवंत वाणी ही खरोखरच भ. निवेदिता यांना मृत्युंजय संजीवनीमात्राच झाली.

स्वामीजींच्या खऱ्या सत्संगतीचा परिणाम त्यांच्यावर किती झाला व त्यांच्याविषयीं त्यांच्या मनांत किती आदरभाव होता याची साक्ष भगिनींनीं स्वतः लिहिलेलें "The Master as I saw Him" हें पुस्तक व त्यांचें दुसरें पुस्तक "Notes on some wanderings with Swami Vivekananda" हे दोन ग्रंथच देत आहेत. भ. निवेदिता यांनीं स्वामीजींना गुरु असेंच मानलें होतें व या गुरु-शिष्य नात्यानें भगिनींनीं ज्याप्रमाणें स्वतःस धन्य केलें व स्वतःचें सर्व आयुष्य त्यांनीं स्वामीजींच्या चरणीं वेचलें, त्याचप्रमाणें त्यांनीं स्वामीजींच्या 'ध्येयास'– नव्हे, हिंदु संन्याशाच्या ( स्वामीजींस The Hindu monk of India असें संबोधीत असत ) ध्येयास – नव्हे वेदांतशास्त्राच्या परमपवित्र व अत्यंत उच्च ध्येयास – मूर्तस्वरूप आणलें. आद्य शंकराचार्य व त्यांचे शिष्य निवृत्तिनाथ-ज्ञानेश्वर, भगवान् श्रीकृष्ण व अर्जुन ( नरनारायण ), भगवान् रामकृष्ण व स्वामी विवेकानंद वगैरे गुरुशिष्यांच्या अलौकिक जोड्यांप्रमाणेंच स्वा. विवेकानंद व भगिनी निवेदिता ही गुरुशिष्यांची जोडी अलौकिक होती. किंबहुना अशी विलक्षण जोडी पूर्वी झाली नाहीं व पुढेंही

कदाचित् होणार नाहीं. गुरु भारतीय तर शिष्य विलायती, गुरु पुरुष तर शिष्य स्त्री, गुरु पवित्र संन्यासी तर शिष्या व्यवहारांतली – अशा या जोडीचें जगतांतील कार्य खरोखरच धन्य होय व त्यांच्या दोघांच्याही कार्याचें वर्णन करण्यास शब्द अपुरेच पडतील. भगवद्गीतेंत म्हटल्याप्रमाणें "परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ" किंवा "सूत्रे मणिगणा इव" प्रमाणें सुवर्णसूत्रांत रत्नमणि असा हा योग आहे; किंवा सुवर्णाच्या अंगठींत हिरा किंवा सुवर्णसूत्रांत हिऱ्याची कुडी असा हा सर्वांगसुंदर योग आहे.

भगिनी निवेदिता यांचीं जीवनपृष्ठें अत्यंत वाचनीय व उद्बोधक आहेत. पण त्यांचें चरित्र व थोर कार्य यांची मराठींत उपलब्धि फारच कमी आहे. यामुळें श्री. कुलकर्णी यांना भ. निवेदितांचें चरित्र लिहिण्याची स्फूर्ति झाली. अध्यात्माची अत्यंत आवड असली तरी सामान्य आर्थिक परिस्थितीच्या मनुष्यास पुस्तक लिहिणें व तें स्वतःच्या खर्चानें छापून घेणें किती अवघड आहे हें मराठी माणसास सांगण्याची जरुरी नाहीं. प्रसूति-वेदना किंवा प्राकृत भाषेंत बाळंतपण म्हणतात तसा आयुष्यांतील हा एक "पण" आहे. परंतु श्री. कुलकर्णी यांनीं स्वामीजींवरील निष्ठेनें हें कार्य घेतलें व शेवटास नेलें हें त्यांना भूषणावह आहे. भ. निवेदिता यांच्या चरित्र व कार्याची हस्तलिखित प्रत तयार करून त्यांनीं आम्हांस दाखवली व कांहीं सूचना केल्या त्या त्यांना पसंत पडून त्यांनीं पुस्तक लहान असलें तरी आकर्षक व शक्य तेवढें उपयुक्त केलें आहे. वास्तविक भगिनींच्या दीर्घप्रयत्नांतील व सर्व आयुष्यांतील सर्वच भाग महत्त्वाचा आहे, कारण त्यांचें सर्व आयुष्य सेवेंत व सार्वजनिक कार्यांत गेलें. या दृष्टीनें त्यांच्या आयुष्यांतील प्रत्येक क्षणाची माहिती महत्त्वाची आहे. भगिनींच्या आयुष्याशीं संबंध आलेलीं अशीं अनेक मोठीं माणसें होतीं – कविवर्य रवीन्द्रनाथ टागोर, महायोगी अरविंद घोष, सर जदुनाथ सरकार, श्री. मोतीलाल घोष, सर राशबिहारी घोष, श्री. रामानंद चतर्जी, श्री.

बिपिनचंद्र पाल, माताजी शारदादेवी, स्वामीजी व त्यांचे इतर सहकारी, स्वामीजींच्या इंग्रजी व अमेरिकन शिष्या व इतर शिष्य–या सर्वांशीं भगिनी निवेदिता यांचा आलेला संबंध व त्यांची हकीकत वाचकांपुढें येणें अत्यंत आवश्यक आहे. अशा तऱ्हेचें संशोधन करून जर भगिनींचें विस्तृत चरित्र लिहिण्याचें मनांत आणलें तर शक्य आहे – नव्हे तें अत्यंत आवश्यक आहे. स्वा. विवेकानंद यांचे अमेरिकेंतील जीवन या विषयावर " New discovery " हें पुस्तक एका आंग्ल युवतीनें अलीकडे लिहिलें आहे तें वाचकांनीं पाहावें म्हणजे याची कल्पना येईल.

सध्याच्या संदेहवादी युगांत तेजोमय व प्रत्यक्ष जिवंत अशा धर्माचें उदाहरण स्वामीजींचेंच आहे व हेंच एकमेव उदाहरण आधुनिक पूर्व-पश्चिम व दक्षिणोत्तर जगांतील सुशिक्षितांवर परिणाम करणारें असें आहे. त्यांच्या अत्यंत निकटवर्ती सहवासांत अनेक वर्षें राहिलेल्या भ. निवेदिता यांनीं स्वामींचें चरित्रही अत्यंत उज्ज्वल केलें. स्वामीजी स्वत: विचिकित्सक दृष्टीचे ( Rational minded ) होते व त्यांच्या या गुणाचा परिणाम भगिनींच्यावर नकळत झाला. त्याही अधिक स्वार्थत्यागी, स्पष्टवक्त्या, कष्टाळू, सरळ, निर्भीड व प्रेमळ स्वभावाच्या झाल्या. या शिष्याची घडण स्वामीजींनीं इतकी अपूर्व अशी केली कीं त्यांचें सर्व जीवन स्वार्थत्यागी व सेवामय झालें.

समर्थ रामदासांनीं मनाचे श्लोकांत जीवन कसें कंठावें याचा सखोल व उत्कृष्ट असा आदर्श दिला आहे. " मरावें परी कीर्तिरूपें उरावें ", " मना जे घडी राघवावीण गेली । तुवां ते घडीं आपुली हानि केली " वगैरे त्यांच्या उक्ति स्वा. विवेकानंद व भ. निवेदिता या दोघांच्याही चरित्रास लागू आहेत. सत्संगतीचा महिमा अगाध आहे. लोखंडाचेंही सोनें करण्याची शक्ति परीस या धातूंत आहे. त्याप्रमाणें स्वामीजींचें शिष्यत्व पतकरून सर्वस्वत्याग ( नव्हे देश-त्यागसुद्धां ) करून भ.

निवेदिता यांनीं आपलें आयुष्य अजरामर केलें व पूर्व व पश्चिम या जगांत त्यांनीं सन्मान मिळवला. अशा भ. निवेदितांचें चरित्र वाचकांस आकर्षक होईल अशी आशा आहे.

भ. निवेदिता यांचा आपल्या गुरुविषयीं इतका थोर भाव होता कीं त्या सहजासहजीं त्यांचा उल्लेख करण्यासही धजत नसत, पण त्यांच्या पुस्तकांतून व कृतींतून मात्र तो आदर पदोपदीं आढळून येत असतो. स्वामीजीसुद्धां इंग्लंड व अमेरिकेंत असतांना भगवान श्रीरामकृष्णाविषयीं फारच आदरानें व अत्यंत थोडा उल्लेख करीत असत – न जाणों, नाहींतर त्यांच्या योग्यतेला, चुकून प्रमाद घडून, धक्का बसेल या भीतीनें – व त्यांनीं फक्त एका व्याख्यानांत "माझे गुरुदेव" याविषयीं माहिती दिली. तद्वतच भ. निवेदिता यांची स्थिति होती.

स्वामीजींचा खणखणीत आवाज, त्यांचा पवित्र संदेश, त्यांची विषय-प्रतिपादनाची शैली, त्यांचा गाढ व्यासंग, विद्वत्ता, अगाध वाचन व नितांत परिश्रम करण्याची संवय या सर्व गुणसमुच्चयांचा परिणाम पूर्वेपेक्षांही पश्चिमेवर जास्त झाला व ते लोक अक्षरशः स्वामीजींवर मोहून गेले. तेव्हांपासून पश्चिमेकडील लोकांचा ओघ अध्यात्माच्या शोधार्थ पूर्वेकडे वाहात आहे. स्वामीजींनीं पूर्व–पश्चिम यांतील महान अंतर नष्ट केलें तसेंच सुशिक्षित व अशिक्षित, स्त्री व पुरुष, निरनिराळ्या जाती व धर्म वगैरे भेद नष्ट करून वेदांताचा झेंडा अटकेपार नेला व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय व जागतिक दिगंत कीर्ति मिळवून सर्व देशांतील मानव-जातीचें ऐक्य प्रस्थापित केलें. आंग्लशिष्या भ. निवेदिता यांनींही या बाबतींत पायंडा घालून नेतृत्व केलें याला विशेष महत्त्व आहे.

आम्ही विलायतमध्यें कांहीं महिने सहकुटुंब मुलांसहित प्रवास केला आहे व मानवी मूल्यें, मानवी आकांक्षा, मानवी प्रेम, मानवी वात्सल्य, मानवी आदर व आदरातिथ्य या सर्व बाबतींत सर्व मानवजात एक आहे,

अभेद्य आहे, असाधारण आहे याचा अनुभव आम्हांस प्रत्यक्ष आला आहे. वेदांताचें खरें आचरण ( Practical Vedanta ) मानवी सेवेनें कृतींत आणतां येतें याचें उज्ज्वल उदाहरण म्हणजेच स्वामीजी व भ. निवेदिता ही गुरुशिष्यांची जोडी होय. तेव्हां भगिनींचें हें छोटेसें चरित्र लिहिल्याबद्दल माझे मित्र श्री. कुलकर्णी अभिनंदनास पात्र आहेत व त्यांच्या पुस्तकाचा गौरव होईल अशी आशा आहे. तसेंच भगिनींच्या आयुष्यांतील धागेदोरे पाहून त्यांची उत्कृष्ट ध्येयनिष्ठा, त्यांचा सत्संगतीचा हव्यास, त्यांचा स्वार्थत्याग इत्यादि सद्‌गुणसमुच्चय अधिकाधिक जनतेपुढें येतील असे प्रयत्नही व्हावेत अशी मी आशा करतों.

*केशव बाळकृष्ण जोशी*
एम्. ए., एल्एल्. बी.,
सॉलिसिटर

प्लॉट नं. १६५, कपिलतीर्थ,
शिवाजी पार्क, रोड नं. ५,
दादर, मुंबई १४,
२३–७–६१

अनुक्रम ३९८९३ वि: चरित्र...
क्रमांक १०२६ नों: दि: ४।१।६२

# अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| निवेदन | ३ |
| पुरस्कार | ५ |
| भाग १– प्रास्ताविक | १३ |
| भाग २– पूर्वचरित्र ( इ. स. १८६७ ते १८९७ ) | १७ |
| भाग ३– भारताचा परिचय ( १८९७–९८ ) | ३१ |
| भाग ४– प्राथमिक तयारी ( १८९८ ते १९०२ ) | ४८ |
| भाग ५– सर्वांगीण कार्याचा पाया ( १९०२–०३ ) | ६५ |
| भाग ६– कार्याची धुमश्चक्री ( १९०३ ते १९०७ ) | ७२ |
| भाग ७– शांतताकाळांतील कार्य ( १९०७ ते १९११ ) | ९७ |
| भाग ८– कृतज्ञता | ११८ |
| ग्रंथरूपी वाङ्मय | १२५ |
| विषयसूचि | १२६ |
| आधारभूत वाङ्मय ( संदर्भ ग्रंथ ) | १३१ |

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३८ | ६ | पाडण्यासुद्धां | पाडण्याससुद्धां |
| ३९ | १० | protest | protect |
| ४५ | टीप ओळ १ | प्राचीत | प्रचीत |
| ६० | १३ | केला | केला " |
| ६७ | ३ | विश्रतच | विश्रुतच |
| ९२ | ४ | बुद्धिजीवनाशीं | बुद्धजीवनाशी |
| १०७ | टीप ओळ ५ | much | much. |
| १०९ | ८ | नंतरच्य | नंतरच्या |
| १११ | माथ्यावरची | ११ | १११ |
| ११५ | खालून ५ | भरताचा | भारताचा |
| ११६ | १८ | पणा आहे | पणा ) आहे. |



भगिनी निवेदिता

दा. क्र. १५१९

# १ : प्रास्ताविक

कांहीं विषय मूलतःच इतके पवित्र असतात कीं केव्हांही त्यांचें स्मरण झालें तरी आदराची भावना उत्पन्न होते. हिंदवासीयांची भारताबद्दल हीच भावना अनादिकालापासून आहे. विसाव्या शतकाचा प्रारंभीचा कालखंड परतंत्र भारतास अत्यंत खळबळीचा व उत्क्रांतीचा असा गेला व प्रस्तुत जीवनचरित्र या काळचें भारताचे पार्श्वभूमीवरचें असल्यानें प्रत्येकाला आकर्षून घेतल्याशिवाय राहणार नाहीं.

ब्रिटिशांचें हिंदुस्थानावरील साम्राज्य स्थिर झालें होतें व ब्रिटिश नोकरशाहीच्या पोलादी चौकटीपुढें शरीरानेंच नव्हे तर मनानें सुद्धां जो तो नम्र होत होता. तिच्या सन्मानार्थ हिंदुस्थानांत दरबारांवर दरबार भरत होते व कितीतरी कवींनीं हिंदुस्थानच्या सर्व भाषांतून ब्रिटानियाचे व व्हिक्टोरिया राणीचे गोडवे गाऊन स्वतःस धन्य असें मानलें होतें. शाळेंतील बालवर्गांतील पहिला धडा व्हिक्टोरिया राणीच्या सन्मानाचा. प्राथमिक शाळेंतील पहिलें गाणें म्हणजे " इंग्लंद देशांत – व्हिक्तोरिया राणी "...

तथापि समाजांत असाही एक वर्ग उत्पन्न होत होता कीं ज्याला आपले देशाचे पारतंत्र्याची लाज वाटत होती व स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं अनेकजण अनेक मार्गांचा विचार पण करूं लागले होते. " ब्रिटिश साम्राज्यावर कधींही सूर्य मावळत नाहीं " ( कारण चारी खंडांत त्यांचें साम्राज्य आहे ) अशी स्तुतिसुमनें गातां गातां कांहींजण असेंही म्हणत

होते कीं “ अहो, तो मावळेलच कसा ? आपण स्वत: समोर असतां भर उजेडांत जर इतके अन्याय होत आहेत तर आपण नसतांना अंध:कारांत काय अनन्वित प्रकार होतील याची सूर्याला कल्पना असल्यानें तो कधींही मावळत नाहीं. ” पण असें म्हटलें तरी गांठ होती पोलादी चौकटीशीं व म्हणून प्रत्येकजण दिङ्मूढ होत होता. पिंजऱ्यांत सांपडल्यानंतर जागृत झालेल्या सिंहासारखी देशाची स्थिति झाली होती. राष्ट्रीय संक्रमण काळाची जेमतेम सुरुवात होत होती व राष्ट्रीय सभेची स्थापना नुकतीच झाली होती. शिक्षणाचें काम जनतेनें हातांत घेणें हा देशजागृतीचा महत्त्वाचा मार्ग असल्यानें कलकत्ता येथें मुलींसाठीं एक राष्ट्रीय शाळा १८९८ सालीं स्थापन झाली. एके दिवशीं तेथील शिक्षिकेनें मुलींना प्रश्न केला—“ आपली राणी कोण ? ”

सगळ्या मुलींनीं उत्तर दिलें, “ आमची राणी व्हिक्टोरिया. ” कलकत्ता हीच तेव्हां भारताची राजधानी होती व तेथील मुलांबाळांना सुद्धां राणीचें नांव माहीत नसेल तर तो सरकारी प्रचार कसला ?

पण शिक्षिकेनें सांगितलें, “ आपली राणी म्हणजे सीतादेवी. तिनें रामायण कालापासून प्रत्येकाचे अंत:करणांत वस्ती केली आहे. मूर्तिमंत ऐश्वर्य, तेज, पावित्र्य, सरलता, त्याग व कळकळ यांचें प्रतीक म्हणजेच आमची सीताराणी. हा मान दुसऱ्या कोणाही राणीस हिरावून घेतां येणार नाहीं. ”

अशा प्रकारच्या भावेला त्यावेळीं राजद्रोहाचा वास येणें अगदीं संभवनीय होतें व सांगण्याचा विशेष मुद्दा हा कीं ही शिक्षिका जन्मजात ब्रिटिश होती. तिचें पूर्वाश्रमीचें नांव ‘ कु. मार्गारेट् नोबल् ’ व भरतभूमीनें तिला दत्तक घेतल्यानंतर तिचें नांव ठेवलें होतें ‘ भगिनी निवेदिता. ’ हिच्या दिव्य जीवनाशीं वाचकांचा परिचय करून देण्याचें या ग्रंथांत योजलें आहे.

स्वामी विवेकानंदांनीं १८९३ सालीं अमेरिकेंतील शिकागो–सर्वधर्म-परिषदेंत वैदिक धर्माचे प्रतिनिधि म्हणून जो असामान्य विक्रम केला त्याबद्दल बहुतेक वाचकांना माहिती आहेच. जवळ एक कवडी नसतांना भटकणारा हा हिंदु योगी आतां अक्षरशः जगप्रसिद्ध झाला होता. अमेरिकेंतील झाडून सर्व वर्तमानपत्रांनीं त्यांचेवर स्तुतिसुमनें अर्पण केलीं होतीं व त्यांचा पडसाद इंग्लंडपर्यंत पोंचला होता. त्यानंतर १८९५ सालीं स्वामीजी इंग्लंडमध्यें आले व तेथें व्याख्यानद्वारा ,प्रचारास सुरुवात केली. इंग्लंडचे जनतेनें पण त्यांची किंमत ओळखली, बहुमान केला व कृतकृत्य होऊन कु. मार्गारेट्ट नोबल्‌ या महिलेस हिंदमातेस दत्तक म्हणून दिलें. इंग्लंडकडून भारतास मिळालेली ही अमूल्य देणगी आहे असें स्वामीजींनीं जाहीर केलें.

लक्षाधीश-कोट्याधीशांना जेव्हां अपत्य नसतें व दत्तक घेण्याचा प्रश्न येतो तेव्हां हा मान कोणातरी गरीब मुलाकडे येतो व तो त्याच्या पूर्व-पुण्याईनें रंकाचा राव झाल्यानें चोहोंकडून अभिनंदनास पात्र होतो. पण कु. मार्गारेट्ट नोबल्‌चें दत्तक जाणें म्हणजे सर्व प्रकारचें ऐश्वर्य टाकून अठरा विश्वे दारिद्र्य पत्करणें अशा स्वरूपाचें होतें. त्यानंतर “ आपला देश ”, “ आपली राणी ” असेच शब्द त्यांच्या तोंडून निघत यावरूनच त्या हिंदी बांधवांशीं किती एकरूप झाल्या होत्या याची कल्पना करावी. त्यांनीं आपलें जीवन भारतमातेची सेवा करण्यांत कसें झिजविलें व किती सहनशीलता व धैर्य दाखविलें हें महाकवि रवींद्रनाथ टागोर यांच्या उक्तीवरून लक्षांत येईल. ते म्हणतात :—

“ स्वतःचें अशा तऱ्हेनें संपूर्ण निवेदन व समर्पण करण्याची अशी आश्चर्यकारक शक्ति इतर कुणाही व्यक्तीच्या ठिकाणीं मला आढळली नाहीं. ह्या बाबतींत त्यांना स्वतःला कसलाच अडथळा भासला नाहीं. त्यांचें शरीर, त्यांच्या आबाल्य युरोपीय संवयी, त्यांची आत्मीय स्वजनांवरील मायाममता, त्यांच्या स्वतःच्या समाजानें त्यांची केलेली उपेक्षा आणि ज्यांच्यासाठीं त्यांनीं प्राण अर्पिले त्यांचें औदासिन्य, दौर्बल्य आणि

त्यागविन्मुखता यांतील कांहींच त्यांना परतवूं शकलें नाहीं........ भगिनी निवेदितांमध्यें मानव्याचें अपराजेय माहात्म्य प्रत्यक्ष बघून आम्ही धन्य झालों आहों."

कविवर्यांना भगिनी निवेदितांचें अद्‌भुत जीवन पाहूनच असें एकादें पात्र आपले कादंबरींत घालण्याची इच्छा झाली व त्यांतूनच "गोरा" नांवाची त्यांची उत्कृष्ट कादंबरी बाहेर पडली. एका कवीनें भगिनींना महासती सावित्रीचे तोडीस नेऊन बसवलें आहे व त्यांत बिलकूल अतिशयोक्ति नाहीं हें त्यांचें दिव्य जीवन समजावून घेणाराचे लक्षांत येईल.

"यमजेत्री च सावित्री भगिनी च निवेदिता ।
मीरा लक्ष्मीरहल्याच पंचैताः पुण्यचिंतनाः ॥"

कु. नोबल्‌चे जीवनाचा उदय व त्याची वाढ ही कसकशीं होत गेलीं हें आतां पाहणें आहे.

# २ : पूर्व चरित्र

" आपला मार्ग खरा असला म्हणजे आपणांस वाटतील तितकीं कार्यकारी माणसें मिळतात अशी माझी खात्री आहे आणि मला अनुभवही तसाच येत आहे. येथें (इंग्लंडमध्यें) मला कित्येक शिष्य रोज येऊन मिळत आहेत आणि ते चेले म्हणजे असे तसे नसून प्रसंगीं आपल्या गुरुसाठीं प्राणही देण्यास तयार असे आहेत "*

*स्वा. विवेकानंद*

" बुद्धिवादास धरून असणाऱ्या धर्मास मान्यता देणें यांतच युरोपची सुटणूक आहे "

*स्वा. विवेकानंद*

" राज्यकर्ता इंग्रज व सुसंस्कृत नागरिक इंग्रज यांत जमीन-अस्मानाचा फरक आहे. "

---

* स्वामीजींच्या पाश्चात्य शिष्यामध्यें खालील प्रमुख शिष्य होते :—कु. मार्गारेट् नोबल् (भ. निवेदिता), श्री. गुडविन्, श्री. व सौ. सेव्हियर, कु. मिलर, श्री. व सौ. फ्रॅन्सिस् लेगेट्, कु. जोसेफाइन मॅकलेऑड्, श्री. ओल्बुल्, कु. वॅल्डो (भगिनी हरिदासी), कु. ग्रीनस्टिडेल् (भगिनी ख्रिस्टिन्) वगैरे.

कु. मार्गारेट् नोबलचे पूर्वज मूळचे स्कॉटलंडचे. नंतर तेथून ते आयर्लंडमध्यें स्थलांतर करून गेले व तेथेंच अल्स्टर प्रांतांत १८६७ सालीं या कन्येचा जन्म झाला. प्रोटेस्टंट धर्मोपदेशक रे. सॅम्युएल रिचर्ड नोबल् हे तिचे वडील व आईचें नांव इसाबेल् नोबल् असें होतें. आईचें हें पहिलेंच अपत्य होतें व तें जन्मण्यापूर्वींपासूनच तिला असें वाटत होतें कीं बाळंतपण सुखरूपपणें पार पडल्यास होणाऱ्या बाळाला ईश्वरकार्यार्थ अर्पण करावें. आईची गणना सौंदर्य-सम्राज्ञीमध्यें केली जात होती व हें पहिलें अपत्य पण निरुपम सौंदर्य घेऊनच जन्माला आलें. ईश्वरार्पण होण्याचा मान याला मोठेपणीं आला हें पुढें समजेलच.

आईकडून जसा सौंदर्याचा वारसा कु. नोबलला मिळाला होता तसा वडिलांकडून स्वार्थत्यागाचा वारसा मिळाला होता. हें कुटुंब आयर्लंडमधून स्थलांतर करून इंग्लंडमध्यें आलें व मँचेस्टर हें त्यांनीं वसतिस्थान केलें. तेथें धर्मोपदेशकाचें काम करीत असतांना रे. नोबल यांनीं तेथील जनते-साठीं अतुल स्वार्थत्याग व अनेक कष्ट केले होते.

कु. नोबलचे शिक्षणास सुरुवात होऊन त्यांत जसजशी त्यांची प्रगति होत चालली तसतशी त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेची प्रतिभा प्रभाव पाडूं लागली. वडील धर्मोपदेशक असल्यानें धर्मतत्वांशीं पण त्यांचा परिचय होऊं लागला पण त्यांतूनच एक अडचण निर्माण झाली. ती अशी कीं धर्मग्रंथांत वाचलेल्या अनेक गोष्टी बुद्धिवादास पटेनाशा वाटूं लागल्या व त्या कितपत खऱ्या आहेत कीं नाहींतच असे त्यांचे मनांत संशय निर्माण होऊं लागले. शिक्षण संपल्यानंतर त्यांनीं एक दोन ठिकाणीं कांहीं दिवस शिक्षिकेचें काम केलें व नंतर लंडनमध्यें विंबल्डन् येथें १८९२ सालीं स्वतःची शाळा स्थापन केली. स्त्रीशिक्षणाची सर्वांगीण व शास्त्रीय प्रगति व्हावी या हेतूनें तेथील सुसंस्कृत समाजानें "सीसेम् क्लब्" या नांवाची

एक संस्था काढली होती. या संस्थेच्या कु. मार्गारेट् या सदस्य होऊन त्यांनीं तिचे कार्यांत पुढाकार घेतला होता. विंबलडन् येथील शाळेंत मुख्य अध्यापिकेचें काम करीत असतांनाच योगायोगानें त्यांच्या भविष्यकालीन दिव्य जीवनाची रूपरेषा ठरून गेली.

स्वामी विवेकानंद इंग्लंडला १८९५ सालीं प्रथम आले त्यावेळीं त्यांची कीर्ति अगोदरच पुढें आली होती व वैदिक धर्माबद्दलचे सुसंस्कृत जनतेचे मतांत परिवर्तन होत होतें. याचें कारण हा धर्म सर्वसंग्राहक आहे व नुस्ता सहिष्णुच नसून इतर धर्मांना पूर्णपणें मान्य करणारा असा आहे. याशिवाय हा अद्वैतधर्म अभ्युदय 'व निःश्रेयस या दोन्हींविषयीं जागृत असून अंधश्रद्धेला महत्त्व देत नसल्यानें बुद्धिवादांशीं पण विसंगत नाहीं अशी कांहीं पाश्चात्यांची भावना होऊं लागली होती. धर्मग्रंथ व बुद्धिवाद यांमधील विसंगति कु. नोबलला पण बरेच दिवसांपासून जाणवूं लागली होती व अशावेळीं बुद्धिवादाशीं विसंगत नसलेलीं अशी अद्वैतवादी धर्मतत्त्वें विशद करून सांगणारा महात्मा त्यांचे पाहाण्यांत आला. त्यामुळें स्वामीजींचे व्याख्यानास त्या आपल्या मैत्रिणीसह नियमितपणें जाऊं लागल्या. हाच कालखंड त्यांच्या जीवनांत उलटापालट करण्यास कारणीभूत झाला व येथेंच त्यांचे पूर्वाश्रमीचें आयुष्य संपून संक्रमणकालास सुरुवात झाली.

इंग्लिश व्यक्तीवर प्रभुत्व पाडणें हें अत्यंत कठीण आहे. पण जर कां एकदां तिनें एकादी गोष्ट मान्य केली तर मात्र ती त्या तत्त्वाशीं जन्मभर प्रामाणिक राहील. कु. नोबल ह्या सुद्धां जरी वैदिक धर्मातील अद्वैतवादाकडे आकर्षल्या जात होत्या तरी भावनेच्या आहारीं जात नव्हत्या. त्या स्वामी-जींच्या सर्व व्याख्यानांस हजर राहात असत, अनेक शंका विचारीत असत व हळूहळू मतपरिवर्तन होण्यास अप्रत्यक्षपणें वाव देत असत. पण हिंदुस्थान या देशाची व त्याचे धर्माची सेवा करण्याचें व्रत त्यांनीं घेतलें तें अत्यंत विचारपूर्वक व जरूर त्या कालावधींनंतरच. मात्र एकदां व्रत

घेतल्यानंतर तें कितीही खडतर वाटलें तरी सोडलें नाहीं. पूर्वायुष्यांतील संस्कार नष्ट करून व भारतास उपयुक्त असे नवे संस्कार धारण करून त्यांनीं भारताची सुकन्या म्हणून दिव्य जीवन व्यतीत केलें; इतकेंच नव्हे तर कष्ट, सेवा व त्याग यांची परमावधि करून हिंदचे बंधुभगिनींना सर्व क्षेत्रांत सक्रिय मार्गदर्शन केलें.

१८९३ सालच्या शिकागोच्या सर्वधर्मपरिषदेनंतर स्वामी विवेकानंदांना अमेरिकेंत सभांसाठीं निमंत्रणावर निमंत्रणें येऊं लागलीं, तसेंच उच्च वर्गातील बड्या बड्या नागरिकांचे प्रतिष्ठित पाहुणे म्हणून त्यांची मानमान्यता होऊं लागली. यानंतरचे दोन वर्षांचे काळांत सर्व अमेरिका-भर व्याख्यानें व योगाचे वर्ग त्यांनीं सुरू केले. राजयोगावरील व्याख्या-नांचें एकत्रीकरण करून त्यांनीं “ राजयोग ” हें पुस्तक त्यावेळीं प्रसिद्ध केलं व तें इतकें लोकप्रिय झालें कीं ताबडतोब आणखी दोन आवृत्त्या काढाव्या लागल्या. हिंदुस्थानजवळ पैसा नाहीं व आधिभौतिक ज्ञान पण नाहीं; पण ज्या आध्यात्मिक ज्ञानाचा वारसा त्याचेजवळ आहे तें ज्ञान मुक्त हस्तानें अखिल विश्वास द्यावें व त्याचे मोबदल्यांत पाश्चात्यांकडून आधिभौतिक विद्यांप्रीत्यर्थ लागणाऱ्या सर्व सवलती व द्रव्यसाहाय्य मिळवावें या हेतूनें त्यांनीं परदेशगमन स्वीकारलें होतें व तो हेतु आतां सफल होऊं लागला होता. कोणाकडून कांहीं विनामूल्य मिळावें अशा भिक्षावृत्तीचा त्यांत अंशही नसल्यानें, जेथें जावें तेथें त्यांचा सन्मान होत असे, विरोध जिरून जात असे व देवाणघेवाण मुक्त हस्तानें होत असे.

या कार्यासाठीं सबंध जगाशीं संबंध येण्यासाठीं इंग्रजी भाषेचें माध्यम अत्यंत उपयोगी पडणार आहे हें स्वामीजींच्या लक्षांत आलें. ब्रिटिश साम्राज्याचें मध्यवर्ती ठिकाण इंग्लंड येथें या दृष्टीनें प्रचारकार्य केल्यास, ज्या भाषेनें या साम्राज्याचें एकीकरण घडून आलें त्या इंग्रजी भाषेचा उपयोग आपले कार्यास फार होईल या विचारानें १८९५ सालीं स्वामीजी अमेरिकेहून इंग्लंडला आले.

पण याकालीं साम्राज्यशाहीची पकड हिंदुस्थानावर पक्की होती. अर्थात् गोऱ्या नोकरशाहीला हिंदुस्थानांत राज्य करतांना पदोपदीं आपण जेते हा अभिमान वाटत होता व जित लोकांना अपमानास्पद अशी वागणूक त्यांचेकडून मिळत होती. स्वामीजींना अशा वागणुकीचा अनुभव अनेक वेळां आलेला असल्यानें सर्वसाधारण ब्रिटिश लोकांबद्दल त्यांचा ग्रह जरासा प्रतिकूलच होता व हा ग्रह घेऊनच ते इंग्लंडला आले. पण लौकरच त्यांना कळून चुकलें कीं जेता इंग्रज व सुसंस्कृत नागरिक इंग्रज यांमध्यें जमीनअस्मानाचें अंतर आहे. इंग्लंड सोडल्यानंतर तर त्यांनीं असे उद्गार काढले कीं "इंग्रजांबद्दल एक प्रकारची द्वेषभावना घेऊनच मी त्यांचे देशांत गेलों, पण आतां या समुदायांत असा एकही इसम सांपडणार नाहीं कीं ज्याला माझे इतका इंग्रजांबद्दल अभिमान वाटतो."

इंग्लंडमधील जनता स्वामीजींचे व्याख्यानांना वाढत्या संख्येनें हजर राहूं लागली व पुढेंपुढें जागेच्या कमतरतेमुळें अनेकांना जमिनीवर बसून त्यांचीं व्याख्यानें ऐकावीं लागलीं. या वेळीं कु. मार्गारेट् नोबेल् ह्या आपले शाळेच्या मुख्य अध्यापिका होत्या व सुरुवातीपासूनच त्या सर्व व्याख्यानांना हजर राहात असत*. "स्वामीजींचें व्यक्तिमत्व आकर्षक खरें पण या एवढ्या व्याख्यानांत नवें असें त्यांनीं काय सांगितलें?" असा प्रश्न त्या स्वतःशीं करीत असत. तरी पण कांहीं दिवसांनीं त्या म्हणाल्या,

---

* स्वामीजींच्या इंग्लंडमधील पहिल्या व्याख्यानास (इ. स. १८९५). भगिनी हजर होत्या त्याचें चित्र त्यांनीं रेखाटलें आहे तें असें:—

"The time was a cold Sunday afternoon in November and the place, it is true, a West-end drawing room. But he was seated, facing a half circle of listeners with the fire on the hearth behind him, and as he answered question after question, breaking now and then, into the chanting of some Sanskrit text in illustration of the reply, the scene must have appeared to him, while twilight passed into darkness, only as a curious

" या सर्व गोष्टी पूर्वी कोणीतरी कधींतरी सांगितलेल्या असल्या तरी एक दीड तासाच्या कालावधींत इतकें ज्ञान सुसंगत रीतीनें सांगतां येणें हें सुद्धां कांहीं कमी नाहीं " स्वामीजींनीं सांगितलेले कांहीं मुद्दे त्यांना पटत नसत व कांहीं समजत नसत व तसें 'त्या आपले मैत्रिणींजवळ बोलून दाखवीत असत. एकदां स्वामीजींच्या देखत त्यापैकीं एकजणीनें स्वतःची फुशारकी दाखवीत त्यांना विचारलें " त्यांचें म्हणणें तुम्हाला कसें पटत नाहीं ? मला तर तें तंतोतंत पटतें व उमगतें."

यास उत्तर म्हणून स्वामीजींनीं सांगितलें कीं मतभेद असल्यास कांहीं-एक चिंता नाहीं. माझे गुरुदेव श्री रामकृष्ण यांच्याशीं माझा अनेक मुद्द्यां-वर कित्येक काळपर्यंत मतभेद होता. पण शेवटीं मला माझ्या सर्व बुद्धि-वादांसह व मतप्रणालीसह त्यांना शरण जावें लागलें." व्याख्यानांवर व्याख्यानें होऊं लागलीं तसतशा अनेक शंका स्वामीजींना विचारून त्यांनीं फेडून घेतल्या.

अशा व्याख्यानांतून स्वामीजी कशाचें विवेचन करीत असत हें त्यांचें जीवनकार्य ज्यांना माहीत आहे त्यांना सांगण्याचें कांहीं कारण नाहीं. ज्यांना जास्त उत्कंठा आहे त्यांनीं त्यांच्या जीवन–चरित्राशीं परिचय करून घेणें जरूर आहे. येथें नमुना म्हणून थोडेसे त्रुटित विचार सांगण्यांत येत आहेत :—

१) " मन जरी अतिसूक्ष्म आहे तरी त्याचें सामर्थ्य प्रबल अशा इंद्रियांपेक्षां किती तरी जास्त आहे. पंचमहाभूतांपैकीं सुद्धां (पृथ्वी,

---

variant upon the Indian garden or on the group of hearers gathered at sundown round the Sadhu who sits beside the wall or under the tree outside the village bounds. Never again in England did I see the Swami as a teacher in such simple fashion."

आप, तेज, वायु व आकाश यांपैकीं ) जें तत्त्व जास्त सूक्ष्म असतें तेंच जडतत्त्वापेक्षां जास्त शक्तिमान् असतें. म्हणूनच निवळ मौन धारण करून एकाग्र मनानें विचारप्रवाह सुरू केले म्हणजे दूर अंतरावरचे व्यक्तींवर व त्यांचे कृतींवर सुद्धां परिणाम होतो. कारण व्यक्तींचीं मनें हीं भिन्न भिन्न अशीं वाटतात, तरीपण त्यांच्यांत वेगळेपणा असा नाहींच व त्यामुळें एका व्यक्तीचे विचार न बोलतां दुसऱ्या व्यक्तीस कळतात. ”

२ ) “ रोप बाल्यावस्थेंत असलें म्हणजे त्याला कुंपणाचें रक्षण लागतेंच. पण तें मोठें झाल्यावर त्याचें कुंपण निघून गेलें तरच तें स्वयंपूर्ण होऊं शकतें. त्याप्रमाणेंच साधकाची आध्यात्मिक क्षेत्रांतील साधना सुरुवातीस एकादे धर्मसंप्रदायाचे मार्गदर्शनाखालीं चालते पण कालांतरानें साधक सांप्रदायिकपणा टाकून स्वतंत्र व्हावा अशीच वेदांताची शिकवण आहे. ”

३ ) “ व्यावहारिक प्रेमांत देवाणापाठोपाठ घेवाण यावें अशी अपेक्षा असते. पण आपण बालकांवर प्रेम करतों तें किती निःस्वार्थी असतें ? त्याचेपासून आपणांस कांहींएक मिळवावयाचें नसतें व म्हणूनच हें खरें प्रेम.”

“ तरीपण मागेंपुढें यांतसुद्धां स्वार्थाचा अंश येऊं शकतो. संपूर्ण निःस्वार्थी असें प्रेम करतां येतें फक्त परमेश्वरावर व असें प्रेम म्हणजेच भक्ति. फक्त देणें हेंच घडावें व घेण्याची कल्पनाही येऊं नये हाच भक्तीचा आदर्श. ”

४ ) “ जगाचा इतिहास म्हणजे तरी काय ? ज्यांना जबर आत्मविश्वास आहे अशा कांहीं व्यक्तींचा इतिहास म्हणजेच जगाचा इतिहास. अशा जबर आत्मविश्वासानेंच मानवांतील दिव्यत्व प्रकट होतें व अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्य होतात. प्रत्येकाचे ठिकाणीं अमर्याद असें सुप्त सामर्थ्य आहे व तें व्यक्त दशेस न आणतां आले म्हणजेच

अपयश प्राप्त होतें. एकादी व्यक्ति काय किंवा राष्ट्र काय, त्याचा आत्म-सामर्थ्यावर विश्वास नसेल तर मृत्यु हा ठेवलेलाच आहे."

५) "भौतिक शास्त्रांचे सिद्धांत मान्य करूनही स्वतःचे सिद्धांत अबाधित आहेत असें दाखविणारा एकादा धर्म असेल तर त्याची जरुरी सध्याच्या काळीं आहे. ज्ञानाच्या व्याख्येस जुळणारा तसेंच उत्क्रांतिशास्त्राचे तत्त्वास जुळणारा असा एकादा धर्म असला तर भौतिक शास्त्राच्या माऱ्यानें त्याची इमारत मोडकळीस येणार नाहीं, एवढेंच नव्हे तर तिला दुजोरा मात्र मिळेल. वेदांत धर्मानें वरील दोन्ही अटी पाळून आपला मार्ग काढला आहे असें आढळून येतें. सनातन धर्मांत 'ब्रह्म' म्हणून जें सांगितलें आहे तेंच भौतिक शास्त्रें आज सिद्ध करूं पाहात आहेत."

६) "कोळी कीटक आपल्याच अंगांतून धागा उत्पन्न करतो व त्याचें जाळें तयार करतो. इतर बारीकसारीक कीटक त्यांत सांपडावे व खावयास मिळावे हा त्याचा हेतु. पण त्यामुळेंच तो स्वतः बंधनांत सांपडतो. तसेंच मनुष्यपण आपलीं बंधनें स्वतःच तयार करतो व एकाएकीं त्यांत सांपडतो."

७) "राजपुताना अगर साहारा वाळवंटांतून प्रवास करतांना तीव्र अशा सूर्यकिरणांच्या योगानें दूर अंतरावर मृगजळाचा भास होतो. तृषार्त प्रवासी त्याचे शोधार्थ जातो पण तेथें पाणी न मिळाल्यानें थकून हताश मात्र होतो."

"पण पहिल्या अशा अनुभवानंतर पुन्हां जेव्हां तो असें मृगजळ पाहातो तेव्हां मात्र फसत नाहीं. अनुभवापूर्वी तो मृगजळाकडे सत्य म्हणून पाहात होता पण नंतर पाहात असला तरी तें असत्य आहे अशी त्याला जाणीव असते. तसेंच व्यवहारी गृहस्थ व साधक हे दोघेही जगाकडे बघतात. पण व्यवहारी गृहस्थ तें खरें व शाश्वत आहे या दृष्टीनें पाहातो व साधक मात्र तें मायावी व अशाश्वत आहे या दृष्टीनें जगाकडे पाहातो. जगाकडे पाहाण्याचे दोघांचे दृष्टिकोन असे भिन्न

असतात. वरचेवर स्वरूप पालटणारें म्हणूनच अशाश्वत स्वरूपाचें हें जग आहे व ब्रह्म म्हणजेच सूक्ष्म असें आदिकारण हें मात्र शाश्वत आहे."

८) "जगांतील अमुक एक आढळणारी वस्तु अथवा परिस्थिति चिरकाल एकाच स्वरूपाची राहील असें छातीवर हात ठेवून कोणास सांगतां येणें शक्य आहे काय? आज जें कांहीं चांगलें म्हणून आपण म्हणतों तेंच उद्यां परिस्थिति बदलली तर आपणांस वाईट दिसूं लागेल. प्रचंड झंझावात सुटला आहे अशावेळीं त्या वातामुळें उपटलेलें झाड माझ्या एकाद्या मित्राच्या डोक्यावर पडून त्याचा प्राण गेला तर तें वादळ वाईट असें मी म्हणतों. परंतु त्या वादळामुळें हजारों रोगकारक जंतूंचा नाश होऊन कित्येकांचे प्राण वाचले असतील! म्हणजे एकाच्या दृष्टीनें जें वाईट तें दुसऱ्याच्या दृष्टीनें चांगलें झालें असें नाहीं काय? याकरितां चांगलें आणि वाईट, सुख आणि दु:ख, पुण्य आणि पाप हीं द्वंद्वें वस्तुगत नसून केवळ आपल्या दृष्टीमुळें उत्पन्न झालीं आहेत हें नि:संशय सिद्ध होतें. साकार व सगुण परमेश्वराची व्याप्ति नेहमींच सापेक्ष असणार. म्हणजे जगांत कांहींतरी वाईट आहे व तें नित्य वाईट राहाणार म्हणून अशा स्थितीच्या अपेक्षेनें परमेश्वर विश्वबाह्य, साकार व सगुण मानावा लागतो. परंतु वेदांत धर्मानें प्रतिपादिलेल्या निर्गुण व निराकार ब्रह्माचें स्वरूप सापेक्ष नाहीं. तें कैवल्यरूप आहे म्हणून तें बरेंही नाहीं व वाईटही नाहीं. तें गुणांच्या पलीकडचें रूप आहे. याकरितां चांगलें म्हणजे परमात्मपदाच्या अधिक जवळ पोहोंचलेलें रूप आणि वाईट म्हणजे परमात्मपदापासून अधिक लांबचें रूप इतकेंच फार तर म्हणतां येईल."

९) "कोणत्याही वस्तूचें यथास्थित ज्ञान मला व्हावयाचें असेल तर तें ब्रह्मज्ञानाशिवाय होणार नाहीं. आपल्या अंत:करणांतील गूढ अशा भागांत त्याचें वास्तव्य आहे. शरीरें येतात व जातात. सुखें व दु:खेंही येतात व जातात, आणि युगामागें युगही निघून जातें; पण आपल्या अंत:-

करणांतील तें अत्यंत गूढतत्त्व मात्र अमर आहे. '**अहं ब्रह्मास्मि**' हें कालस्थलाबाधित सत्य आहे. तें सत्य आहे म्हणूनच बाकीच्यांस सत्यत्व आलें आहे. त्याच्याच आधारानें आपण पाहातों, ऐकतों आणि विचार करतों."

१०) "हें गूढतत्त्व केवळ माझ्याच किंवा तुमच्याच अंतःकरणांत आहे असें नाहीं, तर तें अत्यंत क्षुद्र अशा कीटकांपर्यंत आणि सर्व अचल सृष्टींतही भरून उरलें आहे. सत्पुरुषांच्या अंतःकरणांत जसा त्याचा वास आहे तसाच चोरांच्या अंतःकरणांतही त्याचाच वास आहे. ज्या दिवशीं हा अनुभव आपणांस प्रत्यक्ष येईल त्या दिवशीं सर्व संशयनिरसन होईल. विश्व हें आपणांस आज मोठें कोडें वाटत आहे. पण '**सर्वं खल्विदं ब्रह्म**' हेंच या कोड्याचें उत्तर तुम्हांस शेवटीं सांपडेल. हें एकवेळ समजलें म्हणजे आणखी समजावयाचें असें कांहींच उरत नाहीं. आज सर्व भौतिकशास्त्रांनीं उत्पन्न करून ठेवलेलें 'ज्ञान' हा ज्ञानमार्गाचा शेवट नव्हे. खरें ज्ञान त्यापलीकडे आहे. भौतिक शास्त्रांचें ज्ञान हें खऱ्या ज्ञानमंदिराच्या पायरीसारखें आहे. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' असा अनुभव येणें हेंच खरें ज्ञान."

वगैरे वगैरे ........

स्वामीजी १८९५ सालीं व १८९६ सालीं इंग्लंडांत आले तेव्हां त्यांनीं अशा प्रकारच्या दिव्य ज्ञानाचा प्रसार व्याख्यानद्वारें चालविला. असे अनेक विचार स्वामीजींच्या मुखांतून बाहेर पडूं लागले व कु. नोबल या सर्व ज्ञानेंद्रियें एकवटून त्यांना आत्मसात् करूं लागल्या. त्यांनीं नंतर लिहिलेल्या पुष्कळशा वाङ्मयांत याच विचारांचें प्रतिबिंब पडलें आहे हें त्यांनीं अभिमानपूर्वक मान्य केलें आहे.

स्वामीजी दुसऱ्यांदा इंग्लंडला आल्यानंतर त्यांनीं व्यवस्थेशीर योगाचे व वेदांताचे अभ्यासवर्ग सुरू केले व त्यांचे सभांना पण सुसंस्कृत इंग्रज समाज बहुसंख्येनें हजर राहूं लागला. आध्यात्मिक क्षेत्रांत ज्ञानदान करीत

असतां स्वामीजींना इंग्लंडमध्यें अशीं अनेक नररत्नें मिळालीं कीं ज्यांनीं हिंदुस्थानचे आधिभौतिक उन्नतिकरितां आपलें सर्वस्व अर्पण केलें. कु. नोबलप्रमाणें कु. मुलर, श्री. गुडविन् तसेंच सेव्हियर दांपत्य यांचा या बाबतींत प्रामुख्यानें समावेश होतो. स्वामीजी दुसऱ्या खेपेस इंग्लंडला आले तेव्हां त्यांनीं कु. नोबल यांना सरळच विचारलें कीं, "हिंदुस्थानमध्यें स्त्रीशिक्षणाची वाढ करणें हा एक माझ्या कार्याचा भाग आहे व हें काम तुम्ही अंगावर घ्याल कां?" आपल्या पत्रांत ते म्हणतात :– "जगांतील प्रचलित धर्मपंथ हे निर्जीव व नकली बनले आहेत. जगाला आज पाहिजे आहे चारित्र्य व निःस्वार्थी प्रेम व हें असेल तर मनुष्याचे वाणीस वज्राचें सामर्थ्य प्राप्त होईल. माझी अशी खात्री झाली आहे कीं सबंध जगाला हालवून सोडण्याचें सामर्थ्य तुमच्या अंगांत आहे. यांत अंधश्रद्धेचा बिलकूल भाग नाहीं. महान् जीवा, जागृत हो. जग दुःख-दरिद्र्यानें होरपळून निघत असतां अशावेळीं निद्रिस्त राहून कसें चालेल?"

हिंदुस्थानांत जाऊन तेथें यानंतर हिंदभूमीची आजन्म सेवा करण्याचें कु. नोबल यांनीं या वेळेस ठरविलें होतेंच* व हा विचार त्यांनीं एका मैत्रिणीमार्फत स्वामीजींजवळ एकदां व्यक्त केलासुद्धां. मात्र स्वामीजी हिंदुस्थानांत ताबडतोब जाण्याचे विचारांत होते व कु. नोबलचे जाण्याचा प्रश्न थोडा कालावधीचा होता.

१८९६ च्या अखेरीस स्वामीजी हिंदुस्थानांत गेले ते इंग्लंडमधील कामाची व्यवस्था स्वामी अभेदानंद यांचेकडे सोपवून गेले. पण कांहीं महिन्यानंतर स्वा. अभेदानंदांना अमेरिकेस जाण्याची पाळी आल्यामुळें इंग्लंडमधील कामाची जरा आबाळ होऊं लागली. स्वामी विवेकानंद यांची

* "I had recognized the heroic fibre of the man and desired to make myself the servant of his love for his own people."

Sister Nivedita.

अपेक्षा होती कीं ह्या कामासाठीं त्यांच्या शिष्या कु. मिलर व कु. नोबल यांचा उपयोग होईल. पण त्यापूर्वींच दोघींनींही हिंदुस्थानांत जाण्याचें नक्की ठरवलें होतें व त्यांनीं तसें स्वामीजींना हिंदुस्थानांत कळवलें. इतक्या अवस्थेला गोष्टी गेल्या व कु. नोबल या हिंदुस्थानांत कायमच्याच येणार आहेत हें स्वामीजींच्या लक्षांत आलें तेव्हां मात्र त्यांनीं त्यांना मुद्दाम पत्र लिहून परिस्थिति स्पष्ट केली. हिंदुस्थानासाठीं जें कार्य करणें आहे त्यांत त्यांचा मोठा हिस्सा असेल अशी आतां स्वामीजींची खात्रीच झाली. वस्तुतः या कार्यासाठीं पुरुषांपेक्षां स्त्रीचीच जरुरी जास्त होती व तीही अशा स्त्रीची कीं जी सिंहिणीप्रमाणें शूर आहे. स्वामीजी लिहितात:—

"....तुमचें शिक्षण, तळमळ, चारित्र्य, अगाध वात्सल्य, दृढनिश्चय व सेल्टिक् वंशाचें रक्त यांमुळें या कार्यास तुम्ही अनुरूप आहां. पण येथील परिस्थिति अशी आहे कीं कितीही वर्णन केलें तरी तिची बरोबर कल्पना येणार नाहीं. तुम्हांस येथें जवळ जवळ अर्धनग्न अशा लोकांत मिसळावें लागेल. गोरे लोक तुमच्याकडे एक विचित्र व्यक्ति अशा अर्थानें संशयानें पाहतील. शिवाय येथील हवा इतकी उष्ण आहे कीं तुमच्याकडील उन्हाळा म्हणजे इकडचा हिंवाळा. युरोपीय लोकांना आवश्यक असणाऱ्या सुखसोयी शहरांखेरीज इतरत्र कोठेंही मिळणार नाहींत. इतक्याउपर तुम्हांस येणें असेल तर सुस्वागतम्."

समाजाशीं एकजीव झाल्याशिवाय समाजाची खऱ्या अर्थानें सेवा होऊं शकत नाहीं व हिंदुस्थानांतील अज्ञ समाजाशीं एकरूप होणें हें या सुसंस्कृत इंग्रज महिलेला शक्य होईल कीं नाहीं याबद्दल खुद्द स्वामीजींनासुद्धां थोडी शंका वाटूं लागली. तरीपण स्वखुशीनें केलेली कोणतीही मदत त्यांना पाहिजेच होती. अगदींच प्रतिकूल परिस्थितींत पडावें लागलें तर या महिलेला तिच्या इच्छेविरुद्ध कदाचित् माघारही घ्यावी लागेल असें स्वामीजींना वाटल्यामुळें त्यांची इकडे आड व तिकडे विहीर अशी स्थिति होऊं नये अशी त्यांची इच्छा होती. त्यामुळें शेवटचा आधार म्हणून

त्यांनीं पुन: कळविलें :– " तुम्ही हिंदुस्थानचे कल्याणासाठीं काम करा कीं न करा, वेदांततत्त्वांना माना कीं न माना, माझ्यापुरतें म्हणाल तर मी तुमचे मदतीस राहीनच."

पण कु. नोबल् यांनीं भावनावश होऊन कोणत्याहीं कार्याचा अगर तत्त्वाचा अंगीकार केला नव्हताच मुळीं. त्यांचा निश्चय पूर्ण विचाराअंतीं झाला होता व आतां त्यापासून परावृत्त होणें हें इंग्रज व्यक्तीस स्वाभाविक असें मुळींच नव्हतें. तथापि इंग्लंडमधील कार्याची आवराआवर कायमची करणें हेंसुद्धां कांहीं लहानसहान काम नव्हतें. वडील पूर्वींच वारलेले, तशांत घरांत विधवा आई व दोन लहान भावंडें यांना सोडून तसेंच आप्तमित्र व सगेसोयरे यांचे कायमचे निरोप घेऊन जाणें हें एक अग्निदिव्यच होतें. त्यांतले त्यांत एक गोष्ट कु. नोबल्चे पथ्यावर पडली ती ही कीं त्यांच्या आईनीं त्यांना जाण्यास संमति दिली. वडील मृत्युपंथास लागतांना त्यांनीं आईला सांगितलें होतें कीं " या कन्येला कधीं तरी उज्ज्वल कार्याचा दिव्य आदेश येणार आहे व अशा वेळीं तुम्ही तिला आधार द्या." कु. नोबल्ची दृढनिश्चययुक्त तयारी पाहिल्यावर त्यांना पण पतिराजाचे शब्दांची आठवण झाली व हाच आदेश असें समजून त्यांनीं आपली संमति दिली.

स्वत: वडील अपत्य असतांना, विधवा आई व लहान भावंडें यांना सोडून निघून जाण्याची वेळ आली असतां कु. नोबल्चें अंत:करण किती पिळवटून आलें असेल ? तशीच पाळी ८-१० वर्षांपूर्वी त्यांचे गुरुजींवर पण आली होती. ती वेळ आठवून स्वामीजी म्हणतात :–

" गुरुदेवांचा ( श्रीरामकृष्ण यांचा ) संदेश जगभर प्रसृत होण्या-ऐवजीं तसाच नष्ट होऊन जावा यापेक्षां कांहीं व्यक्तींनीं बलिदान केलेलें बरें. एक आई व दोन भावंडें नष्ट झालीं तरी काय होणार आहे ? हाही एक यज्ञच आहे व होऊन जाऊं देत. त्यागाशिवाय कोणतेंच महत्कार्य

होत नाहीं. मायाममता वाटणारें अंतःकरण उपटून काढलें पाहिजे व रक्त वाहात असलें तरी नियुक्त कार्यास अर्पण केलें पाहिजे. तरच महान् गोष्टी साध्य होतात."

विधवा आई व धाकटीं भावंडें यांचा पाश स्वामीजींना तोडावा लागला तसा त्यांच्या शिष्येला पण त्यांचाच पाश तोडण्याची पाळी आली हा विचित्र योगायोग आहे. शेवटीं शाळेच्या कामकाजाची व्यवस्था करून दृढ अंतःकरणानें कु. नोबल्नें ठराविक वेळीं बोटीवर पाऊल ठेवलें व आपल्या नवीन दरिद्री घराचा रस्ता धरला.

महाभारतकाळीं सती सावित्रीनें अशाच दृढ निश्चयानें दरिद्री सासरचा रस्ता धरला होता. १८९८ चे सुरुवातीस त्यांची बोट हिंदुस्थानचे किनाऱ्यास लागली व त्यांचे जीवनाचे उत्तरभागास सुरुवात झाली

—×—×—

# ३ : भारताचा परिचय

एका व्याख्यानांत स्वामीजी म्हणाले, " देवळाची एक नवी इमारत बांधण्याचें काम आपणां सर्वांस करावयाचें आहे. त्या ठिकाणीं येण्यास सर्वांना पूर्ण अधिकार असावा. गाभाऱ्यांत फक्त ॐ या एका अक्षराचीच स्थापना करावयाची. या कामीं आपणां सर्वांच्या मदतीची मी याचना करतों."

स्वामीजींचे हे शब्द ऐकून आम्हांपैकीं कित्येकांच्या मनांत भरतभूमिरूपी विश्वदेवालयाची कल्पना उभी राहिली.'

*भ. निवेदिता*

*　　　*　　　*

" ईश्वरकार्यास स्वतः समर्पित झाल्यामुळेंच भगिनींच्या जीवाचें सार्थक होणार होतें."

*　　　*　　　*

" इतरेजनांस भोगाची ओढ असेल पण माझ्या वीरांना त्यागाची ओढ लागेल."

*कालीमाता*

*　　　*　　　*

कु. नोबल् या कु. मुलर यांचेबरोबर हिंदुस्थानांत आल्यानंतर पुढचेच महिन्यांत श्रीमती ओलबुल् व कु. मॅक्लेऑड् या दोन अमेरिकन विदुषी स्वामीजींच्या कार्यास हातभार लावण्यास आल्या. त्यांचे पूर्वी याच कार्यासाठीं, आपलें सर्वस्व बरोबर घेऊन व येथेंच स्वामीजींचें कार्यास वाहून घेण्यासाठीं कॅप्टन् सेव्हियर व सौ. सेव्हियर या आल्या होत्या. बेलूरमठ येथील जागा विकत घेऊन त्यावर इमारत बांधणें, तसेंच हिमालयांत मायावती येथें पण नवीन जागा विकत घेऊन अद्वैताश्रम स्थापन करणें हें कार्य मुख्यतः वरील शिष्यसमूहांचे मदतीनें झालें.

कु. नोबल् यांना या मैत्रिणींचा सहवास ही एक अपूर्व अशी देणगी वाटली. हा शिष्यसमूह स्वामीजींचे कार्यासाठीं अहर्निश झटण्यांतच आनंद मानीत असे. कु. नोबल् इकडे आल्यानंतर सुमारें दोन महिन्यांनीं त्यांना ब्रह्मचर्यदीक्षा देण्यांत आली व '**निवेदिता**' हें नवीन नांव त्यांनीं धारण केलें. हिंदमातेच्या पदरीं दत्तक जाण्याचें कार्य अशा रीतीनें व्यवस्थित पार पडलें. येथून पुढें त्यांचा नवीन नांवानेंच उल्लेख करण्यांत येईल.

कलकत्ता येथें स्त्रियांचे शिक्षणासाठीं एक आदर्श राष्ट्रीय शाळा सुरू करण्याचें भ. निवेदिता यांनीं योजलें होतें; आणि त्यासाठीं त्यांना कितीतरी पूर्वतयारी करणें जरूर होतें. शिक्षणाचें माध्यम बंगाली असणेंच जरूर होतें म्हणून त्यांना स्वतः बंगाली भाषा मूळपासून शिकणें जरूर होतें. स्वामी स्वरूपानंद यांचेकडे ही शिक्षणाची कामगिरी सोंपविण्यांत आली व ते याशिवाय भगिनींना भगवद्गीता-अभ्यास व ध्यान-धारणा यांतसुद्धां मार्गदर्शन करीत असत. याशिवाय राष्ट्रीय शिक्षणाचे कार्याची दिशा ठरविणें व समाजाशीं एकरूप होण्याची स्वतःची पात्रता वाढवणें हे सुद्धां त्यांना जरूर होतें. सुरुवातीचे कांहीं दिवस बेलूरमठ येथील नवीन जागेंत तात्पुरती सोय करून या सर्व पाश्चात्य विदुषी राहात असत व लौकरच त्या सर्वांना उत्तर हिंदुस्थानांतून फिरवून

अनुक्रम ... क्रमांक ...9026... नों. दि. २२/४/१...

आणण्याची योजना आखण्यांत आली. तोंपर्यंतचे मधल्या काळांत त्यांनीं स्वामीजींच्या व श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या वस्तीनें पवित्र झालेल्या ठिकाणांना भेटी दिल्या.* प्रत्येक ठिकाणीं नवीन-नवीन अशी स्फूर्ति त्यांना मिळत गेली. बंगालमधील जनतेचें मुख्य दैवत महाकाली यासंबंधीं-सुद्धां त्यांनीं अनेक प्रकारची पारंपरिक माहिती पैदा केली व तद्विषयक तत्त्वज्ञानाशीं पण ओळख करून घेतली.

या अवधींत कलकत्ता येथें प्लेगची सांथ सुरू झाली. हा रोग बाहेर देशांतून येथें प्रथमच आलेला असल्यानें त्याविरुद्ध काय योजना करावी, स्वच्छता कशी ठेवावी, उंदरांच्या द्वारें येणारे प्लेगजंतु कसे नष्ट करावे वगैरे लोकांना माहीत नसल्यानें लोक पटापट मरूं लागले व सर्व शहरभर काळछाया पसरल्यासारखी झाली. जनता इकडे हवालदिल झाली असतां सरकारमार्फत उपाययोजना करण्यांत येत होत्या खऱ्या; पण त्यांत जबर-दस्ती जास्त होत असे. प्लेगविरुद्ध इनॉक्युलेशन करण्यांत येऊं लागलें. अनेकांना कारंटाईन्‌मध्यें टाकण्यांत येऊं लागलें (अनेक वेळां तेथेंच रोगी खलास होत असत) व घरें निर्जंतुक करण्याचीं कामें करण्यांत येऊं लागलीं. पण हें काम लष्करामार्फत चालू असल्यानें अनेक वेळां जुलूम-जबरदस्ती होत असे व ती जनतेला फार कष्टदायक झाली.

---

* दक्षिणेश्वर पंचवटीबद्दल भगिनी म्हणतात :–

"The associations of this new period cluster thick round a great banyan tree and a wooden hut that once stood near it. The tree stands in the wilder part of the garden, close to the river, in perfect seclusion. Five stems grow together and round the entwined trunk is built a teraced seat of brick work. At the north-western corner a great bough of the Bo species has grown down across the bench, and tradition says that this covers the exact spot in which realization was achieved. Be this as it may, the place was the scene of continuous meditation and austerity for many years."

स्वामीजी व त्यांच्या शिष्यांनीं मात्र जनता-जनार्दनाची सेवा करण्याची ही चालून आलेली संधि वाया जाऊं दिली नाहीं. सर्व प्रकारचें दुःख व दैन्य एकवटून येणें यालाच कालीचा अवतार असें म्हणतात व परमेश्वर जसा अनुकूल परिस्थिति उत्पन्न करतो तसें दुःख व दारिद्र्य पण तोच आणीत असतो व त्यांतही त्याचा कांहीं विशिष्ट हेतु असतो हें जाणून माणसानें अशा प्रसंगाचें पण स्वागत करण्यास तयार रहावें म्हणजेच कालीमातेचें स्वागत केल्यासारखें होतें. कितीही संकटें आलीं तरी घाबरून न जातां शांत डोक्यानें रहावें व जनता-जनार्दनाची होईल तेवढी सेवा मात्र करावी हाच कालीचा सन्मान आहे. ही शिकवण या दिवसांत स्वामीजींनीं आपल्या भक्तांना दिली व तिचें दृश्य स्वरूप समोर असल्यानें ती त्यांचे मनावर पुरी ठसली पण. स्वामीजींचे गुरुबंधु व शिष्यसमूह यांनीं या काळांत जें समाजशिक्षणाचें कार्य केलें त्यांत त्यांच्या वेडगळ समजुती काढून टाकणें व स्वच्छतेच्या संवयी लावणें यांचा मुख्यतः समावेश होतो. त्यांनीं याशिवाय ,कितीतरी रुग्णशुश्रूषा पण केली व त्यांत भगिनींनीं पण मनापासून भाग घेतला. प्लेग हा संसर्गजन्य रोग आहे हें माहीत असूनसुद्धां आपल्या देहाची कोणत्याही प्रकारें पर्वा न करतां कोणत्याही रुग्णाची त्या शुश्रूषा करीत असत. पुढें लौकरच भगिनींनीं कालीमातेसंबंधीं अनेक स्फुटें लिहिलीं व नंतर सर्व एकत्र संकलित करून “ कालीमाता ” या नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केलें.

याच कालांत सुप्रसिद्ध वनस्पतिशास्त्रज्ञ श्री. जगदीशचंद्र बोस हे वनस्पतीवर कांहीं प्रयोग करीत होते व वनस्पतीसुद्धां प्राण्याप्रमाणेंच संवेदनक्षम व भावनाक्षम असतात हे ते सप्रयोग दाखवीत असल्यानें त्यांचे संशोधनास बरीच प्रसिद्धि मिळूं लागली होती. याकरितां अनेक प्रकारचीं उपकरणें ते स्वतः तयार करीत होते व पाश्चात्य देशांना हे नवीन प्रयोग व शोध दाखविण्याचे मार्गावर होते. हिंदबांधवांकडून अशा प्रकारचें शास्त्रीय संशोधन होत आहे हें कळल्यामुळें भ. निवेदिता

यांनीं मुद्दाम त्यांचा परिचय करून घेतला व तो पुढें वरचेवर वाढतच गेला हें पुढें दिसून येईलच. सध्या भगिनी या हिंदजनतेशीं व त्यांच्या चालीरीतीशीं एकरूप होण्याचे खटपटींत असल्यानें त्यांनीं सौ. बोस यांचेकडून मार्गदर्शन व्हावें अशी इच्छा त्यांचेजवळ व्यक्त केली. सौ. बोस यांनीं त्यांना स्पष्टच सांगितलें कीं " हें अतिशय कठीण असें काम आहे व तुमची या प्रयत्नांत निराशा होण्याचाच जास्त संभव आहे." भगिनीं मात्र बिलकूल नाउमेद झाल्या नाहींत व त्यांनीं आपलें काम चिकाटीपूर्वक चालू ठेवलें.

पाश्चात्य शिष्यांना हिंदमातेचें सत्यदर्शन व्हावें हा एक त्यांचे शिक्षणाचाच मार्ग होता. या हेतूनें जी प्रवासाची योजना आखण्यांत आली होती तिला अनुसरून १८९८च्या उन्हाळ्यांत ही मंडळी इतर अनेक गुरुबंधूसमवेत कलकत्त्याहून निघून प्रथम नैनीताल व नंतर आलमोरा येथें गेली. आलमोरा येथें सेव्हियर दांपत्यानें स्वतःसाठीं एक बंगला घेतला होता तेथें स्वामीजी व त्याचें गुरुबंधु यांचे राहण्याची व्यवस्था झाली व पाश्चात्य महिलांसाठीं दुसऱ्या एका बंगल्याची व्यवस्था करण्यांत आली होती. तेथील हवापाणी सर्वांनांच आल्हादकारक असें वाटलें व दररोज बोलण्यांचालण्यांत स्वामीजींच्या तोंडून जे विचार बाहेर पडत ते त्यांना अमृततुल्य असे वाटूं लागले.

सध्यां भगिनी निवेदिता यांच्या पुढील नियुक्त कार्यासाठीं त्यांची पूर्वतयारी हळूहळूं करण्यांत येत होती. पण त्यांचें व्यक्तिमत्व बाणेदार असल्यानें व पूर्वसंस्कार फार प्रबळ असल्यानें कधींकधीं ही नवीन होणारी तयारीसुद्धां त्यांना जाचक वाटत असे.

वस्तुतः स्वामीजी प्रत्येकाच्या विचारस्वातंत्र्याला पूर्ण वाव देणारे असे होते व कोणालाही एकादी गोष्ट ग्रहण करण्यास कधींच सांगत नसत. प्रत्येक विषयाच्या उलटसुलट बाजू शिष्याच्या दृष्टिपथांत आणून देणें एवढेंच कार्य ते करीत असत; व नंतर ज्यांचीं त्यांनीं आपलीं स्वतःचीं

मतें बनवावींत असाच त्यांचा कटाक्ष असे व या रीतीनेंच खंबीर मनाचे कार्यकर्ते तयार होतात अशी त्यांची खात्री होती. पण वर्गांत जो विशेष हुशार विद्यार्थी असतो त्याच्याकडूनच गुरुजी आणखी विशेष अशा तयारीची अपेक्षा करतात; तसें भ. निवेदिता यांचेकडून त्यांना हिंदराष्ट्राचें विशेष प्रकारचें कार्य करून घेण्याची उमेद होती म्हणून अशा कार्यास अनुरूप अशा सूचना ते त्यांना फार वरचेवर देऊं लागले. भ. निवेदितांचे वंशगत विचारांशीं या सूचनांचा कधींकधीं विरोध असे व त्यामुळें त्यांचे वंशगत विचारांवर एक प्रकारचें आक्रमण होऊं लागलें. बरोबर असलेल्या एका सन्मान्य महिलेनें या वैचारिक आक्रमणाची जाणीव स्वामीजींना करून दिली तेव्हां मात्र स्वामीजींना त्यांचें म्हणणें पटलें. थोडा वेळ विचार करून ते म्हणाले, "तुमचें म्हणणें बरोबर आहे. पहा, आकाशांत शुद्धपक्षांतील नवीन चंद्र उगवला आहे त्याप्रमाणें आपणसुद्धां नवीन प्रकारचे जीवनास सुरुवात करूं या." गंभीर अशा चित्तवृत्तीनीं त्यांनीं आपल्या शिष्येला शुभाशीर्वाद पण दिले.

श्रीरामकृष्ण परमहंस यांनीं स्वामी विवेकानंद यांना समाधिस्थिति प्राप्त करून दिली ती केवळ आपल्या स्पर्शानें. त्यासाठीं त्यांना इतर मार्गांचा अवलंब करावा लागला नाहीं. त्यांनीं आपले शेवटचे आजारीपणांत इतर कित्येक शिष्यांनादेखील केवळ स्पर्शानें समाधिसुखाचा आनंद प्राप्त करून दिला होता व त्यांचे पश्चात् स्वामीजीदेखील कधींतरी अशा रीतीनें इतरांना समाधिस्थिति प्राप्त करून देऊं शकतील असें भविष्य त्यांनीं वर्तवलें होतें. त्यांच्या पौर्वात्य व पाश्चिमात्य शिष्यांनीं हें पूर्वी ऐकलें होतेंच व आतां भगिनींना शुभाशीर्वाद देतांना गुरुजींकडून जो स्पर्श झाला त्यामुळें त्यांना तसाच अनुभव आला. ध्यानधारणेचा अभ्यास त्या स्वतः करीत असतच. पण या प्रसंगानंतर जेव्हां त्या ध्यानास बसल्या तेव्हां त्यांनीं या क्षेत्रांत एकदम वरची अवस्था गांठली व त्यांना समाधिस्थितीचा अनुभव मिळाला. त्यांचें म्हणणें असें आहे

कीं हा शुभस्पर्श त्यांना झाला नसता तर हा एकाएकीं अनुभव येण्याचा संभव नव्हता. यानंतर त्यांचे विचारसरणींतील एकांगीपणा कमी होत चालला व पुढचे कार्यास अनुकूल अशी त्यांची मनोभूमिका होत चालली.

आलमोरा येथें मुक्काम असतांना भगिनींचे गुरुबंधु व स्वामीजींचे आंग्लशिष्य श्री. गुडविन् हे वारल्याची बातमी आली व ती ऐकल्याबरोबर स्वामीजींच्या देखील धीरगंभीर मनास धक्का बसला. धक्का बसावयास नको आहे असें ते म्हणत असतांच तो बसत तर होताच. दर मिनिटास २०० शब्द या वेगानें श्री. गुडविन् हे लघुलेखन घेऊं शकत होते व तीन वर्षांपूर्वी स्वामीजींच्या अमेरिकेंतील भाषणाचे लघुलेखक म्हणून त्यांची योजना झाली होती. सुमारें पंधरवडाभर पगारी काम केल्यानंतर स्वामीजींच्या विचारसरणीनें ते भारावून जाऊन त्यांनीं त्यांचें शिष्यत्व पत्करलें व कामाबद्दल पगार घेण्यास नकार दिला. हिंदुस्थानची आजन्म सेवा करण्याच्या हेतूनें स्वामीजींच्या बरोबरच ते इकडे आले व आपलें पवित्र कार्य करीत असतां उटकमंड येथें दोषी तापानें मृत्युवश झाले. प्राण सोडतांना त्यांनीं स्वामीजींची आठवण काढली होती हें ऐकून तर स्वामीजींना गंहिवरून आलें. त्यांनीं त्यांचे आईला सांत्वनपर पत्र पाठवून त्यांचे कार्याचा गौरव केला व त्यांना सद्गति मिळावी अशी इच्छा व्यक्त केली. स्वार्थत्यागांत कोणत्याही तऱ्हेनें ते कमी नव्हते म्हणून या शोकघटनेनें सर्वांनाच वाईट वाटलें.

आलमोऱ्याहून सेव्हियर दांपत्याशिवाय इतर सर्वजण परत कथगोदाम स्टेशनपर्यंत आले व हा शैक्षणिक दौऱ्याचा प्रथम भाग संपूर्ण झाला. हा सुमारें एक महिन्याचा कार्यक्रम होता व त्यांत कोणत्या विषयांचा उहापोह झाला याची तारीखवार नोंद भगिनींनीं करून ठेवली आहे. ( Some Wanderings With Swami Vivekananda हें पुस्तक पहा ) कोणकोणत्या विषयांची चर्चा होत गेली या गोष्टीस चरित्रवर्णनाचे

दृष्टीनें फारसें महत्त्व नाहीं पण भ. निवेदितांचे पाश्चिमात्य संस्कार घालवून त्यांचे ऐवजीं पौर्वात्य जीवनाचे व राष्ट्रीयत्वाचे संस्कार कसे दृढ करण्यांत आले हें पाहण्याच्या दृष्टीनें या विषयांचें फार महत्त्व आहे. भगिनींसारख्या सुसंस्कृत पाश्चात्य महिलेस कांटेचमच्यांशिवाय हातानें जेवणें, चारपाई-शिवाय झोपणें अशा गोष्टी सुद्धां सुरवातीस सोप्या गेल्या नाहींतच पण त्या हळूंहळूं आंगवळणीं पाडण्यासुद्धां त्यांना वाईट वाटलें नाहीं.

गंगामाता व तिचेपासून निघणारे प्रचंड कालवे, नदीवरून दिसणारा काशीक्षेत्राचा भव्य देखावा तसेंच नैनीताल येथील हिमालयाच्या पार्श्व-भूमीवर खुलून दिसणारे स्फटिकतुल्य तलाव हीं दृश्यें पाहून जसजसा मनास उल्हास वाटतो तसतशी ही पण भावना दृढ होत जाते कीं हें सारें वैभव भारतभूमीचें आहे. जगांत कोणत्याही ठिकाणीं असणारें हवामान भारतभूमीच्या कोणत्या तरी भागांत सांपडतेंच. पाश्चात्य संवयीच्या शिष्यांना हिमालयाची हवा लोभनीय वाटल्यामुळेंच अप्रत्यक्षपणें या नगराजाबद्दल व भारतभूमीबद्दल त्यांना प्रेम वाटत जावें हें साहजिकच होतें व स्वामीजींना पण पाहिजे होतें हेंच. एका पाश्चात्य व्यक्तीनें त्यांना एकदां विचारलें कीं, " हिंदुस्थानसाठीं मी काय करूं ? " स्वामीजींनीं एवढेंच सांगितलें कीं " हिंदुस्थानवर प्रेम करा. " यांत सर्व गोष्टींचा अंतर्भाव होतो.

याशिवाय भारतांतील कित्येक महान् विभूतींच्या जीवनांवर बोलणीं-चालणीं होत असत. राम, सीता, राधा, कृष्ण व बौद्ध या अवतारी विभूतींच्या जीवनांखेरीज शुक, जनक, ध्रुव, प्रल्हाद यांसारख्या कितीतरी महात्म्यांच्या बालकथा ( Cradle tales ) तसेंच ऐतिहासिक कालांतील अलेक्झांडर, अकबर, शिवाजी, झांशीची राणी, राममोहन रॉय, पंडित विद्यासागर, श्रीरामकृष्ण परमहंस यांच्यासारख्यांच्या जीवनांवर स्वामीजी बोलत असत. ऐतिहासिक व्यक्तींपाठोपाठ ऐतिहासिक घटना आपोआपच येत असत. चातुर्वर्ण्य, जातिभेद, ब्राह्मण-ब्राह्मणेतरवाद असले गंभीर विषय जसे हाताळले जात असत तसाच काव्यशास्त्रविनोद यांचा

देखील भरपूर आस्वाद घेतला जात असे. "असतो मा सद्गमय। तमसो मा ज्योतिर्गमय। मृत्योर्माममृतंगमय।" ही उपनिषदांतील रुद्र-प्रार्थना स्वमीजींना एकदां आठवली. तिचें रहस्य सांगतां सांगतां तिचें काव्यबद्ध भाषांतर पण त्यांनीं केलें व थोड्या वेळानें श्रोत्यांना हजर केलें :–

"From the unreal, lead us to the Real,
From darkness, lead us into Light
From death, lead us to Immortality
Reach us through and through Ourselves,
And evermore protest us–oh thou Terrible,
From ignorance by Thy sweet compassionate Face."

या भाषातराचें रसग्रहण केल्यानंतर भगिनींना त्यांतील चौथ्या ओळीवरून समाधिमार्गाची कल्पना आली. भाषांतराबद्दल त्या म्हणतात :–

"It tears the living heart out of the Sanskrit as it were and renders it again in English form."

उपनिषदें, गीता, कालिदास अशा संस्कृत ग्रंथांतून तसेंच तुळशीदास, सुरदास, रामप्रसाद यांसारख्या कवींच्या प्राकृत काव्यांतून लहान-लहान सुभाषितें जसजशीं स्वामीजींच्या स्मरणांत येत असत तसतसे त्यांचे इंग्लिश अनुवाद ते स्पष्ट करून सांगत असत. कोणत्याही विषयाचें विवेचन झालें तरी त्याचा शेवट बहुधा सूक्ष्म व अनंत अशा परमेश्वरतत्त्वाचे विवेचनांत व्हावयाचा व जातां जातां हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व व इतर व्यावहारिक विषयांवरसुद्धां प्रकाश पडावयाचा हें तंत्र बहुतेक ठरल्यासारखें होतें. आध्यात्मिक जीवनांत तल्लीन होणारे स्वामीजी आधिभौतिक जीवनाचे धकाधकींतून सुद्धां मार्ग काढीत असत व सर्वांगीण उन्नतीसाठीं मार्गदर्शन करीत असत हें त्यांचें वैशिष्ट्य पाहून सर्वांना त्यांचेबद्दल जास्त आदर वाटूं लागला. असो.

कथगोदमहून स्थानिक भक्तगण व गुरुबंधु कलकत्त्यास परत गेले व स्वामीजी, श्रीमती ओल्बुल्, कु. मॅक्लेऑड् व भगिनी निवेदिता यांनीं काश्मीरचा रस्ता धरला (श्रीमती ओल्बुल् यांना 'धीरामाता' व कु. मॅक्लेऑड् यांना 'जया' अशीं टोपण नांवें दिलीं होतीं). आग्रा व दिल्लीवरून पंजाबांत रावळपिंडीपर्यंत गाडीनें जावयाचें व नंतर टांगा व बोटीनें काश्मीरमध्यें जावयाचें असा त्यांचा पुढचा कार्यक्रम होता. आज तारखेस पश्चिम पंजाब पाकिस्तानांत अंतर्भूत झालेलें असल्यानें, काश्मीरला या मार्गानें जातां येत नाहीं. पण त्याकाळीं हाच राजमार्ग होता व त्यामुळें पंजाबचा बराचसा भाग या मंडळींचें पाहण्यांत आला. त्याकाळीं घरोघरीं लोकर कांतण्याचे चरखे पंजाबांत चालू असत व त्यांचा सूं-ऊं–सूं-ऊं असा आवाज ऐकून स्वामीजी म्हणत, "हें पहा 'सोऽहम्' मंत्राचें पारायण घरोघर चालू आहे."

गेल्या वर्षी स्वामीजी काश्मीरला आले होते तेव्हां तेथील महाराजांनीं त्यांना रामकृष्णमठासाठीं श्रीनगरनजीक जागा देण्याचें मान्य केलें होतें. ती जागा मिळवून तेथें मठस्थापनेचे कार्यास चालना देणें हें काम आतां करण्याचे स्वामीजींनीं योजलें होतें. शिवाय या दिवसांत श्रावणी पौर्णिमेस अमरनाथ येथें यात्रा भरते तेथें हजर राहाणें हाही त्यांचा हेतु होता. अमरनाथ हें स्थान सुमारें १२००० फूट उंचीवर असल्यानें इतक्या थंडींत तेथें मनुष्यवस्ती राहूं शकत नाहीं व तेथें जाणें तें उन्हाळ्यांत कमी थंडी असते तेव्हांच जावें लागतें. श्रावणी पौर्णिमेस तेथील उन्हाळ्याचे दिवस असतात व म्हणून त्यावेळेस ही यात्रा भरवली जाते. पेहेलगांवपर्यंत चांगली सडक असून पुढें डोंगरांतून पायवाटेनें पायीं अगर घोड्यावर अठ्ठावीस मैलांचा प्रवास चार दिवसांत केला जातो व त्यापैकीं शेवटचे दोन दिवसांचा प्रवास बर्फमय प्रदेशांतून होतो. येथें एक नैसर्गिक व उंच अशी मोठीशी गुहा असून वरून एका जागीं थंडगार पाणी ठिपकतें व खालीं पडतां पडतां अत्यंत थंडीमुळें त्याचें

हिमकण बनतात. खाली पडल्यानंतर हिमकणांचें एक शिवलिंग तयार होतें. श्रावणी पौर्णिमेस त्यास पूर्ण आकार प्राप्त होतो व हेंच तेथील यात्रेकरूंचें दैवत.

काश्मीरची राजधानी श्रीनगर येथें या मंडळींनीं गृहनौकांतून राहण्याचें ठरविलें व तेथून इकडे तिकडे त्यांच्या छोट्या छोट्या सहली होत असत. गृहनौका म्हणजे एक मोठीशी नांव असून तिच्यांत राहण्यासाठीं खोल्या, स्नानगृहें, स्वैपाकगृहें वगैरे सर्व सोयी असतात. जर कोठें पाण्यांतून प्रवास करणें असेल तर याच नावेंतून प्रवास होतो व प्रवास चालू आहे हें आंतील लोकांना समजत देखील नाहीं. निसर्गसौंदर्य चोहोंकडे बहरलेलें असल्यामुळें काश्मीर हें भूलोकांवरील नंदनवन आहे अशी त्याची ख्याति आहे.

ही मंडळी आच्छाबल येथें असतां अमरनाथला जाण्याची आपली इच्छा स्वामीजींनीं व्यक्त केली व आपल्या शिष्य-कन्या भगिनी निवेदिता यांनीं पण यावें असें सुचविलें. पेहेलगांवहून अमरनाथला जाऊन परत येईपर्यंत श्रीमती ओलबुल व कु. मॅकलेऑड् यांनीं पेहेलगांव येथेंच राहण्याचें ठरविलें. पायीं यात्रेचा मुक्काम वाटेंत पडत असे त्या ठिकाणीं ३०००-४००० वस्तीचें तंबूराहुट्यांचें एक तात्पुरतें गांवच बनत असे व या गांवची सर्व मुलकी व्यवस्था काश्मीर सरकारतर्फे एका तहसिल-दाराकडे सोपवलेली असे. राहण्याची व्यवस्था, खाद्यपेयांचा पुरवठा, औषधपाणी या सर्व योजनांवर त्यांचें नियंत्रण असे.

यात्रेस जाणारा बहुजनसमाज भक्तिपूर्ण असला तरी विशेष शिकलेला असा बहुधा नसतोच. यास स्वामीजी व भ. निवेदिता हे दोन्ही यात्रेकरू अप-वाद असल्यानें तहशिलदारांचा व त्यांचा लौकरच परिचय घडून आला. पहिले मुक्कामींच त्यांचे तंबूशेजारीं भरवस्तींत यांचे पण तंबू ठोकण्यांत आले. भ. निवेदिता या परदेशी व परधर्मी व्यक्तीस हिंदुयात्रास्थानांत असें मध्यवर्ती ठिकाण राहण्यास देऊं नये अशी बऱ्याच यात्रेकरूंनीं

तक्रार केली. त्यास प्रत्युत्तर म्हणून स्वामीजींनीं एक युक्ति केली. धर्मादाय म्हणून थोडीशी पैशाची खैरात त्यांनीं भगिनींकडून करवली. लागलीच लोकमत अनुकूल होऊन त्यांचें भरवस्तींत राहाण्यास कोणी हरकत करीनासे झाले.

हिंदु व मुसलमान हे बाह्यत: वेगवेगळे धर्माचे असले तरी त्यांच्यांत किती सहिष्णुता असूं शकते व सांस्कृतिक व सामजिक दृष्ट्या दोन्ही समाज एकमेकांना किती जवळचे आहेत हें दाखविणारीं किती तरी दृश्यें भगिनींना त्याकाळीं काश्मीरमध्यें पाहावयास मिळालीं. येथील संस्थानिक हिंदु व बहुजनसमाज मुसलमान असूनसुद्धां राज्यकारभार सुरळित चालत असे. नांववाले बहुतेक मुसलमानच असत, तरीपण प्रवासी लोक हिंदु-मंदिराकडे चालले म्हणजे त्यांना कटाक्षानें जोडे काढून जाण्यास सांगत असत. यात्रेचे व्यवस्थापक तहसिलदार हे बहुधा मुसलमानच असत तरी त्यांना मंदिरापर्यंत जाण्यास कोणी बंदी करीत नसत. मोगल अमदानींत अकबर बादशाहानें दोन्ही धर्मांतील जनतेचें राष्ट्रीय व सामाजिक दृष्ट्या एकीकरण व्हावें म्हणून अनेक प्रयत्न केले होते हें पण स्वामीजी सांगत असत. त्याकाळींसुद्धां सर्वधर्मपरिषद् भरविण्यापर्यंत त्याची मजल गेली होती ही सामाजिक पार्श्वभूमि भगिनींच्या लक्षांत प्रथम आणून दिली ती स्वामीजीनींच.

तसेंच हिंदु व बौद्ध हे अगदीं भिन्न धर्म आहेत अशी साधारणत: सर्व पाश्चिमात्याप्रमाणें भगिनींची पण मतें होतीं. पण स्वामीजींनीं त्यांना इतिहासद्वारें असें पटवून दिलें कीं बौद्धधर्म हा वेगळा असा धर्म नसून हिंदुधर्माचेंच तें एक बंडखोर पिल्लूं आहे. त्यांतील बरीच मतें नंतर हिंदुधर्मांत संग्रहित करण्यांत आलीं व खुद्द गौतमबुद्ध हासुद्धां एक अवतार आहे असें हिंदूंकडून मानण्यांत येऊं लागलें. यापुढेंही जाऊन स्वामीजींनीं असें स्पष्ट केलें कीं ख्रिस्ती व मुसलमान धर्म हे पण याच विश्वधर्माचे दूरचे ठिकाणीं उठलेले प्रतिध्वनि आहेत.

वैदिक धर्माबद्दल व हिंदबांधवांबद्दल भगिनींना वरचेवर जास्त आस्था वाटूं लागली व या क्षेत्राचे बाहेर न पडतां याचे सेवेंतच आपलें जीवन व्यतीत करावेसें वाटतें असें त्या एकदां स्वामीजींना म्हणाल्या. अशानें जनतेचें कांहींतरी कार्य होईलच असें त्यांनीं सुचविलें.

पण स्वामीजी म्हणाले, "व्यक्तीच्या करण्यानें कोणतेंही कार्य होत नसतें. प्रगतीची लाट आली म्हणजे व्यक्ति हात लावून निमित्तमात्र होते. व्यक्तीच्या कर्तव्यतत्परतेनें जर कांहीं होत असेल तर तें एवढेंच कीं व्यक्ति स्वतःचा उद्धार करून घेते."

स्वतःचे कार्याबद्दल थोडाफार अहंकार उत्पन्न झाला तर तो नष्ट करण्यास ही मात्रा किती रामबाण आहे? भगिनी म्हणतात, "हे शब्द मला केवळ वेदतुल्य असे भासतात" एकाद्या सुखवस्तु माणसानें भुकेलेल्यांस अन्न दिलें तर त्यानें असें कधींही समजूं नये कीं त्याच्या दानामुळें त्यांची क्षुधा शांत झाली. त्यानें अन्न दिलें नसतें तरी कोणीतरी त्यांना अन्न दिलेंच असतें — कदाचित् कोणी मेजवानीही दिली असती. दात्याच्या अन्नदानामुळें क्षुधार्तावर कोणत्याही प्रकारचा उपकार होत नाहीं. होतें एवढेंच कीं देणाराची दानत वाढते व दानत वाढणें हा काय थोडा फायदा आहे? "तेन त्यक्तेन भुंजीथाः"

तीन-चार हजार यात्रेकरूंसमवेत स्वामीजी व भ. निवेदिता यांची अमरनाथ यात्रा व्यवस्थेशीर पार पडली व त्यांना अननुभूत अशा समाधानाची प्राप्ति झाली. या काश्मीर सफरींत स्वामीजींना रामकृष्ण मठासाठीं महाराजांकडून जागा मिळणार होती तें काम मात्र झालें नाहीं. अशी जागा देण्याची महाराजांची तीव्र इच्छा होती पण यासाठीं ससंदेची मंजुरी घेणें जरूर होतें. ससंदेपुढें विचारविनिमयासाठीं येणारे विषय ब्रिटिश रेसिडेंट हे निवडीत असत व त्यावेळचे रेसिडेंड मि. ॲड्लवर्ट यांनीं हा विषय आपल्या अधिकारांत यादींतून कमी करून टाकला. महाराजांचा पण

यावर कांहीं इलाज चालेना व जागा मिळणें बाजूलाच राहिलें पण त्याचा विचार होणें सुद्धां अशक्य झालें.

काश्मीरमध्यें योजलेला रामकृष्ण-मठ स्वामीजींचे मनश्चक्षूपुढें गेलें वर्षभर होता. यंदा श्रीनगरला आल्यानंतर त्यासाठीं एक सुरेखशी जागा पण त्यांनीं हेरून ठेवली होती व ती मिळण्याची त्यांना खात्री होती. पण आतां हें स्वप्नवत् ठरलें. स्वामीजींच्या विजिगीषु वृत्तीवर हा एक मोठाच आघात पडला व त्यांचे मनास मोठा धक्का बसला.

या आघातामुळें त्यांची चित्तवृत्ति विचलित होऊं लागली खरी, पण अशा वेळीं चित्तवृत्तीवर ताबा मिळविणाऱ्या ध्यानयोगाचा ते ताबडतोब आधार घेत असत. ताबडतोब एकांतसाधनेसाठीं दूर जाऊन* तेथें ते तीव्र साधनेनें जागतिक घटना विसरूं शकत असत. त्यांच्या शोधार्थ कोणी येऊं नये अशा सूचना ते देत असत व कांहीं दिवसांनीं परत आलेले स्वामी पहावे तों दिव्य तेज व अपूर्व शांतता यांनीं प्रफुल्ल होऊन गेलेले असे दिसत असत. ध्यानाचे साधनानें ते जगास कसे पूर्णपणें विसरत असत याचें एक उदाहरण भगिनींनीं लिहून ठेवलें आहे, त्याचा येथें जातां जातां उल्लेख करण्यास हरकत नाहीं.

अमेरिकेंत स्वामीजी राजयोगावर व्याख्यानें देत असत तेव्हां ध्यान-धारणेचे प्राथमिक अवस्थेंतील प्रात्यक्षिक करून दाखवीत असत. असें प्रात्यक्षिक म्हणून ते शिष्यांसमोर एकदां ध्यानस्थ बसले ते थोड्याच वेळांत स्थलकालाचे जाणिवेचे पलीकडे गेले व वर्गाची वेळ संपून गेली तरी त्याच अवस्थेंत राहिले. शिष्यगण हळूंहळूं एक एक चालते झाले व बऱ्याच वेळानें स्वामीजी देहभानावर आले. पाहतात तों वर्ग मोकळा.

---

*"The river is pure that flows"
The monk is pure that goes"
" वहता पानी – चलता साधु. "

शिष्यवर्गाची अशी गैरसोय झाल्यामुळें स्वामीजींना खजिल झाल्यासारखें वाटलें व तेथून पुढें ते ध्यानाचीं प्रात्यक्षिकें सावधपणें करूं लागले.

असो. मठाचे जागेसंबंधीं तीव्र निराशा झाल्यामुळें स्वामीजींना या खेपेस-सुद्धां एकांतसाधनेस जावेसें वाटलें व त्यामुळें ते एकटेच क्षीरभवानीकडे गेले. एक आठवडा तिकडे काढून ते परत आले तों पूर्वीचा भाव नष्ट होऊन त्यांना सर्व विश्व क्षीरभवानीमय अर्थात् कालीमय दिसूं लागलें. परत येतांना त्यांनीं बरोबर कांहीं फुलें आणलीं व तीं सर्व पाश्चात्य महिलांना कालीमाता म्हणून वाहून टाकलीं. "आतां कालीमातेशिवाय कांहीं नाहीं" असें म्हणून त्यांचा आवेग तीव्र झाला. कालीमातेनें कितीही संकटें बरोबर आणलीं असलीं तरी तिचें स्वागत करतांना स्वामीजी म्हणतात :—

"For Terror is Thy name
Death is Thy breath
And every shaking step
Destroys a world for ever.
Thou "Time" the All Destroyer,
Come, Mother, Come."‡

हें लिखाण तीव्रभावानें ओतप्रोत भरलेलें असल्यानें भगिनींनीं आपल्या 'कालीमाता' या पुस्तकांत अवतरण म्हणून घातलें. सात छोटे छोटे निबंध असलेलें "कालीमाता" हें भगिनींचें पुस्तक यानंतर लौकरच प्रसिद्ध झालें. या पुस्तकांतील एक लेख कु. लेगेट् या अमेरिकन् मुलीसाठीं म्हणून लिहिला होता व १८९८ च्या नाताळच्या सणानिमित्त

‡ "माते, प्राचीत तव रूप असेच आली,
आहे प्रसिद्ध तव नाम जगांत काली,
कीं भैरवी बहुभयंकर अर्थ पाहे,
त्वच्छ्वास तोच जगतावर मृत्यु आहे"

स्वा. विवेकानंद – समग्रग्रंथ.

भेट म्हणून तो तिला पाठविला होता. कालीचे स्वरूपाची बालकांनासुद्धां कल्पना यावी म्हणून हा लेख मुद्दाम लिहिला होता. कारुण्य, प्रेम, तळमळ व भक्ति अशा अनेक गुणांनीं युक्त असलेलें हें पुस्तक म्हणजे भगिनींचें पहिलेंच वाङ्मयीन अपत्य. महायोगी अरविंद घोष हे बडोद्यास असतांना त्यांच्या वाचनांत हें पुस्तक आलें व ते पण यांतील कालीमातेचें विविध व उपयुक्त स्वरूप पाहून भारावून गेले.

काश्मीरप्रवासाचे शेवटीं घडलेली चटकदार अशी एक घटना भगिनींनीं नमूद करून ठेवली आहे. ती अशी :—

या वेळेस काश्मीरमध्यें एका वनस्पतीला सुंदर व भरपूर मोहोर येत असतो. एकाजणानें हा मोहोर सप्रेम भेट म्हणून या प्रवाशांना दिला. साधारणतः फुलाचें फळांत रूपांतर झालें म्हणजे त्याचें जीवन सार्थ होतें अशी समजूत आहे. पण मोहोर तोडलेला असतो तेव्हां त्यापासून फलप्राप्ति होणार नसते, तरीपण देवाला अर्पण झाल्यामुळेंच त्याच्या जीवनाचें सार्थक होत असतें. ब्रह्मचारिणी निवेदितांना पण अपत्यें होणार नव्हतीं, तरीपण ईश्वरकार्यास स्वतः समर्पित झाल्यामुळें त्यांच्या जीवनाचें सार्थक होणार होतें. हा विचार त्यांचें मनांत येऊन त्यांना अतिशय समाधान वाटलें व अतिशय संयमित भावेनें त्यांनीं इतरांजवळ हा विचार व्यक्त केला. मोहोर हातांत घेऊन त्या म्हणाल्या, " स्वामीजी, या मोहोराला आतां फळें येणार नाहींत कारण ईश्वरार्पण होण्यासाठींच याची योजना आहे. " कु. नोबलच्या जन्मापूर्वींच त्यांच्या आईनें म्हटलें नव्हते कां कीं " माझे बाळंतपण सुखरूप पार पडल्यास होणारे बाळास मी परमेश्वरार्पण करीन. "

स्वामीजी आतां कांहीं कार्यासाठीं कलकत्त्याला गेले व त्या तीन पाश्चात्य महिलांना उत्तर भारताचा प्रदेश डोळ्यांखालून घालण्याची इच्छा असल्यानें त्यांनीं लाहोर, दिल्ली, आग्रा या प्रदेशांत दौरा काढला. बरोबर

स्वामी शारदानंद होते. लाहोर येथें भगिनींनीं उच्च व सुसंस्कृत समाजाशीं परिचय घडवून आणला तसेंच अगदीं हलक्या वस्तींतील लोकांचे जीवनाचें पण त्यांनीं निरीक्षण केलें. रामलीला नांवाचे ग्रामीण नाट्यप्रकार पण त्यांना तेथें पाहण्याचा योग आला. नंतर दिल्ली व आग्रा येथील मुसलमानी अमदानींतील किल्ले व राजवाडे वगैरे अवशेष त्यांनीं पाहिले. दिल्ली येथील इतिहासपूर्व राजवटी सोडून दिल्या तरी शेरशहा, अकबर या मुसलमान बादशहांच्या कारकिर्दी कितीतरी भरभराटीच्या गेल्या व तत्कालीन इंग्लंडमधील समाजस्थितीपेक्षां येथील समाजस्थिति सर्व दृष्टींनीं किती उच्च* दर्जाची होती याची त्यांना तेथील स्थापत्याचे अवशेषांवरून सुद्धां कल्पना आली.

×—×—×

* "What had been the England of Elizabeth in comparison with the India of Akbar."

*Swami Vivekananda*

# ४ : प्राथमिक तयारी

" सद्गुरूंच्या सान्निध्यांत पृथ्वीवर केवळ भ्रमण केलें तरी ती एक तीर्थयात्राच होते."

*भ. निवेदिता*

* * *

" न्यूटन्-डार्विन्चे देशबांधवांपेक्षां भास्कराचार्य व शंकराचार्य यांचे देशबांधव हलके आहेत कां ? मुळीच नाहीं."

*भ. निवेदिता*

* * *

" ही परदेशी महिला ( चरित्रनायिका ) नागरिक जीवनाचें अंग म्हणून जित देशांतील जनतेची वाटेल ती सेवा करण्यास तयार होते."

* * *

कांहीं महिने कलकत्त्याच्या बाहेर काढल्यानंतर भगिनी आतां कलकत्त्यास राष्ट्रीय कन्याशाळा काढण्यासाठीं रवाना झाल्या. पूर्वींचे प्रवासांत शाळेचे भावी स्वरूपाबद्दल थोडीशी वाटाघाट झाली होतीच. मूलभूत घटना एकाद्या संप्रदायास धरून असावी कीं असें कांहीं बंधन असूं नये याबद्दल स्वामीजींनीं त्यांना संपूर्ण स्वातंत्र्य दिलें होतें. तसेंच बहुजनसमाजास हातीं धरणें असल्यामुळें एखाद्या विवक्षित धर्माचें अनुष्ठान असावें कीं "सर्वधर्मी समानत्व" हें धोरण ठेवावें याचा पण विचार चालूच होता. भगिनींनीं सूचना केली होती कीं "एकाद्या विवक्षित संप्रदायाचें अगर धर्मपंथाचें बंधन असावें" व त्यास स्वामीजींनीं पुस्ती जोडली होती कीं "सुरुवातीस हें ठीक आहे पण यांमधूनच बंधनापलीकडे जाणें आहे."

राष्ट्रीय कन्याशाळा काढणें म्हणजे कांहीं विशेष असें कार्य आहे असें आजच्या पिढीस मुळींच वाटणार नाहीं. पण साठ वर्षांपूर्वी आपल्या समाजाची या बाबतींत काय स्थिति होती याचा इतिहास त्यांनीं डोळ्यां-खालून घातल्यास बरें होईल. फार कशाला भारत-रत्न डॉ. धोंडो केशव कर्वे हे आज सुद्धां सांगूं शकतील कीं त्यांना सुद्धां या कार्यांत किती कष्ट पडले होते. आज स्त्रियांची युनिव्हर्सिटी व तिचा भव्य पसारा कोणालाहि दिसतो आहे. पण याचें मूळ पाहिल्यास सुरुवातीस अशी स्थिति होती कीं मुलींना आग्रह करून शाळेंत बोलावून आणावें लागत होतें व कसा तरी ५-१० मुलींचा वर्ग चालवावा लागत असे. या पार्श्वभूमीवर चरित्राची घटना पाहिल्याशिवाय वाचकांना त्याच्याशीं एकरूप होतां येणार नाहीं. गुरुत्वाकर्षणाचे नियम आज शाळेंतील सर्व मुलांना माहीत असतात तरी पण न्यूटननें त्याचे काळांत हा महान् शोध लावल्याबद्दल त्याला धन्यवाद देणें रास्तच आहे.

आश्चर्य करण्यासारखी गोष्ट अशी कीं याचेही पूर्वी कलकत्त्यांत एक आदर्श कन्याशाळा चालू होती व ती एका महाराष्ट्रीय माताजी महाराणीनें चालवली

होती. माताजींचा जन्म अर्काटच्या राजघराण्यांत झाला होता व १८५७ च्या स्वातंत्र्यसमरांत भाग घेतल्याच्या आरोपावरून त्यांना कांहीं दिवस कैद भोगावी लागली होती. तेथून सुटल्यानंतर अध्यापन हेंच आपलें ध्येय ठरवून त्यांनीं कलकत्त्यांत महाकाली संस्कृत पाठशाला काढली होती. स्वा. विवेकानंद यांनीं या शाळेस भेट दिली तेव्हां माताजींचा सेवाभाव किती उत्कट आहे याची त्यांना कल्पना आली व हा आदर्श पाहून त्यांना सानंद कौतुक वाटलें. माताजींना बाहेरून मदत अशी कांहींएक नव्हती. त्या शाळेंतील मुलींबद्दल पूज्यभाव बाळगीत असत व त्यांची अध्यापनरूपी पूजा हीच त्यांना मोक्षप्राप्ति करून देईल असा त्यांचा विश्वास होता. “ ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति । ”

कलकत्त्यास आल्यानंतर भ. निवेदिता यांना शारदामातेच्या राहण्याच्या ठिकाणची एक खोली प्रथम देण्यांत आली. बागबाजारसारख्या कट्टर हिंदूंच्या भरवस्तींत युरोपियन व्यक्तीस जागा मिळणें हें सुद्धां त्यावेळीं अत्यंत कठीण होतें. पण केवळ स्वामीजींच्या वजनामुळें हें शक्य झालें व थोड्याच दिवसांत राहण्यास व शाळेसाठीं स्वतंत्र अशी जागा पण मिळाली व १८९८ सालीं विजयादशमीचे शुभ मुहूर्तावर श्रीगणेशा सुरू झाला.

रामकृष्ण मठासाठीं बेलूर येथें घेतलेल्या नवीन जागेवरील मठाच्या इमारतीचें काम यावेळेस पुरें झालें होतें व तेथें कालीपूजनाचा समारंभ शारदामातेच्या हस्तें याच मुहूर्तावर करण्यांत आला. मठाचे जागेची किंमत व इमारतीचा खर्च हा बहुतांशानें कु. मुलर व श्रीमती ओलबुल यांनीं पत्करला होत. स्वामीजींचे अनेक गुरुबंधु व शिष्य व स्वतः शारदामाता या दोन्ही समारंभास हजर होत्या.

येथून पुढें भगिनींच्या जीवनास अशी कांहीं विलक्षण दिशा मिळाली कीं हिंदमातेचे सर्वच क्षेत्रांत व सर्वच प्रमुख व्यक्तींचे सान्निध्यांत त्यांचें जीवन जणूं अष्टपैलू हिऱ्याप्रमाणें चमकून गेलें. जहालमवाळ, धार्मिक-

११५९१

अधार्मिक, गरीबश्रीमंत, काळागोरा, लहानमोठा, सुशिक्षितअशिक्षित हे सर्व भेद त्यांचेपुढें नष्ट होऊन गेले व त्यांचें व्यक्तिमत्व व कार्यबाहुल्य हे चोहीकडेंच प्रकट होऊं लागलें. कन्याशाळेपासून सुरू झालेल्या कार्याची व्याप्ति इतकी वाढली कीं शाळेचें कार्य त्याच्या एखाद्या कोपऱ्यांत सुद्धां मावणार नाहीं. काळाचीच योजना अशी होती कीं शाळेचे निमित्तानें इतर कार्यक्षेत्रांत अवर्णनीय असें कार्य त्यांचेकडून व्हावें. शाळा सुरू झाल्यानंतरचा सहासात महिन्यांचा काळ शाळेच्या दृष्टीनें प्रयोगात्मक ठरला व त्यांत अनपेक्षित असें कांहींच नव्हतें, पण याच काळांत भगिनींच्या सर्वसंग्राहक वृत्तीला किती तरी कार्यक्षेत्र मिळालें. बागबाजारमध्यें राहाण्यास आल्यानंतर त्यांचे घरकामास कोणी मोलकरीण मिळेना. इकडूनतिकडून कोणी मिळवून आणलीच तर तिच्या स्पृश्यास्पृश्यतेच्या विचित्र समजुतीमुळें ती टिकून राहात नसे. स्वयंपाक करणें सुद्धां न जमल्यानें कित्येक दिवस त्यांना फळें व दूध यांवर काढावे लागले. पण सर्वांशीं मैत्री व प्रत्येकाची सेवा करावी ही त्यांची वृत्ति आसपासचे लोकांचे नजरेंत हळूहळू भरूं लागली व पुढें पुढें त्यांनीं 'न सांगतांच त्यांच्या सर्व गरजा भागण्यासारखी परिस्थिति उत्पन्न झाली.

सौ. अबला बोस यांनीं त्यांना पूर्वीं सांगितलें होतें कीं येथील जनतेशीं तुमच्यासारख्या सुसंस्कृत महिलेस एकरूप होणें शक्य नाहीं. आतां त्या पुन: भगिनीकडे आल्या तेव्हां मात्र त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. हलकींसलकीं कामें करण्यास येथील भिकारीसुद्धां कचरतात पण ही सुसंस्कृत इंग्रज महिला हातांत फावडें घेऊन गल्ली साफ करण्यास सुद्धां तयार होते हें आश्चर्य नव्हे कां ? प्रत्येक प्राणिमात्राचें ठिकाणीं ईश्वराची वस्ती असते व जनतेची सेवा म्हणजेच ईश्वरसेवा होय ही भावना आमचे पुस्तकांतच राहाते व ही परदेशी महिला मात्र नागरिक जीवनाचें एक

अंग म्हणून जित देशांतील जनतेची वाटेल ती सेवा करण्यास तयार होते हें आश्चर्य खरेंच.

श्रीरामकृष्ण परमहंस हे आपल्या साधनेची प्रथमावस्था म्हणून स्वतःस पूर्णपणें विसरून जात असत; आपण कोण व कोठें, आहोंत तें त्यांच्या लक्षांतही येत नसे हें भगिनींनीं ऐकलें होतें व मनांत सांठवून ठेवलें होतें. त्या स्वतः पण आपलें इंग्लंडमधील सुसंस्कृत जीवन पूर्णपणें विसरून जाऊन येथील जनतेशीं एकरूप होण्याचा प्रयत्न करीत असत. तरीपण त्यांना हें साधलें हें पाहून सौ. बोस यांना मात्र आश्चर्यच वाटलें व त्यांचा स्नेह पुढें इतका वाढला कीं जिवावरचे आजारीपणांत परस्परांनीं एकमेकींसाठीं आपलें सर्वस्व वेचलें. असो. अंगीकृत कार्यासाठीं भगिनींनीं अशा तऱ्हेनें इतके अपरिमित कष्ट घेतले कीं त्यांची कणखर अशी देहयष्टि मात्र अक्षरशः हळूहळूं झिजत चालली.

श्रीरामकृष्ण यांच्या धर्मपत्नी शारदादेवी यांना सुद्धां भगिनींच्या स्वार्थ-त्यागी व दिव्य जीवनाचें आश्चर्य वाटत असे. त्यांनीं त्यांना प्रथम आपल्या भक्तमंडळीपैकीं एक व नंतर तर मुलीप्रमाणें मानलें व खुकी (छोकरी) म्हणूनच त्या त्यांना हांक मारीत असत. शारदामाता व स्वा. विवेकानंद यांचा पाठिंबा ही केवढी मोठी शक्ति आहे याची कल्पना त्यांचे जीवनाची ज्यांना कल्पना आहे त्यांनाच येईल. स्वामीजींचे सर्व गुरुबंधु व शिष्यसमुदाय भगिनीचे कोणत्याही कामांत त्यांना शक्य ती सर्व मदत करीत असत व त्यामुळें त्यांना हिंदमातेसाठीं अतुलनीय असें कार्य करतां आलें. स्वामीजींचे बाबतींत भगिनी म्हणतात, "ज्या भूमीनें हें नररत्न आम्हांस दिलें तिचा,सदा विजय असो. ज्यांच्या प्रेरणेनें तें प्रकट झालें त्यांचा विजय असो. त्यांनीं केलेल्या कार्याचा अंतिम हेतु जाणण्याची बुद्धि आम्हांस नाहीं."

बंगाल हा कालीपूजेचा देश आहे. पण भगिनींना कालीपूजेचें तत्त्व आत्मसात् करतां येणें हें सोपें नव्हतें. अगोदर मूर्तिपूजा व तीही काली-



श्री शारदा-माता

सारख्या अक्राळविक्राळ व नरमुंडधारी मूर्तीची पूजा याचा अर्थ सुद्धां पाश्चात्यांना कळणें कठीण. पण जणूं कांहीं आपण दुसऱ्या कुळांत व वंशांत पुनः जन्म घेतला आहे व येथेंच आपलें नियोजित कार्यक्षेत्र आहे या भावनेनें त्यांनीं हे सर्व संस्कार समजावून घेऊन पचनीं पाडले. काली-मातेचा शाप म्हणजे सुद्धां एक वरदान आहे हें समजण्यापूर्वी कालीदेवतेचा तात्त्विक अर्थ काय आहे हें समजणें जरूर आहे. कालीपूजा ही आध्या-त्मिक साधनेची प्राथमिक अवस्था आहे व या मार्गानें शेवटीं परब्रह्मज्ञान हेंच ध्येय साध्य करणें आहे. मार्गांत असतांना कधीं सुखांत तर कधीं दुःखांत, कधीं आरामांत तर कधीं धडपडत जीवन व्यतीत करावें लागतें. कोणत्याही अवस्थेंत चित्त शांत ठेवण्याचा अभ्यास हळूहळू करावा लागतो. कालीचा शाप प्रथम दृष्टीस अप्रिय वाटला तरी चित्तवृत्तिनिरोध करण्याचे दृष्टीनें तो उपकारच ठरतो व हळूहळू मनःशांति प्राप्त होत जाऊन त्या द्वारें सावकास ब्रह्मज्ञान व्हावें अशी योजना या साधनेंत आहे. काली स्वतःच्या भक्तांवर संकटांची खैरात करीत असते याचें कारण यांतूनच पुढें उज्वल मार्ग सांपडणार असतो. “काळोखी रात्र आल्याशिवाय सूर्योदय होत नाहीं” हा विचार करून कालीभक्त संकटांना भीत नाहीं व कालीचा शाप सुद्धां वरदानाप्रमाणें मानतो. आईनें बालकाला मारलें म्हणून बालक आईपासून दूर जात नाहीं तर तिलाच जास्त जास्त घट्ट धरून ठेवतें तेंच नातें येथें उत्पन्न होतें.

स्वामीजींच्या दिव्य दृष्टीनें हेरलें कीं भारतभूमीच्या तेव्हांच्या परि-स्थितींत असे कणखर साधक निर्माण होतील तर ते सर्वच क्षेत्रांत अग्रगण्य होऊन देशाचा संपूर्ण उद्धार करूं शकतील. जो संकटास भीत नाहीं, त्याचेवर संकटें कमी येतात व जो मरण्यास तयार आहे त्याला मारण्यास सहसा कोणी तयार होत नाहीं, हा वीरांचा संदेश आहे. “तळहातावर स्वतःचें शिर घेऊन कार्यक्षेत्रांत उतरणारे दोन हजार वीर मिळतील तर

भारतभूमीचा कायापालट ताबडतोब होऊन जाईल" असें स्वामीजी म्हणत असत.

कालीमूर्तीची पूजाअर्चा करणें त्याचप्रमाणें प्रत्येक स्त्रीमध्यें तिचा अंश आहे ही भावना दृढ करणें या दोन्हीं गोष्टी कालीभक्तीमध्यें येतात. श्रीरामकृष्ण परमहंस यांनीं दोन्ही प्रकारच्या साधना इतक्या तीव्रतेनें केल्या कीं स्वतःचे लग्नाचे पत्नीकडे सुद्धां कामुक अभिलाषानें न पाहतां कालीभावानें ते पाहूं लागले. त्यांच्या पत्नी बालवयांत माहेरीं असतांना तिकडेच प्रौढ झाल्या व नंतर आपल्या पतीकडे आल्या तेव्हां श्रीरामकृष्णांची ही भावना दृढ झाली होती. त्यांनीं त्यांचे पालनपोषणाचा व शिक्षणाचा भार मान्य केला पण "पत्नी म्हणून मी तुमचेकडे पाहूं शकत नाहीं" असं स्पष्ट त्यांना सांगितलें. पत्नीनें पण शेवटीं शिष्या म्हणून राहण्याची तोड काढली व दिव्य जीवनाचे संगतींत शारदामातेचें पण जीवन दिव्यच होऊन गेलें.

याशिवाय जुन्या पिढींत न दिसून येणारे किती तरी विशेष गुण शारदामातेच्या ठिकाणीं भगिनींना दिसून आले. कट्टर हिंदू असून सुद्धां त्यांची वृत्ति इतकी सर्वसमन्वयात्मक होती कीं ख्रिस्ती प्रार्थना कशी असते, त्यांचे लग्नविधि कसे होतात व तेव्हां कोणत्या वचनांनीं ते परस्परांना बांधून घेतात अशा गोष्टींसुद्धां ते भगिनींना विचारून घेत असत व औत्सुक्यानें ऐकत असत. अशी सर्वधर्मसमन्वयात्मक वृत्ति पाहून भगिनींना त्यांचेबद्दल जास्त जास्त आदर वाटूं लागला व त्या त्यांना कालीमातेइतक्याच पूज्य मानूं लागल्या.

श्रीरामकृष्ण समाधिस्थ होऊन यावेळेस बारातेरा वर्षें लोटलीं होतीं. त्यांचे पश्चात् त्यांचे भक्तगण माताजींना श्रीरामकृष्णाइतकेच पूज्य मानीत होते. शारदामाता जेव्हां कलकत्त्यास राहात असत तेव्हां श्रीरामकृष्णांचे स्त्रीभक्त त्यांचेकडे वरचेवर येत जात असत व राहात असत. भगिनींचें निवासस्थान



श्रीरामकृष्ण परमहंस

अनुक्रम ३९८९३ दि: ...
क्रमांक ...९०२६... नों. दि: ...

पण नजीकच्च असल्यानें त्यांचा या भक्तसमुदायांशीं दाट परिचय घडून आला. त्यांचे परिचयामुळें भगिनींच्या जीवनावर अनेक दृढ संस्कार कसे होत गेले हें पाहणें मनोरंजक आहे.

गोपालेर-मा या श्रीरामकृष्णांच्या भक्तांपैकीं अत्यंत वृद्ध अशा होत्या. श्रीरामकृष्णांशीं ओळख होण्यापूर्वीं त्या कृष्णभक्ति वात्सल्यभावानें करीत असत. स्वत: यशोदामाता आहों या भावानें त्यांनीं रांगत्या कृष्णमूर्तीचे लाड करावयाचे व पूजा करून त्यांत त्या तन्मय होऊन जावयाच्या. श्रीराम-कृष्णांची प्रथम गांठ पडली तेव्हांपासून त्या त्यांना पण याच भावानें पाहूं लागल्या. गोपाळाला खाऊं घालावें, त्याप्रमाणें त्या श्रीरामकृष्णांना भरवीत असत व या मार्गानेंच त्यांनीं आपली साधना उच्च दशेस नेली होती. स्वत: अत्यंत कर्मठ असतांना देखील व उतारवयांत सुद्धां भगिनींशीं रोटी-व्यवहार करण्यास त्यांना संकोच वाटत नसे. कारण प्रत्येक मानवाकडे गोपाळभावानें पाहण्यास त्यांनीं आतां सुरुवात केली होती. त्यांच्या निवासस्थानीं भगिनी गेल्या तेव्हांची परिस्थिति व त्यांच्या भावना इतक्या सुंदर रीतीनें भगिनींनीं वर्णिल्या आहेत कीं त्याचें भाषांतर रसभंग झाल्याशिवाय होऊंच शकणार नाहीं. "Master as I saw him" हें त्यांचें पुस्तक वाचकांनीं एकदा वाचावेंच म्हणजे त्यांना अनुभव येईल कीं लेखिकेप्रमाणें आपणही दिव्य वातावरणांत डुंबत आहों.

लक्ष्मी-दिदी यांच्याशीं पण भगिनींचा अत्यंत परिचय झाला होता. ह्या भजन व कीर्तन करीत असत व त्यांत पूर्णपणें रंगून जात असत. उत्सवप्रसंगीं स्वत: कृष्णाचें अगर कालीचें रूप घेऊन उत्कृष्ट अभिनय करून प्रेक्षकांची करमणूक करीत असत, तसेंच मूकसंवाद करून दाखवून निरनिराळे भाव चेहऱ्यावर व्यक्त करीत असत. अशा प्रसंगीं बहुश: फक्त स्त्रीसमाजच हजर राहात असे त्यामुळें त्यांचें काम निःसंको-चतेनें व तद्रूपतेनें होत असे. एकदां लक्ष्मीदिदींनीं जगद्धात्रीचें रूप धारण करून त्यांत त्या अतिशयच तद्रूप झाल्या व श्रोतृवर्गपण

अतिशय आकर्षित झाला. इतक्यांत भगिनींनीं गुरगुर करीत सिंहिणीची भूमिका घेतली व दोन्ही हात पुढच्या पायाप्रमाणें जमिनीवर टेकवले. आपल्या वाहानावर लक्ष्मीदिदी पण आरूढ झाल्या व इकडे तिकडे जाऊं लागल्या तेव्हां उपस्थित स्त्रीसमाजाची हसून हसून मुरकुंडी वळली. भगिनी या हिंदवासीयांशीं किती एकरूप झाल्या होत्या तें या एका घटनेवरूनच स्पष्ट होईल. " लक्ष्मी दिदी " यांस प्रतिशब्द म्हणून त्यांनीं आपले ग्रंथांत " Sister Lucky " हा शब्द वापरला आहे. किती अनुरूप प्रतिशब्द !

याशिवाय योगिन-मा, गुलाब-मा अशा अनेक स्त्री-भक्तांचा पण परिचय भगिनींना अनेक दृष्टींनीं उपयुक्त ठरला. " Cradle Tales of Hinduism " म्हणून त्यांनीं पुढें एक पुस्तक लिहिलें * त्यांत त्यांनीं नमूद केलें आहे कीं योगिन-मा यांच्याकडून त्यांना या पुस्तकासाठीं बरीच माहिती मिळाली.

कालीमातेला प्रथम न मानणारे स्वामी विवेकानंद मागाहून कालीभक्त कसे बनले याची हकीकत त्यांनीं स्वत: भगिनींना सांगितली ती सुद्धां उद्बोधक आहे. स्वामीजींचें शिक्षण पुरें होण्यापूर्वींच त्यांचे वडील एकाएकी वारले होते. जवळ पैसा नव्हता, वडिलांनीं ठेवलेलें कर्ज बरेंच फेडावयचें होतें, नोकरी मिळत नव्हती आणि आई व धाकटे बंधु यांच्या निर्वाहाचा भार स्वामीजींवर पडला होता. स्वामीजी ( तेव्हांचे नरेंद्र ) अत्यंत अस्वस्थ झाले. मधून मधून अक्षरश: उपासमार होऊं लागली व काय करावें हें त्यांना सुचेना. श्रीरामकृष्णांजवळ त्यांनीं याचना केली कीं " तुमच्या कालीला सांगून माझें दु:खहरणाची कांहीं व्यवस्था करा. स्वत:

---

* " Cradle Tales of Hinduism " यांतील बऱ्याच कथा स्वातंत्र्योत्तरकालांत शालेय क्रमिक पुस्तकांतून दिल्या जात आहेत.

माझेबद्दल तितकीशी चिंता नाहीं, पण माझेवर अवलंबून असणारांची तरी उपासमार थांबावी एवढें मागणें तुम्ही देवीजवळ मागा."

श्रीरामकृष्ण म्हणाले, "पण तूं तिला मुळीं मानीतच नाहींस ना? माझ्याबद्दल म्हणशील तर मी धन-संपत्ति असें दान कधीं तिच्याकडे मागितलें नाहीं. तें आतां तरी कसें मागूं? तरीपण तुला वाटल्यास तूंच तिच्याकडे जा व काय मागणें असेल तें माग."

ऐहिक वस्तूंबद्दलची गुरूंची निरिच्छता शिष्यांत हळूहळू नकळत समाविष्ट झाली. स्वामीजी मंदिरांत गेले ते मातेच्या दिव्य रूपानें इतके भारावून गेले कीं त्यांनीं "मला भक्ति व ज्ञान दे" एवढेंच मागणें मागितलें व परत आले.

गुरुजींना हकीकत कळल्यावर त्यांना त्यांनीं पुनः मातेकडे पाठविलें तरी त्यांनीं हेंच मागणें मागितलें व तिसरे वेळीं पाठविलें तरी हुबेहूब हाच प्रकार घडला. पैसा-नोकरी-चाकरी यांची मागणी करण्याचें त्यांना ध्यानच राहिलें नाहीं. स्वामीजी म्हणाले, "या प्रसंगांनंतर मात्र मी कालीभक्त झालों." भक्तांचा भक्तिभावसुद्धां माता स्वतःच वाढवीत असते हें पण त्यांचे ध्यानांत आलें. असो.

शाळेच्या कामाचा व्याप जसजसा वाढत गेला तसतशी जास्त द्रव्य-साहाय्याची गरज भासूं लागली. उत्कंठा, तळमळ व कार्यक्षमता हे गुण कितीही प्रमाणांत उपलब्ध असले तरी संस्था चालविण्यास पैसा हा पाहिजेच. म्हणून इंग्लंड व अमेरिका येथें प्रचारकार्य करून व पुस्तक-लेखनाचें काम करून पैसा मिळविण्याचे हेतूनें भगिनींनीं परदेशीं जाण्याचें ठरविलें. स्वामी विवेकानंद व स्वामी तुरियानंद यांना पण या सुमारास तिकडे प्रचारकार्यार्थ जाणें होतेंच. म्हणून ते तिघेही १८९९ चे मध्य-कालीं कलकत्याहून निघाले. मागच्याप्रमाणें भगिनींना गुरुजींच्या निकट परिचयाची आणखी एक दीर्घ अशी संधि मिळाली व तिचा त्यांनीं पुरेपूर

फायदा घेतला. बोटीच्या या प्रवासांत कशाकशाचें विवेचन झालें यापेक्षां कशाचें झालें नाहीं हाच प्रश्न आहे. स्वामीजी अनेक विचार सहज-स्फूर्तीनें प्रकट करीत असत आणि भगिनी हे सर्व विचार आत्मसात् करून तारीखवार नोंद करून ठेवीत असत. आत्मज्ञानप्राप्तीचे तीन उपाय भगवद्गीतेंत सांगितले आहेत :—

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।
उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्वदर्शिनः ॥

गुरूबद्दल पूज्यबुद्धि धारण करून, प्रश्न उपप्रश्न करून व त्यांची वैयक्तिक सेवा करून आत्मज्ञान प्राप्त होतें. यापैकीं पहिल्या दोन्ही मार्गांचा पुरेपूर उपयोग भगिनींनीं केला पण वैयक्तिक सेवा मात्र स्वामीजी त्यांना करूं देत नसत. या शिष्येच्या बाबतींत त्यांनीं आणखी एक नातें मानलें होतें व तें म्हणजे पिता व कन्या यांचें. ते म्हणत असत " पिताजींची सेवा करण्यास पुष्कळजण उपलब्ध असतांना कन्येनें त्यांची सेवा करण्याचें कारण नाहीं." भगिनी म्हणतात, " मी स्वामीजींना कधींकाळीं लेखणी अगर सुई टांचणी दिली असेल एवढेंच. याचेपलीकडे त्यांचें वैयक्तिक असें कोणतेंच काम करण्याचा मला प्रसंग आला नाहीं." सुमारें एक महिन्याच्या या बोटीच्या प्रवासांत गुरुमुखांतून निघालेलीं वचनें संगृहित करणें, थोडें लेखन करणें व थोडेंसें शिवणकाम यांशिवाय इतर कशाकडेही त्यांनीं लक्ष दिलें नाहीं असें भगिनी म्हणतात. या अनेक वचनांपैकीं नमुन्यादाखल थोडींशीं वचनें खालीं दिलीं आहेत :—

( १ ) " राष्ट्रांत आध्यात्मिक उन्नतीची लाट आधीं येऊन जाते व त्यानंतर वीरवृत्ति, जयिष्णुवृत्ति तसेंच आधिभौतिक विज्ञानवाद यांचा संपूर्ण परिपोष होतो. गौतमबुद्धानें समाजाच्या जीवनांत त्याग, सेवा, शांतता, दया या गुणांचा उठाव आपल्या धर्मद्वारें केला. त्याचे पाठोपाठ त्याच शिकवणीच्या आधारावर अशोकासारख्या चक्रवर्ती राजानें सर्व

भारतवर्षाचें एकत्रित व अखंडित असें राज्य स्थापन केलें व देशोदेशीं धर्मप्रचारक पाठवून विजय संपादन केला. त्याचें पाठोपाठ भारतांत सर्व प्रकारच्या विद्या, कला व वाङ्मय यांचा जोरांत उठाव झाला व भारतवर्षाची कीर्ति जगभर पसरली. आध्यात्मिक उन्नति साध्य करून घेतली म्हणजे सर्व प्रकारची आधिभौतिक उन्नति तिचे पाठोपाठ येते."

(२) "परमेश्वराचे अवतार होऊन गेल्यानंतर त्यांचे नामजप समाजांत होत असतात. देहधारी व्यक्तीमध्यें गुणाबरोबर अवगुणही सापडतात. पण 'नाम' म्हणजे केवळ गुणांचाच आदर्श व त्यांत अवगुणाचा विचार येत नाहीं व म्हणून साधनेस 'नाम' अत्यंत उपयुक्त आहे. व्यक्तिशः तुमच्या जीवनापेक्षां तुमचें नांव हेंच अधिक शुद्ध, बुद्ध व परिपूर्ण असें नाहीं कां?"

(३) "शिष्यत्वाचे अवस्थेमध्यें ज्ञानग्रहण करणें एवढेंच कार्य करावयाचें असतें. कार्यशक्तीला वाव द्यावयाचा असतो तो या अवस्थेनंतरच्या स्वतंत्र अशा अवस्थेंत."

(४) "उपनिषदांचा संदेश हाच कीं 'सामर्थ्यसंपन्न व्हा'. गौतमबुद्धाला अहिंसा व अप्रतिकार यांचा प्रसार करावयाचा होता हें तात्त्विक दृष्ट्या ठीक आहे. पण समाजांत सामर्थ्यच नसल्यामुळें कधींकधीं अहिंसेचें व अप्रतिकाराचें ढोंग केलें जातें व तें अगदीं गैर आहे. सामर्थ्यसंपन्न इसमालाच अप्रतिकारी होणें शोभतें.

पण सामर्थ्यसंपन्न माणसाला प्रतिकार करण्याचें कारणही पडत नाहीं. कारण त्याच्या सामर्थ्यामुळेंच शत्रु चार पावलें दूर राहातात व अप्रतिकार आयताच साधतो. जेथें शक्ति तेथेंच निर्भयता व जेथें निर्भयता तेथेंच अप्रतिकार. उलटपक्षी अंगांत शक्ति नसेल तर भीतीमुळेंच प्रतिकाराची मनांत कल्पना येते."

( ५ ) " हिंदुस्थानांत गोऱ्या लोकांनीं राहावयाचें तर राज्यकर्ते म्हणून राहाणें ठीक नाहीं.' त्यांनीं काळ्या लोकांचे हुकमतींतच राहिलें पाहिजे."

( ६ ) " योगमार्गांत प्रगति चालू असतांना एकाद्या साधकाची गति कुंठित होते व अशा अवस्थेंत त्याचा देहपात झाला तरी त्याची साधना वायां जात नाहीं. पुढचे जन्मांत तो पूर्वींची साधनसामुग्री घेऊनच येतो व या सामुग्रीचा त्यास आयता उपयोग होतो. योगभ्रष्टांना पुनर्जन्म मिळतो तो शुद्ध चारित्र्यसंपन्न व ऐश्वर्ययुक्त अशाच कुळांत – कधीं कधीं राजकुळांतही मिळतो. राजेलोकांना मधून मधून वैराग्याची लहर येते म्हणतात त्याचें कारण त्यांचे पूर्वजन्मीचे संस्कार हेंच होय. जनकराजा विरक्त होता याचें कारण त्याचे पूर्वजन्मसंस्कार. अकबर बादशहाला आपण पूर्वजन्मीं कोण होतों याची अंधुकशी आठवण येत असे व या संस्कारास अनुसरून त्याचें राजकाज चालत असे. पूर्वजन्मीच्या साधकावस्थेच्या संस्कारामुळेंच गौतमबुद्धाला विरक्ति उत्पन्न झाली व त्यानें राज्यत्याग केला.

स्वामीजींच्या संवादांतून सर्व जगांतील धर्म, संस्कृति, परंपरा व इतिहास यांचा उल्लेख वरचेवर होत असे. - वेदकालीन, रामायण-महाभारतकालीन तसेंच पौराणिक कालांतील अनेक व्यक्तींचे जीवनकार्याबद्दल माहिती दिली जात असे. पौर्वात्य व पाश्चिमात्य ऐतिहासिक व्यक्तींच्या पण जीवनकार्याचा उल्लेख होऊन त्यांची तुलना कधींकधीं केली जात असे. स्वामीजींना भेटलेले संतमहंत, तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रांतील कार्यकर्ते यांची ओळख करून दिली जात असे. वैदिकधर्माचें सर्वसंग्राहकत्व कसें आहे व कितीही पंथ-उपपंथ उत्पन्न झाले तरी त्यांतील एकसूत्रीपणा कसा टिकून आहे याचा वरचेवर उल्लेख होत असे. गौतमबुद्धाचे जीवनतून कितीतरी स्फूर्ति जगास मिळाली आहे याचा वरचेवर निर्देश होत असे व वैदिकधर्माचे बौद्धधर्माशीं संबंध कसकसे होते यांचें विवरण केलें जात असे. आणि या सर्व विचारांच्या पार्श्व-

भूमीवरून भारतवर्षाची सर्वांगीण उन्नति कशी करतां येईल याबद्दल विचार करण्यास चालना मिळत असे.

इंग्लंडला पोचल्यावर भगिनींनीं आपलें नियुक्त कार्य व्याख्यानद्वारां करण्यास सुरुवात केली. यापुढील अडीच वर्षेपर्यंत इंग्लंड, अमेरिका व व फ्रान्स या तिन्ही ठिकाणीं त्यांनीं प्रचारकार्य केलें. फ्रान्सला गेल्यानंतर श्री. जगदीशचंद्र बोस व त्यांच्या पत्नी यांची व त्यांची गांठ पडली.

पॅरिस येथें त्यावेळीं पदार्थविज्ञानशास्त्रज्ञांची सर्वराष्ट्रीय परिषद् नियोजित केली होती व त्यासाठीं हिंदुस्थानमधून श्री. बोस हे निमंत्रणावरून आले होते. वनस्पतींच्या संवेदनक्षमतेबाबत त्यांनीं लावलेले क्रांतिकारक शोध आतां जगप्रसिद्ध झाले होते. इलेक्ट्रो-कार्डियोग्राफ्, मॅग्नेटिक् क्रेसोग्राफ् व रेझोनंट-रेकॉर्डर अशीं तीन उपकरणें त्यांनीं अपार मेहनत घेऊन स्वतः तयार केलीं होतीं व त्यांवरून ते तेथें प्रात्यक्षिकें करून दाखवीत होते. जित म्हणून मानलेले देशांतील काळ्या कातड्याच्या इसमानें असें क्रांति-कारक संशोधन केलें म्हणून भ. निवेदिता यांनीं त्यांचें अत्यंत कौतुक केलें.

फ्रान्समध्यें त्यावेळीं स्वामीजी पण आले होते व हा काळ सर्वांना आनंददायक व उत्साहवर्धक असा गेला. वनस्पतिसृष्टि व जीवसृष्टि यांच्यांतील संवेदनात्मक भेदरेषा अत्यंत अंधुक व अनिश्चित असून कांहीं संवेदना तर दोन्ही सृष्टींना सामान्य आहेत हा शोध चर्चिला जात असे व त्यावरून " अनेकांतील एकत्व " ( Unity in diversity ) हें वेदांत-तत्त्व प्रत्यक्षांत सिद्ध होण्याचे दृष्टीनें एक मोठा टप्पा गांठला जात होता. शास्त्रसंशोधन व अध्यात्म अशा गहन विषयांशिवाय ही मंडळी सामाजिक जीवनसुद्धां आनंदमय कसें करतां येईल इकडे लक्ष देत असत यांत नवल नाहीं.

करमणूक म्हणून त्यांनीं यावेळीं पॅरिस येथें एक वेड्यांचा बाजार भरविला होता. Congress of Cranks या नांवाच्या परिषदेंत अनेक शहाण्यांनीं भाग घेतला होता व भगिनींनीं तत्वज्ञाची भूमिका घेतली होती. दु:खमय जीवनाची झळ आपणांस कशी न लागूं द्यावी याविषयीं त्यांना बोलावयाचें होतें व "सुखं हि दु:खान्यनुभूय शोभते" या तत्त्वाचें स्पष्टीकरण करावयाचें होतें. भोजनाची रुचि प्राप्त करून घेणें असेल तर झणझणीत अशी चटणी चाटीत जावी म्हणजे कोणतेंही व कसलेंही अन्न त्यापुढें गोडच लागतें, तसेंच कालीमातेचा प्रसाद म्हणजेच संकटांची परंपरा व अशा अनेक संकटांतून तावूनसुलाखून बाहेर पडणारे व्यक्तीस कसलेंही जीवन कठीण वाटत नाहीं हा मुद्दा त्यांना स्पष्ट करावयाचा होता.

वेड्यांचे बाजारांत विचारविनिमयाचा सौदा चालू होता इतक्यांत दारांतून भगिनींचा आवाज आला. "आयुष्यांतील विपत्ति दूर करण्याचें व जीवन सुखमय करण्याचें कार्य साध्य होतें तें चटणीच्या योगानें. चटणी व काली या दोन्ही साधनांनीं आयुष्य सुखमय होतें."

चटणी व काली-माहात्म्यावर त्यांनीं जास्त भाषण केलेंच नाहीं. कारण त्यांना एककल्लीपणा ( Crankness ) पुराच दाखवावयाचा होता.

पाश्चात्य ललनांना आपण पुरुषांपेक्षां फार वरच्या दर्जाचे प्राणी आहों असें वाटतें व या प्रकाराचें विडंबन करण्याचें आतां भगिनींनीं ठरवलें. प्रेक्षकसमुदायांत एक अपमानास्पद घटना घडत आहे असें सांगून रागारागानें त्या म्हणाल्या :—

"तो पाहा पुरुषजातीचा एक प्राणी माझ्या महिलेच्या भाषणाकडे दुर्लक्ष करून भलतीकडेच लक्ष देत आहे. स्त्रीजातीविषयीं इतकी अवहेलना हा सभ्य स्त्रीचा भयंकर अपमान आहे. बस्. आतां मी जास्त बोलूंच शकत नाहीं" या शब्दांत त्यांनीं आपला फणकारा व्यक्त केला.

प्रेक्षकांनीं त्यांची अनेक तऱ्हांनीं समजूत घातली. असें दुर्लक्ष कोणी करीत नाहीं व केलें असल्यास त्याबद्दल दिलगिरी पण व्यक्त करण्यास आम्ही तयार आहों असें त्यांनीं सांगितलें. पण व्यर्थ. भगिनींनीं उत्तर केलें:—"मी स्वतः स्त्री व पुरुष हे समानच मानतें पण येथें मुद्दा हा आहे कीं या नराधमानें स्त्रीजातीचा कां अपमान करावा ?" असें म्हणून त्यांनीं तोंड बंद केलें व इतर शाहाण्यांना बोलण्यास संधि दिली.

असो. श्री. बोस यांचे संशोधनामुळें पाश्चात्य शास्त्रज्ञांपैकीं कांहींना त्यांचा हेवा वाटूं लागला, कारण त्यांचें महत्त्व कमी होऊं लागलें. त्यांनीं त्यांच्या मार्गांत अनेक विघ्नें आणण्यास सुरुवात केली. इतक्या सुसंघटित अशा विघ्नांना टक्कर देतांना ते टेकीस येऊन आजारी पडले व ऑपरे-शनसाठीं त्यांना लंडन येथें नेण्यांत आलें. भगिनींच्या मातेनें आपलें विंबल्डन् येथील छोटेसें घर त्यांच्या दिमतीस दिलें, येथें बोसदांपत्य व भगिनी राहात असत व आई व मुलें हीं तात्पुरतीं दुसरीकडे राहण्यास गेलीं. श्री. व सौ. बोस या दोघांचेही आजारीपणांत त्यांची सेवाशुश्रूषा भगिनींनीं अत्यंत आनंदानें केली व श्री. बोस यांना धीर दिला.

ही वेळ म्हणजे एकोणिसावे व विसावे शतकाचा बरोबर संधिकाल होय. स्वामीजींचे युरोप-अमेरिकेंतील कार्य आतां संपलें होतें व ते हिंदुस्थानांत परत जाण्यास निघत होते. सतत कष्टानें त्यांच्या देहयष्टीवर बराच ताण पडला होता व त्यांच्या जाज्वल्य क्षात्रवृत्तीचें रूपांतर उच्चतर व गंभीर अशा अवस्थेंत होऊं लागलें होतें. ऐहिक घटनांविषयीं एक प्रकारचा उदासीनपणा त्यांचे मनांत जागृत होत होता व स्वतः म्हणजे केवळ कालीमातेच्या हातांतील बाहुलें आहों असे विचार त्यांचे मनांत वरचेवर डोकावूं लागले होते. युरोपांतून हिंदुस्थानांत येण्यासाठीं निघतांना भगिनींना त्यांनीं शुभ आशीर्वाद दिला. ते म्हणाले, "मी तुम्हांस तयार केलें असेल तर या जीवनाचे धकाकींत तुम्ही नष्ट व्हाल. परंतु जर

कालीमातीनें तुम्हांस तयार केलें असेल तर तुम्ही तगून राहाल" आशय असा कीं तुम्ही तुमचे नियोजित कार्यास पुरून उराल कारण कालीमातेनेंच तुमची तयारी केली आहे व मी निमित्तमात्र होतों इतकेंच.

यानंतर स्वामीजींनीं भगिनींना मुद्दाम पत्र पाठवून आपल्या शुभेच्छा व्यक्त केल्या त्यांत हुबेहुब याच विचाराचें प्रतिबिंब पडलें आहे. तें कविताबद्ध पत्र असें :–

"The mother's heart, the hero's will
The sweetness of the southern breeze,
The secret charm and strength that dwell,
On Aryan alters, flaming, free.
All these be yours and many more
No ancient soul could dream before
Be thou to India's future son,
The mistress, servant, friend in one."

"मातेला अपत्याबद्दल जसा कळवळा वाटतो तसा तुम्हांला तुमचे ध्येयाबद्दल वाटावा व रणांगणांतील वीराला आपल्या शौर्याबद्दल जशी निष्ठा वाटते तशी निष्ठा तुम्हांला आपल्या कर्तव्याबद्दल वाटावी अशी माझी सदिच्छा आहे. तसेंच दक्षिणेकडून येणाऱ्या मलयगिरीच्या वाऱ्यामध्यें जशी मधुरता असते तशी मधुरता तुम्हांस तुमचे जीवनांत प्राप्त होवो. प्राचीन आर्यांच्या आत्मबलिदानाच्या परंपरेनें जगावर दिव्य प्रभाव टाकून उज्ज्वल व अतुल असें सामर्थ्य पैदा केलें तसेंच तुमच्याकडून होवो."

"इतकेंच नव्हे तर गतकालांत अनेक उज्ज्वल मानवरत्नें होऊन गेलीं त्यांच्या स्वप्नांत सुद्धां येणार नाहींत अशा अनेक गुणांचा संग्रह तुम्हांस करतां यावा ; भारताच्या नवीन पिढीचें संगोपन तुमच्याकडून व्हावें ; व मित्राप्रमाणें त्याचें उपयोगी पडून त्यांची सेवा पण तुमच्याकडून व्हावी अशी माझी प्रार्थना आहे."

—×—×—

# ५ : सर्वांगीण कार्याचा पाया

" दिव्यज्ञान अव्यक्त दशेंत नेहमींच असतें व बहुजन समाजास उपयुक्त होण्यासाठीं त्यास कोणातरी महान् जीवाचे मुखानें व्यक्त व्हावें लागतें."

*भ. निवेदिता*

*    *    *

" जेव्हां मृत्यु समोर येतो तेव्हां माझा दुबळेपणा नष्ट होतो. भीति, संशय व विचार यांचा त्याग करून मरण्यासाठीं केवळ तयार राहाण्याचे मार्गास मी लागतों. "

*स्वा. विवेकानंद*

*    *    *

भगिनींनीं चालविलेली राष्ट्रीय कन्याशाळा पाहून त्यांचे गुरुजींनाही ( स्वामीजींना ) वाटलें कीं " आपण धन्य झालों. "

*    *    *

स्वामीजी भारतांत परत आल्यानंतर भगिनी इंग्लंडमध्यें सुमारें वर्षभर थांबल्या. तिकडे भाषणद्वारा आपल्या कार्याचा प्रचार करून थोडेंबहुत लेखन करून व थोडाफार पैसा कमवून त्या हिंदुस्थानांत आल्या व आपले कार्यक्षेत्रांत त्यांनीं उडी घातली.

त्यांचें कार्यक्षेत्र निव्वळ स्त्रीशिक्षणापुरतें मर्यादित असें कधींच नव्हतें. त्यांच्या दुर्दम्य महत्त्वाकांक्षेस अनुसरून अनेक मार्गांनीं भारताची सर्वांगीण उन्नति करण्यासाठींच त्यांची आतांपर्यंतची तयारी पण झाली होती. एकोणिसावे शतकाचे अखेरीस स्वातंत्र्य संपादनाच्या इच्छेची प्रचंड अशी लाट हिंदुस्थानवर येत होती. ब्रिटिश साम्राज्याचे प्रतिनिधि म्हणून गव्हर्नर जनरलच्या जागीं लॉर्ड कर्झन् या दडपशाही अधिकाऱ्याची नेमणूक १८९९ सालीं झाली होती व जनतेला आपले विचार मोकळेपणें व्यक्त करण्याची संधि मिळण्याजोगी परिस्थिति नसल्यानें भूमिगत चळवळींनीं मुळें धरण्यास सुरुवात केली होती. प्रचंड व्यक्तिमत्व व दुर्दम्य धडाडी असलेल्या भगिनीसारख्या व्यक्तीस आपलें क्षेत्र आतां शाळेपुरतें मर्यादित राखणें अगदीं अशक्य होतें. त्यांतून आयर्लंडचे स्वातंत्र्य चळवळींत त्यांनीं ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध प्रचार केलेला होता व त्यामुळें हिंदुस्थानचे राजकीय आंदोलनाबद्दल त्यांना तळमळ वाटणें क्रमप्राप्तच होतें. साम्राजवादी ब्रिटिशांनीं गेल्या शतकांत अनन्वित अन्याय करून हिंदुस्थानचें राज्य गिळंकृत केलें होतें त्यामुळें राज्यकर्ते या नात्यानें ब्रिटिशांचा त्या द्वेष करीत असत व साम्राज्यशाहीशीं सहकार्य करणाऱ्या हिंदी इसमांविषयीं त्यांना तिरस्कार वाटत असे.

यावेळीं कलकत्ता येथील राष्ट्रीय सभा-अधिवेशनासाठीं महात्मा गांधी हे तेथें आले होते. त्यांना स्वामीजी व भगिनी यांची गांठ घेण्याची इच्छा झाल्यामुळें ते बेलूरमठांत आले. स्वामीजींची प्रकृति ठीक नसल्यामुळें ते दुसरीकडे गेले होते व त्यांची गांठ पडण्याजोगी नव्हती. भगिनींची व

त्यांची मात्र एक दोन वेळ गांठ पडली. हिंदुस्थानची संपूर्ण उन्नति ब्रिटिश साम्राज्यांत होणें शक्य आहे अशी त्यावेळीं त्यांची समजूत होती (ती मागाहून पालटली हें विश्रुतच आहे) व नुकत्याच झालेल्या आफ्रिकेंतील बोअर युद्धांत त्यांनीं ब्रिटिशांना मदत केली होती. त्यामुळें जहाल राजकीय मतप्रणाली असलेल्या भगिनींचें त्यांचेबद्दल अनुकूल असें मत झालें नाहीं यांत नवल नाहीं. ते म्हणतात :— "त्यांचा दिमाख पाहून मी दबून गेलों. संभाषणामध्यें माझें त्यांचें विशेष जमलें नाहीं.... हिंदुधर्माबद्दलचें त्यांचें प्रेम उचंबळून येत होतें एवढें मात्र, आमचें एकमेकांशीं पटलें नाहीं तरीही, मी पाहूं शकलों. त्यांच्या पुस्तकांचा परिचय मागाहून करून घेतला."

याच सुमारास कलकत्ता युनिव्हर्सिटीचा वार्षिक दीक्षासमारंभ झाला. तेव्हांही भगिनीची हिंदवासीयांबद्दलची तळमळ दिसून आली. या समारंभास गव्हर्नर जनरल् लॉर्ड कर्झन् यांनीं चॅन्सेलर म्हणून भाषण केलें व त्यांत त्यांनीं पौर्वात्याबद्दल जरा अप्रस्तुत अशी भाषा वापरली. ते म्हणाले :—

"असत्यता ही बोलण्यांत तशी इतर बाबतींत पण असते व आपल्या चारित्र्याबद्दल किंवा दुसऱ्यांच्या वर्तनाबद्दल किंवा जीवनांतील घटनांबद्दल दुसऱ्यांची गैरसमजूत होईल असें कोणतेंही बोलणें अगर करणें हें असत्यांतच मोडतें. सत्यपालनाचा हा उच्च आदर्श पुष्कळ अंशीं मूळचा पाश्चात्य आहे व पौर्वात्यामध्यें हा आदर्श मानला जाण्यापूर्वीं पाश्चात्यांच्या नैतिक कायद्यांत त्याला उच्च असें स्थान मिळालें होतें."

पाश्चात्य राज्यकर्ते वेळप्रसंगीं सत्याला डावलून कसें वागतात हें भगिनींना चांगलेंच माहीत होतें व खुद्द लॉर्ड कर्झन् यांचेच असत्य भाषणाचा पुरावा त्यांना यावेळीं आठवला. लॉर्डसाहेबांना कोरियाच्या परराष्ट्रीय खात्याच्या अध्यक्षाची गांठ घ्यावयाची होती व त्या खात्यांत जे लोक वाटाघाटीसाठीं येतात ते प्रौढ म्हणजे निदान चाळीसचे वरचे असले

तरच त्यांचे प्रतिनिधित्वास मान्यता मिळत असे. वस्तुतः त्यांना तिकडे जाणें होतें तेव्हां त्यांचें वय फक्त तेहतीस वर्षें होतें. परराष्ट्रीय खात्यांचे अध्यक्षांनीं त्यांची गांठ पडल्याबरोबरच त्यांना सरळ त्यांचें वयच विचारलें व उत्तरादाखल " चाळीस वर्षें " म्हणून त्यांनीं ठोकून दिलें. " तुम्ही इतके तरुण कसे दिसतां ? " असा पुन्हां त्यांना प्रश्न केला तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें :—" उत्कृष्ट हवापाणी असलेल्या आपल्या देशांत मी महिनाभर हिंडत आहें म्हणून तरुण दिसतों. "

ही वस्तुस्थिति त्यांनीं स्वतः आपल्या ग्रंथांत नमूद केलेली भगिनींना आठवली व त्यांनीं ताबडतोब ती उजेडांत आणली. सत्यप्रतिज्ञ म्हणून बाणा बाळगणारांचें हें असत्य कथन 'अमृत बझार पत्रिके' मधून प्रसिद्ध करण्यांत आलें व त्यास जगभर प्रसिद्धी मिळाली.

असो. भगिनींनीं आपली राष्ट्रीय कन्याशाला पुनः सुरू केली व हळूंहळूं विद्यार्थिनी जमूं लागल्या. स्वामीजींची प्रकृति बरीच खालावली होती तरी ते शाळेस व भगिनींचे निवासस्थानांस भेट देण्यास एकदां आले व ही त्यांची भेट शेवटचीच ठरली. तेथें आल्यानें आपण स्वतः धन्य झालों अशी त्यांची भावना झाली; इतके ते या उदात्त कार्यानें भारावले गेले. अमरनाथच्या यात्रेनंतर आपणांस इच्छामरणाचा वर शिवाकडून मिळाला असें ते म्हणत असत व चाळीसावे वर्षी देहत्याग करण्याची आपली इच्छा त्यांनीं अनेक वेळां बोलून दाखवली होती— ती वेळ जवळ येत चालली होती. शाळेच्या उपयोगाकरितां मॅजिक् लँटर्न्, दुर्बीण व इतर कांहीं वस्तु भगिनींनीं आणल्या होत्या त्या त्यांनीं पाहिल्या, त्यांचें प्रात्यक्षिक करून दाखवावें अशी इच्छा दर्शवली व शाळेचे कार्यास शुभ आशीर्वाद दिले.

दोन दिवसांनीं भगिनींनीं मठास भेट दिली. स्वामीजी जणूं कांहीं अगदीं त्यांची वाटच पाहात होते. ते भगिनीकडे सुद्धां कालीभावानें पाहूं



स्वामी विवेकानंद

लागले. त्यांनीं त्यांना सन्मानपूर्वक बसवून त्यांचे जेवण्याची व्यवस्था केली व जेवणानंतर सेवाभावानें स्वत: त्यांचे हातावर पाणी घालून ते टॉवेलनें पुसले. मागें काश्मीरमध्यें सुद्धां त्यांनीं एका लहान मुलीचें उमाकुमारी म्हणून पूजन केलें होतें, तोच भाव पुन: व्यक्त झाला. त्यांची व भगिनींची ही शेवटचीच भेट.

दोनच दिवसांनीं स्वामीजींनीं एके सायंकाळीं देहत्याग केला. दुसरे दिवशीं सकाळीं भगिनींना निरोप पोंचला तेव्हां त्यांच्या भावनांची तीव्रता किती असेल हें वाचकांनींच समजून घ्यावें. पण मठांत आल्यानंतर त्या दृढगंभीर बनल्या व डोळ्यांतून त्यांनीं एक थेंब सुद्धां काढला नाहीं. कारण वस्तुत: सत्पुरुषांचे देहत्यागांत दु:ख करण्याजोगें कांहींच नसते व अश्रु गाळण्यानें तर जीवात्म्याचे मुक्ततेंत विघ्न उत्पन्न होतें. शिवाय हें तर जाणून बुजून इच्छामरणच होतें. पण ही भूमिका किती जणांचे लक्षांत येते हें आपण पाहातोंच. त्यांनीं स्वामीजींच्या देहास थोडा वेळ वारा घातला व दहनक्रियेनंतर मन सुन्न झाल्यामुळें मठाचा निरोप घेतला. रोप वाढून त्याचें झाड झालें होतें व त्यामुळेंच त्याचें संरक्षक कुंपण नष्ट करण्यांत आलें होतें.

भारतवर्षाच्याच नव्हे तर अवघ्या भूतलावरच्या अनेक मानवी जीवांना स्वामीजींच्याकडून इतके दिवस ज्ञान-प्रेरणा मिळत होती ती मात्र त्यांच्या देहत्यागानें सुद्धां बंद झाली नाहीं. ज्ञान-प्रेरणा ही लेखांतून किंवा मुखांतूनच मिळते असें नाहीं तर अदृश्य अशा अनेक मार्गांनीं ती अनिर्बंधपणें संचार करीत असते. स्वामीजींचा देहत्याग इतका शांतपणें व अकस्मात् झाला कीं अनेकांना पुष्कळ दिवस असा भास होत असे कीं ते जवळपास कोठें तरी आहेतच. भगिनींना पण असा भास तीव्रपणें होत असे व त्यावेळीं त्या गुरुजींच्या विचाराशीं तन्मय होऊन जात असत. हाच त्यांचा मोठ्यांतला मोठा असा आनंद असे व कधीं कधीं त्या अजिबात

विसरून जात कीं स्वामीजींनीं देहत्याग केलेला आहे. मागाहून त्यांना असें वाटे कीं हीच मनःस्थिति कायम राहिली असती तर किती बरें झालें असतें.

वैदिक धर्म हा अत्यंत प्राचीन व सर्वसंग्राहक असा आहे व जगांतील इतर सर्व धर्म म्हणजे त्याचेच निरनिराळ्या ठिकाणीं उठलेले प्रतिध्वनि आहेत. त्यामुळें प्रत्येकानें सर्वच धर्मांविषयीं सहिष्णु असावें इतकेंच नव्हे तर ज्यानें त्यानें आपल्या कुवतीप्रमाणें व प्रवृत्तीप्रमाणें कोणताही धर्ममार्ग स्वीकारला तरी त्यास कांहीं हरकत नसावी हें तत्त्व रामकृष्ण मिशनच्या सर्व सभासदांना, चाहत्यांना व कार्यकर्यांना पटवून दिलेलें असतें. त्यामुळें हें मिशन सर्व धर्मांचे व्यक्तींना खुलें असतें व त्यामार्फत जसे वैदिक धर्मांतर्गत उत्सव साजरे केले जातात तसें इतर धर्मांतर्गत उत्सव देखील साजरे केले जातात. स्वामीजींच्या देहत्यागानंतर सहा महिन्यांनीं जो नाताळचा सण आला तो त्यांच्या गुरुबंधूंनीं कटकनजीक खंडगिरी येथील कोरीव लेण्याजवळ साजरा करण्याचें ठरविलें. या समयीं भगिनी निवेदिता पण मद्रासहून तेथें आल्या होत्या. किर्र जंगलाचे व कोरीव लेण्यांचे पार्श्वभूमीवर धुनी पेटवून कार्यक्रमास सुरुवात झाली. लूकसनें लिहिलेलें येशू ख्रिस्ताचें चरितामृत वाचतां वाचतां त्यांतील हकीकती मनश्चक्षूंपुढें येत होत्या व त्यांत सर्वजण रंगून गेले. वाचतां वाचतां व विचार-विनिमय करतां करतां येशूचें सर्वच जीवन चरित्र घेण्यांत आलें व नंतर त्याचा मृत्यु व पुनरुत्थान हा पण भाग घेण्यांत आला. वातावरण इतकें शांत व नितांतगंभीर होतें कीं भगिनींना त्या वाचनांतून एक नवीनच बोध झाला.

तो बोध असा कीं ख्रिस्ताचें पुनरुत्थान हें मूळचे लिखाणांत स्थूल शरीराला अनुलक्षून नसलें पाहिजे तर एरवीं अदृश्य अशा सूक्ष्म शरीराला अनुलक्षून असलें पाहिजे, त्यानंतर या लिखाणाच्या ज्या सुधार-

लेल्या म्हणून आवृत्त्या (हस्तलिखित) निघाल्या, त्यांत हें प्रकरण एकादे श्रद्धाळू भक्तानें स्थूल देहास अनुलक्षून घातलें असलें पाहिजे याविषयीं त्यांना शंका वाटेनाशी झाली. सुधारलेल्या लिखाणाच्या लेखकांना स्थूल देहाचें पुनरुत्थान झालें असें लिहावेंसें तर वाटलें पण त्यांची तशी संपूर्ण खात्री तर नव्हती अशा द्विधा मनःस्थितींत हें लिखाण झालें आहे व त्याची भाषा पण तशा मनःस्थितीची द्योतक आहे, असें भगिनींना दिसून आलें. भक्तांचे श्रद्धेबद्दल भगिनींना पूर्ण आदर होता तरी पण हा विचार त्यांना सुचला याचें कारण त्यांना स्वामीजींच्या सूक्ष्म देहाचें अस्तित्व मधून मधून जाणवत होतें व त्यापासून अतितीव्र अशा प्रेरणा मिळत होत्या. ही स्थिति कायमची टिकावी अशी त्यांनीं परमेश्वराजवळ या प्रसंगीं मागणी केली.

—×—×—

# ६ : कार्याची धुमश्चक्री

" अतिदिव्य अशी शक्ति आजपर्यंत अनेक स्वरूपांत प्रकट झाली आहे. कधीं वेद व उपनिषदें यांचे स्वरूपांत, कधीं धर्म-संघटना व राज्यसंघटना यांचे स्वरूपांत, कधीं विद्यादानाचें स्वरूपांत तर कधीं योग्यांचे ध्यानधारणेच्या स्वरूपांत. आज तीच दिव्य शक्ति राष्ट्रीयत्वाचे स्वरूपांत प्रकट झाली आहे."

*भ. निवेदिता*

*   *   *

" स्वतःवर दयामाया करूं नका, तरच तुम्ही इतरांवर अलोट दयामाया करूं शकाल. स्वतःवर येत असलेल्या अंधःकाराचा वीराप्रमाणें स्वीकार करा, म्हणजेच तुमचा प्रकाश इतरांना मार्गदर्शक होईल. "

*कालीमाता*

*   *   *

भगिनींना कुरुक्षेत्रावरून ध्वनि ऐकूं येऊं लागला " कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन" ।

*   *   *

स्वामीजींच्या हयातींतच भगिनींनीं राजकीय क्षेत्रांत पदार्पण करण्यास थोडीशी सुरुवात केली होती हें लॉर्ड कर्झन् यांच्या-बद्दलच्या नुक्त्याच दिलेल्या हकीकतीवरून वाचकांचे लक्षांत आलें आहेच. स्वामीजींच्या देहत्यागानंतर तर जहाल अशी राजकीय जागृति सुरू करण्याचें त्यांनीं योजिलें. पण रामकृष्ण-मिशनचे चालकांना हें पसंत पडलें नाहीं. मिशनचें कार्यक्षेत्र राजकारणापासून अलिप्त असलें पाहिजे असा स्वामीजींचा पण कटाक्ष होताच. भगिनींनीं राजकारणांत पडणेंच असेल तर स्वतःचे जबाबदारीवर त्यांनीं पडावें व मिशनचा व त्यांचा संबंध तोडून टाकावा असें चालकांना वाटलें व सरकारी दडपशाहीचा मिशनला कांहीं एक उपद्रव होऊं नये या हेतूनें असें वाटणें ठीकच होतें. वाटाघाटीनंतर भगिनींनीं मिशनशीं असलेला आपला संबंध तोडला असल्याचें लिहून दिलें. चालकांनीं पण भगिनींना एक अनावृत पत्र अमृतबझार पत्रिकेमार्फत पाठविलें व त्यांचे कार्याचा मिशनचे कार्यशीं कांहींएक संबंध राहाणार नाहीं असें जाहीर केलें.

भारतभूमीची सर्वांगीण उन्नति होण्यासाठीं अगोदर राजकीय स्वातंत्र्य मिळालें पाहिजे व त्यासाठीं तनमनधन अर्पण करून चळवळ केली पाहिजे अशी विचारांची लाट त्यावेळीं हिंदुस्थानभर पसरली होती. महाराष्ट्रांत लोकमान्य टिळकांनीं हीच विचारसरणी केसरीमार्फत प्रसृत करण्याचें काम चालविलें होतें व इतर प्रांतांनीं सुद्धां त्यास साथ दिली होती. बडोद्यास योगी अरविंद घोष हे त्यावेळीं बडोदा कॉलेजचे प्रिन्सिपॉल असतांना त्यांनीं पण अशाच कार्यास सुरुवात करण्याचें योजलें होतें. आत्मबलिदान ही हमखास अशी लागू पडणारी मात्रा मानली जात होती.

या ध्येयानें प्रेरित होऊन भगिनींनीं एक प्रचार-दौरा काढला. स्वतःस प्रेरणा मिळण्याच्या हेतूनें त्यांनीं प्रथम बुद्धगयेस प्रयाण केलें. तेथून

बडोद्यास गेल्यानंतर त्यांनीं योगी अरविंद घोष यांची गांठ घेतली. त्यांचे "कालीमाता" हें पुस्तक श्री. अरविंद यांचे वाचनांत आलें होतें व त्यांना त्यांतील ध्येयवाद फार आवडला होता. आपल्या नियुक्त कार्यांत त्यांनीं त्यांची मदत मागितली व त्यांनीं पण यथायोग्य काळीं ती देण्याचें मान्य केलें. तेथून नागपूर येथें जाऊन त्यांनीं कांहीं व्याख्यानें दिलीं व तीं बरींच लोकप्रिय झालीं. तेथील मॉरिस कॉलेजचे विद्यार्थ्यांना बक्षिसें वांटण्यासाठीं त्यांना पाचारण केल्यावरून त्यांनीं तेथें जाऊन बक्षिसें वाटलीं व नंतर सर्वांना धक्का देणारें असें भाषण केलें. त्याचा सारांश असा :—

"क्रिकेट्मध्यें विजय संपादणाऱ्या वीरांना बक्षिसें वांटतांना मला आनंद वाटत आहे. पण क्रिकेटसारख्या परदेशी खेळांत प्राविण्य मिळविण्यापेक्षां आपल्या राष्ट्रीय खेळांत प्राविण्य मिळविणें याला जास्त महत्त्व आहे. परदेशी खेळांतील प्राविण्याबद्दल बक्षिसें वांटणें आहेत हें मला आधीं माहीत असतें तर मी येथें न येणेंच पसंत केलें असतें. दुर्गापूजनाचा उत्सव सध्यां चालू आहे. या उत्सवांत दुर्गामाता व तिची तलवार यांचे पूजनाची तुम्हांला विस्मृति पडावी हें आश्चर्य आहे. शिवाय भोसलेराजे यांच्या या शहरांत तरी मराठ्यांच्या शौर्याची थोडीशी चुणूक म्हणून राष्ट्रीय खेळ करून दाखविणेंच रास्त ठरलें असतें. तरीपण उद्यां तरी हे खेळ तुम्ही करून दाखवावेत अशी माझी इच्छा आहे."

त्यांचे इच्छेप्रमाणें दुसरे दिवशीं कांहीं विद्यार्थ्यांनीं त्यांना असे खेळ करून दाखविले. बॅरिस्टर गोविंद विनायकराव देशमुख हे त्या विद्यार्थ्यांपैकीं एक होते व त्यांनींच ही आठवण संगृहित करून ठेवली आहे. दुसऱ्या दिवशीं सामोपचाराचें भाषण भगिनींनीं केलें त्याचा सारांश असा :—

"शरीर कमावण्याकडे लक्ष न देतां केवळ पुस्तकी विद्येच्या मागें लागल्यामुळें बरेच विद्यार्थी पाप्यांचे पितर बनत असून आपल्या

माताभगिनींचे सुद्धां रक्षण करण्यास असमर्थ बनत चालले आहेत. तसेंच शिक्षणानंतर परकी सरकारचे नोकरीचा हव्यास धरला जातो हें विद्यार्थ्यांना अत्यंत गर्ह्य असून त्याऐवजीं शरीर कमावून तरुणांनीं आपले देशास समृद्ध करण्यासाठीं स्वतःस वाहून घेतलें पाहिजे...."

भगिनींच्या या दौऱ्यांत त्यांनीं हिंदुस्थानचे पश्चिम भागांत व दक्षिण भागांतील पण अनेक ठिकाणांना भेटी दिल्या व राष्ट्रीय जागृतीसाठीं व्याख्यानें देऊन अनेक ठिकाणीं विवेकानंद सोसायट्यांचीं केंद्रें स्थापन केलीं. मद्रास येथील महिला समाजानें एक सभा भरविण्याचें ठरवून संभाषणासाठीं त्यांना पाचारण केलें. या सभेस भगिनींना कांहीं आकस्मिक कारणानें जातां आलें नाहीं, म्हणून त्याऐवजीं त्यांनीं संदेशादाखल एक अनावृत पत्र पाठविलें. सभेंतील भाषणापेक्षां जास्त परिणामी असें हें पत्र ठरलें. त्याचा सारांश असा :—

"स्वामी विवेकानंद यांचेबद्दल तुम्हांस जी भक्ति व जो पूज्यभाव वाटतो त्यामुळें या सभेस प्रचंड जमावानें तुम्ही हजर राहिल्या असतांना मला येतां आलें नाहीं म्हणून दिलगिरी वाटते. स्वामीजी पाश्चात्य देशांत गेल्यानंतर तेथें काय काय घडलें याविषयीं आणि तसेंच आपले देशांतील जनतेवर त्यांचे मनांत किती प्रेम आहे याविषयीं तुमचेसमोर समक्ष मला बोलतां आलें असतें तर मला फार आनंद झाला असता. पुरुषांपेक्षां स्त्रियांवरच भारताचें भविष्य जास्त अवलंबून आहे ही त्यांची खात्री होती व आपलेबद्दलच त्यांना अत्यंत विश्वास वाटत होता. पतीवरील निःसीम प्रेमामुळें त्याचे पाठोपाठ अग्निप्रवेश करण्याचें सतीचें दिव्य भारत महिलेनें भूतकाळांत आनंदानें आचरणांत आणलें होतें. सीतासावित्री या महासती तसेंच शंकरासारख्या तपस्व्यालासुद्धां वश करून घेणारी उमादेवी हे हिंदमहिलांचे दिव्य आदर्श आहेत व अशा महिला अंगावर पडलेल्या कोणत्याही कार्यासाठीं उपयुक्त ठरल्याशिवाय कशा राहतील?"

"समाजांतील पावित्र्य व सामर्थ्य यांचीं भांडारें जतन करण्यासाठीं पुरुषांपेक्षां स्त्रियाच जास्त उपयुक्त ठरतात व म्हणून हें काम सर्वच देशांत स्त्रियांकडेच जास्त प्रमाणावर सोंपवलेलें असतें. तुरळक कांहीं पुरुष या प्रकारचें मार्गदर्शन करतात पण बहुतेकांना निर्वाहासाठीं पैसा मिळविण्यांतच आपला बहुतेक वेळ घालवावा लागतो. पुरुषांच्या स्फूर्तीला, श्रद्धेला व अंत:सामर्थ्याला नवचैतन्य मिळतें तें घरांतूनच व घराचा मोठेपणा गृहिणीच्या तपस्येंतूनच उद्भूत होतो. श्रीराम, श्रीकृष्ण, शंकराचार्य यांच्या मोठेपणाचें प्रमुख कारण म्हणजे त्यांच्या मातांचे परिश्रम होत हें तुम्हां आर्यपत्नींना व आर्यमातांना सांगण्याचें कारण नाहीं. तपस्विनीप्रमाणेंच या गृहिणींचें जीवन शांतपणें व बोभाट न करतां व्यतीत होत असतें व एकनिष्ठ राहून पूर्णत्वास जावें एवढेंच त्यांचें ध्येय असतें. धर्माचें रक्षण करण्यासाठीं अनेक लढाया आजवर झाल्या पण त्यांनीं जें कार्य झालें नाहीं तें कार्य या गृहिणींच्यामुळें झालें आहे."

"स्वधर्म व स्वदेश हे आज अत्यंत हीन अवस्थेस पोंचले आहेत. भारतकन्यांनीं श्रद्धायुक्त अंत:करणानें भारतभूमीची पूर्वींच्या काळीं सेवा केली होती तशीच त्यांनीं आतांही करावी असें आव्हान स्वामीजींनीं त्यांना केलें आहे. आपण विचाराल कीं हें कसें करतां येईल? ऐका. हिंदमातांनीं प्रथम आपले पुत्रांचे अंत:करणांत ब्रह्मचर्याबद्दल आवड उत्पन्न केली पाहिजे. कारण याचें अभावीं आपलें प्राचीन काळीं असलेलें सामर्थ्य खचत चाललें आहे. विद्यार्थी-जीवनाचा आदर्श म्हणजे ब्रह्मचर्यच होय व हिंदुस्थानाखेरीज इतर कोणत्याही देशानें इतका उच्च आदर्श विद्यार्थ्यां-पुढें ठेवला नाहीं. हा आदर्श या भूमींतूनही नष्ट झाला तर तो दुसरीकडे कोठें पाहावयास मिळणार? सर्व प्रकारचें सामर्थ्य व सर्व प्रकारचा मोठेपणा ब्रह्मचर्यांत अंतर्भूत आहे व असें सामर्थ्य व असा मोठेपणा आपल्या पुत्रांस मिळावा या दिशेनें मातांनीं त्यांना वळण लावलें पाहिजे. यानंतर दुसऱ्याविषयीं सहानुभूतीची भावना स्वत:मध्यें व आपल्या

कार्याची धुमश्चक्री क्रमांक ...१०२६... नोंदि: ०७.४.१९..

अपत्यामध्यें निर्माण करणें हें सुद्धां तुम्हांस शक्य आहे. जनतेच्या आपत्ति काय आहेत, आपल्या भूमातेची दु:स्थिति कशी आहे, तसेंच आपल्या धर्मास किती संकटें उत्पन्न झालीं आहेत हें सर्व जाणण्याची त्यामुळें तुम्हांला इच्छा होईल. यांतूनच खंदे असे कार्यकर्ते वीर निर्माण होतील कीं जे निस्वार्थीपणानें प्राप्त कर्तव्यें करतील इतकेंच नव्हे तर स्वदेश व स्वबांधव यांचे कल्याणासाठीं बलिदान करण्यास तयार होतील. आपल्या भूमातेनें आपणांस जन्म दिला आहे, खाद्यपेय पुरविलें आहे, सगेसोयरे दिले आहेत तसेंच आपल्यामध्यें आत्मविश्वास पण तिनें निर्माण केला आहे. तीच आपली खरी आई नाहीं कां? तिचें स्वतंत्र असें विशाल भारत बनावें अशी तुमची इच्छा नाहीं कां? माताभगिनींनो, अशाच प्रकारचे विचार स्वामी विवेकानंद यांनीं तुमच्यासमोर मांडले असते."

"माझी पात्रता नसतांना तुम्ही माझा सन्मान केलांत व या मार्गानें तुम्ही स्वामीजींबद्दल पूज्यबुद्धि दाखवलीत याबद्दल तुमचे आभार मानते. स्वामीजींनीं मला कन्या म्हणून मानलें म्हणजेच तुमची देशभगिनी म्हणून मानलें म्हणून माझी एकच याचना आहे. या नितांतसुंदर अशा पुण्यभूमीबद्दल मला भक्तिभाव उत्पन्न झाला आहे व तुमची बहीण या नात्यानें मी तुमची सेवा कशी करावी हें तुम्ही मला सांगावें अशी माझी इच्छा आहे. स्वामीजींच्या पाठीशीं असलेले त्यांचे गुरु श्रीरामकृष्ण परमहंस यांची मी तुम्हांला या प्रसंगीं आठवण करून देते. तसेंच या दोघांमार्फत जी दिव्यशक्ति कार्य करीत होती व अजूनही त्यांचे अनुयायांमार्फत जी कार्य करीत राहील ती कालीमाता हिची पण मी तुम्हांला आठवण करून देते."

भगिनींचें हें अनावृत पत्र त्यांच्या उपस्थितीच्या अभावीं सभेंत वाचून दाखविण्यांत आलें. यांत भगिनींचें अंतरंग स्पष्टपणें दिसून येतें. असो. मद्रास प्रांतांतील भगिनींचा दौरा बराच गाजला व त्यास वर्तमानपत्रांतून प्रसिद्धीसुद्धां बरीच मिळाली. देशांत राजकीय जागृति करणें या

गोष्टीकडे त्यांचें मुख्यत: लक्ष होतें तरी पण दक्षिणेंतील शिल्पकला त्यांचे कलात्मक दृष्टींतून सुटणें शक्यच नव्हतें. त्यांनीं प्रत्येक ठिकाणचे शिल्पकृतींचें निरीक्षण करून घेतलें व भारतमातेच्या श्रेष्ठतेचें हें एक अंग पाहून त्यांना धन्यता वाटली. १९०२ चे अखेरीस त्यांचा हा दौरा संपला व कटक–खंडगिरीमार्गें त्या कलकत्त्यास आल्या. खंडगिरि येथें साजऱ्या झालेल्या नाताळचे सणाची हकीकत पूर्वीं आली आहेच.

या वेळेस सातवे एडवर्ड हे हिंदुस्थानचे बादशाहा झाले होते व त्यानिमित्त गव्हर्नर जनरल् लॉर्ड कर्झन् यांनीं दिल्ली येथें मोठा दरबार भरविला होता. पारतंत्र्यामुळें हीनदीन झालेल्या जनतेपुढें ब्रिटिश नोकर-शाहीनें जें साम्राज्यशक्तीचें प्रदर्शन चालविलें होतें तें देशांतील कोणत्याच पक्षास पसंत नव्हतें. त्याबद्दल चोहोंकडे तीव्र असंतोष व्यक्त होत होता व या द्वारेंच जनतेंतील पक्ष-उपपक्ष यांची अप्रत्यक्षपणें एकजूट होत होती.

राजकारणांत भाग घेण्याचें किंवा राजकीय जागृतीचें जें कार्य भगिनींकडून चालू होतें तें त्यांचें वैयक्तिक जबाबदारीचें असून रामकृष्ण मिशन्शीं त्याचा कांहींएक संबंध नाहीं हें यापूर्वींच मिशनचे चालकांनीं जाहीर केलें होतें हें वाचकांना माहिती आहेच. आतां वाढत्या चळवळी-मुळें ही वस्तुस्थिति जास्त स्पष्ट करणें जरूर आहे असें मिशनला वाटूं लागलें व म्हणून चालकांनीं भगिनींना पाचारण करून पुन: विचारविनि-मय केला. भगिनींना तर आपलें कार्य सोडावयाचें नव्हतेंच. शेवटीं भगिनींनीं आपले कार्याचा मिशनचे कार्याशीं कांहींएक संबंध नाहीं असें "स्टेट्स्मन्" या पत्रांतून जाहीर केलें. जरूर तेवढेच पैसे जवळ ठेवून बाकीचे त्यांनीं मिशनला देऊन टाकले व आपलें कार्य चालूं ठेवण्यास त्या स्वतंत्र झाल्या. ही व्यवस्था परस्पर संमतीनें व पूर्ण खेळी-मेळीनें झाली होती व कोणाचेंही कोणाशीं वैयक्तिक वितुष्ट मुळींच आलेलें नव्हतें हें येथें स्पष्ट करणें जरूर आहे.

या वेळेपासून पुढें राजकीय जागृतीचें काम भगिनींनीं अतिशय जोमानें व दुर्दम्य उत्साहानें केलें. कांहींजण असेंही सांगतात कीं त्या गुप्त क्रांतिकारकांचे शस्त्रसंघटनांचें नेतृत्व करीत असत. या बाबतींत मात्र थोडासा खुलासा करणें जरूर आहे. कारण देशांतील सर्वच पक्षांच्या राजकीय जागृतीबद्दल सहानुभूति वाटणें ही गोष्ट वेगळी व एखाद्या विशिष्ट संघटनेचें नेतृत्व पत्करून ती संघटना स्वतः चालविणें ही गोष्ट अगदी वेगळी.

वैयक्तिक स्वार्थाला पूर्णपणें तिलांजलि देऊन व तनमनधन अर्पण करून एकादे व्यक्तीनें स्वतःस आपले कार्यास वाहून घेतले म्हणजे त्या व्यक्तीकडे अनेक क्षेत्रांतील अनेक संधि आपोआप चालून येतात. भगिनींना या वेळीं असाच अनुभव आला. राष्ट्रीय कन्याशाळेचे कामासाठीं मदत म्हणून भगिनी ख्रिस्टिन् व भगिनी सुधीरा बोस या दोन महिला त्यांना सर्वतोपरीं साह्य करण्यास पुढें सरसावल्या व त्यामुळें त्यांना राजकीय क्षेत्र जास्त उपलब्ध झालें हें खरें. तथापि त्यांचें असामान्य कर्तृत्व शाळेच्या क्षेत्रापुरतें मर्यादित राहाणें जसें अशक्य होतें, तसेंच तें केवळ जहाल राजकारणापुरतें किंवा तीव्र आंदोलनापुरतें संकुचित राहाणेंही अशक्य होतें. त्याचा विस्तार सर्वच क्षेत्रांतून होणें अपरिहार्य होतें.

विसावे शतकाचे सुरुवातीस राजकीय चळवळीची जी प्रचंड लाट देशावर आली होती तिची पार्श्वभूमि जरा पाहूं या. त्यापूर्वींच इंग्लंडांत यंत्रयुग सुरू झालें असल्यानें पक्क्या मालाची पैदास फार भयंकर प्रमाणांत होत होती. माल खपविण्यासाठीं तीस कोटि भारतीयांचें गिऱ्हाईक मिळवणें तसेंच कारखान्याला लागणारा कच्चा माल याच तीस कोटी जनतेकडून मिळवणें हे दोन्ही उद्देश सफल झाल्यामुळें इंग्लंडमधील कारखान्यांचीं दोन्हीं तोंडें मिळवितां आलीं व त्यामुळें ब्रिटिश साम्राज्याची पत वाढून तें विस्तार पावूं लागलें. राज्यकर्त्यांना आपले राजकीय सत्तेमुळें हें सर्व करतां आलें. सर्व धोरणच असें आखलें गेलें कीं भारतांतील

उद्योगधंदे नष्ट होऊन त्यांतील जनता केवळ कच्चा माल तयार करीत राहावी. ज्या भारतांतून सोन्याचा धूर निघत होता व जेथील कसबी कारागीर ५–६ वार लांबीचें वस्त्र एका आंब्याचें कोईंत मावेल इतकें तलम कापड काढण्यांत प्रसिद्ध होते, तोच भारत हळूंहळूं लाकडें फोडणाऱ्या, पाणी वाहणाऱ्या व शेती करणाऱ्या गुलामांचा देश बनूं लागला. ठग, पेंढारी यांच्या लूटमारी बंद केल्यानंतर देशांत इंग्रजांनीं इतकी सुरक्षितता निर्माण केली म्हणतात कीं काठीला सोनें बांधून खुशाल काशी ते रामेश्वरपर्यंत प्रवास केला तरी कोणताच धोका नाहीं. पण सोनें राहिलेंच नाहीं तर काठीला बांधणार काय हा प्रश्न उपस्थित होत होता. अन्नरक्षणार्थ लागणारा कपडाच काय पण तो शिवण्यास लागणारा सुईदोरा देखील इंग्लंडमधून येऊं लागला. रोजची चूल पेटविण्यास लागणारी आगपेटी व भाकरी भाजण्याचा तवा हे जिन्नस सुद्धां आम्हांस करतां येईनात. याचा साहजिक परिणाम म्हणजे अठरा विश्वे दारिद्र्य. जनता केवळ शेतीवर अवलंबून राहूं लागली त्यामुळें एकादे वर्षीं पुरेसा पाऊन पडला नाहीं कीं सार्वत्रिक बेकारी होऊन प्रचंड दुष्काळ पडूं लागले व लाखोंजण त्यांत खलास होऊं लागले.

पण यामुळेंच देशांत जागृति उत्पन्न होऊं लागली व विसावे शतकाचे सुरुवातीस तिनें उग्र रूप धारण केलें. कॉंग्रेसमार्फत सनदशीर मार्गांनीं मतप्रदर्शन करण्यांत येऊं लागलें. तसेंच गुप्त क्रांतिकारकांच्या संघटना तयार होऊं लागल्या. लोकांना कोणीकडून तरी क्रांति पाहिजे होती, मग ती हिंसात्मक गुप्त क्रांतिकारकांमार्फत मिळो कीं सनदशीर कार्यकर्त्यां-मार्फत मिळो. जनतेकडून फक्त अहिंसात्मक मार्गाचाच अवलंब व्हावा हें धोरण यानंतर वीस वर्षांनीं म. गांधींच्या नेतृत्वाखालीं आखण्यांत आलें पण चालू वेळेस हिंसात्मक मार्गाचा अवलंब करणाऱ्या अनेक गुप्त संघटना निघाल्या होत्या.

भगिनींनीं जेव्हां राजकीय क्षेत्रांत पदार्पण केलें तेव्हां वरीलप्रमाणें पार्श्वभूमि होती. तरी पण त्यांचा संबंध सर्वच पक्षाचे पुढाऱ्यांशी येत होता. नामदार गोखले, रमेशचंद्र दत्त, रासबिहारी घोस, सर जदुनाथ सरकार यांच्यासारख्या प्रागतिक पक्षाचे अनुयायांना त्यांनीं सहकार्य दिलें तसेंच अरविंद घोष, लो. टिळक व बिपिनचंद्र पाल यांसारख्या जहालांनासुद्धां त्यांनीं पाठिंबा दिला व सर्वच पुढाऱ्यांनीं त्यांचे कार्याची स्तुति केली आहे हें विशेष आहे व यामुळेंच "त्यांनीं गुप्तक्रांतिकारकांचें व शस्त्रसंघटनेचें पुढारीपण स्वतः पत्करलें होतें.' हा दावा मान्य होण्यासारखा वाटत नाहीं. गुप्तशस्त्रसंघटनेचा मूळ कार्यक्रम आंखला गेला तेव्हांच तो सुमारें तीस वर्षांचा लांबलचक असा कार्यक्रम होता व मागेंपुढें त्यांत भारतीय सेनेचा भाग अंतर्भूत करून घेऊन क्रांति करावी अशी ती योजना होती. पण योजनेप्रमाणें कार्य न होतां या संघटनेंत ताबडतोबच दहशती मार्गाचा अवलंब करणारे निघाले व त्यामुळें या संघटनेस वेगळेंच वळण लागलें. लो. टिळकांसारखे जहाल पुढारी स्वतः या मार्गांत पडत नसत तरी पण त्यांना त्यांत पडणारे व्यक्तींचे धाडसाबद्दल कौतुक व सहानभूति वाटत असे व कदाचित् याही मार्गाचा थोडाफार उपयोग होईल अशा धोरणानें ते वागत. याच धोरणानुसार भगिनींची विचारसरणी असावी असें दिसून येतें.

राजकीय क्षेत्रांत भगिनींनीं धडाडीनें काम केलें तें १९०३ च्या सुरवातीपासून ते १९०७ च्या मध्यापर्यंत. यानंतर त्यांनीं इंग्लंड-अमेरिकेस प्रयाण केलें व दोन वर्षांनीं त्या परत हिंदुस्थानांत आल्या. आल्यानंतर हिंदुस्थानांतील बदललेली परिस्थिति त्यांनीं पाहिली. श्री. अरविंद घोष यांचेशीं झालेल्या विचार-विनिमयांत त्यांची पण वृत्ति अंतर्मुख झालेली त्यांना दिसून आली व नंतर पूर्वीइतके धडाडीनें राजकीय आंदोलनकार्य त्यांचे-कडून झालें नाहीं. वर उल्लेख केलेल्या साडेचार वर्षांच्या अवधींत गुप्त अशा शस्त्रसंघटनेच्या कार्यांत त्यांनीं स्वतः भाग घेतला असेल हें

संभवनीय दिसत नाहीं. कारण याचवेळीं शाळेचे कामाशिवाय इतर कितीतरी प्रकारचे कामांनीं त्यांचें लक्ष वेधलें होतें. १९०४ ते १९०६ या दरम्यान त्यांनीं श्री. जगदीशचंद्र बोस यांचे वनस्पतिसंशोधनाचे निबंध तपासून सुधारून घेतले असें त्यांनींच लिहून ठेवलें आहे. जे नवीन शोध पाश्चात्य जनतेपुढें आव्हान म्हणून मांडावयाचे होते त्यांचें लिखाण निर्दोष होण्यासाठीं त्यांचा त्यांत कितीतरी वेळ खर्च होत असे. शिवाय 'मॉडर्न रिव्ह्यू', 'प्रबुद्ध भारत', 'न्यू इंडिया' अशा नियतकालिकांकरितां त्यांनीं अनेक लेख पण या मुदतींत लिहून दिले.

१९०४ सालीं त्यांनीं बुद्धगया येथें प्रयाण केलें व तेथें बुद्धचरित्राचें वाचन व मनन करून बुद्धजीवनाशीं संलग्न अशा उरुवेल, राजगीर या ठिकाणीं गमन केलें. या प्रवासांत भारतीय शिल्पकला, ग्रंथ व लोककथा यांचें निरीक्षण पण त्यांनीं केलें व तेंही संशोधनात्मक दृष्टीनें. कारण त्यावर त्यांचें ग्रंथलिखाणही चालू होतें.

याच साडेचार वर्षांच्या मुदतींत अतिश्रमामुळें तीन वेळां त्या आजारी पडल्या व तिन्ही वेळ मिळून आजारांतच वर्ष-सवावर्ष निघून गेलें. शिवाय बंकीपूर येथें हिंदुमुस्लीम संघटनेच्या कार्यासाठीं त्यांना जावें लागलें व हिंदु व मुस्लीम या दोन्ही संस्कृतींचा थोडाबहुत अभ्यास करून तेथें व्याख्यानें द्यावीं लागलीं.

रामकृष्ण शिष्या गोपालेर-मा यांचेबद्दल त्यांना विलक्षण आकर्षण वाटत होतें. ही नव्वद वर्षांची साध्वी १९०३ ते १९०६ या कालांत सुमारें अडीच वर्षें अंथरुणाला खिळून होती तेव्हां तिची सेवाशुश्रूषा भगिनी स्वतः आपले घरीं करीत असत व तें त्यांच्या अंतापर्यंत. अशा अनेक गोष्टी करण्यास ज्यांना सवड मिळाली होती अशा व्यक्ति गुप्त-संघटना स्वतः चालवीत असतील हें संभवनीय वाटत नाहीं. कारण गुप्तसंघटनेचे चालकांना गुप्त पोलिसांची नजर चुकवण्यासाठीं इतकीं

अवधानें व तंत्रें सांभाळावीं लागतात कीं त्यांना इतर क्षेत्रांत भरीव कार्य करण्यास सवड सांपडणें शक्य होत नाहीं. असो. भगिनींच्या दिव्य जीवनाचे अनेक पैलू जों जों पाहावे तों तों उत्कंठा अधिक अधिक वाढत जाते.

भगिनींनीं राजकीय क्षेत्रांत पाऊल टाकलें तेव्हांची स्थूल स्थिति कशी होती याचें थोडेसें निदर्शन वर आलें आहेच. १८८५ झालीं सुरू झालेली राष्ट्रीय सभा दरसाल नाताळचे सुटींत वार्षिक अधिवेशन भरवीत असे व त्यास सुमारें दोन एक हजारपर्यंत प्रतिनिधि जमत असत. सरकारकडे अर्ज-विनंत्या करणाऱ्या या संस्थेंतसुद्धां आतां जहाल वारें शिरणें अपरिहार्य होतें. १९०२ चे अखेरीस जें अहमदाबाद येथें अधिवेशन भरलें त्याचे अध्यक्ष म्हणून सुरेंद्रनाथ बानर्जी यांची नेमणूक झाली यावरूनच राजकारण मवाळ पक्षाचे हातून जहाल पक्षाचे हातांत चाललें होतें हें स्पष्ट झालें. जहाल पक्षाची निर्मिति प्रथम बंगालमध्यें व महाराष्ट्रांत झाली. कलकत्ता हीच तेव्हां भारताची राजधानी असल्यानें तेथें ही चळवळ फोफावणें साहाजिकच होतें व महाराष्ट्रांत लो० टिळक यांचे पुढारीपणामुळें जहाल वृत्तीचा प्रसार होत गेला. बंगाल व महाराष्ट्र यांचे संबंध या वेळेस जास्त निकटचे असे झाले. लो० टिळकांनीं स्वराज्याच्या जागृतीचें कार्य म्हणून श्रीशिवाजी महाराजांच्या उत्सवाचें बीज महाराष्ट्रांत पेरलें व त्याचा प्रतिध्वनि चटकन् बंगालमध्यें उठला व जनतेची स्वातंत्र्याची लालसा वाढविण्यास कारणीभूत झाला. १९०६ सालीं लो० टिळकांना कलकत्त्यास श्रीशिवाजी-उत्सवासाठीं मुद्दाम बोलावण्यांत आलें होतें ही घटनासुद्धां सूचक आहे. तसेंच श्री० सखाराम गणेश देउसकर या महाराष्ट्रीय लेखकांनीं "शिवाजी चरित्र" व "देशेर–कथा" हीं दोन पुस्तकें बंगाली भाषेंत लिहून कलकत्त्यास प्रसिद्ध केलीं. हीं पुस्तकें देशप्रेमानें ओतप्रोत भरलेलीं असून त्यांत 'स्वराज्य' हा शब्द प्रथमच उपयोगांत आणला गेला. यानंतर हा शब्द

व त्याचा अर्थ सर्व देशभर घोटला गेला व १९०६ चे राष्ट्रीय अधिवेशनामध्यें अध्यक्ष दादाभाई नौरोजी यांनीं कलकत्ता येथें जाहीर केलें कीं "स्वराज्य हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे." आणि लो० टिळकांनीं जाहीर केलें कीं "आम्ही हा हक्क मिळविणार." या दोन्ही घोषणा मिळून झालेले ब्रीदवाक्यास देशभर प्रसिद्धि मिळाली व किती तरी वर्षे या ब्रीदवाक्याचा उपयोग घोषणा म्हणून होत असे.

बंगालांतील सुप्रसिद्ध राष्ट्रीय कादंबरीलेखक बंकिमचंद्र यांच्या 'आनंदमठ' या कादंबरींतील 'वंदे मातरम्' हें गीत अतिशय लोकप्रिय झालें व त्यास राष्ट्रगीत मानतां मानतां खरोखरीच १९४७ सालीं स्वातंत्र्यप्राप्तीचे वेळींसुद्धां राष्ट्रगीत म्हणून तें मान्य करण्यांत आलें. याच कादंबरींत भवानी-मंदिर नांवाची काल्पनिक संस्था चित्रित केली असून तिच्याद्वारें आध्यात्मिक व राजकीय क्षेत्रांत निःस्वार्थबुद्धीनें संघटनात्मक कार्य करण्याचा संदेश राष्ट्रभर पसरला. क्रांतिकारक बारींद्र यांनीं अशी संस्था स्थापण्याचा प्रयत्नदेखील केला. 'युगांतर' नांवाचें राष्ट्रीय पत्र कलकत्त्यास निघालें होतें त्याचा खप एक हजारवरून वाढतां वाढतां वीस हजारपर्यंत गेला. यावरूनसुद्धां तत्कालीन परिस्थितीचीं कल्पना करतां येते. बंगाल-महाराष्ट्रांत जे जहाल राजकारणाचे वारे वाहात होते त्यांत भगिनींनीं आपला वाटा उचलला होता म्हणूनच यांचा येथें उल्लेख करण्यांत येत आहे. या दोन प्रांतांचे पाठोपाठ इतर प्रांतांनींसुद्धां आपले कार्याचा वाटा उचलण्यास कमी केलें नाहीं. लाल–बाल–पाल ( लाला लजपतराय, बाल गंगाधर टिळक व बिपिनचंद्र पाल ) ही त्रयी जहाल राजकारणांत कितीतरी वर्षें अग्रेसर होती. दत्तमूर्तीला तीन मुखें असतात त्याप्रमाणें भारतीय राष्ट्रपुरुषाला लाल–बाल–पाल हीं तीन मुखें लाऊन त्याचीं चित्रें देशभर प्रसृत झालीं होतीं.

राष्ट्रांतील तरुणांना व तरुणींना स्फूर्ति देऊन देशोद्धाराचे कामास उद्युक्त करण्याचें कार्य भगिनी झंझावाताचे वेगानें करीत असत. भाषणा-

प्रमाणें त्यांनीं लेखनावरसुद्धां भर दिला व त्यांचे स्फूर्तिदायक लेख अनेक नियतकालिकांतून येऊं लागले. बिपिनचंद्र पाल यांच्या "न्यू इंडिया" या नियतकालिकांतून भारतीय स्त्रीजीवनविषयक उद्बोधक व क्रांतिकारक विचार त्यांनीं जनतेपुढें मांडले. हे सर्व लेख व नंतर आणखी कांहीं भाषणें वगैरे संकलित करून "भारतीय जीवनतंतु" ("Web of Indian Life") हें पुस्तक त्यांनीं तयार केलें. प्राचीन काळापासून चालत आलेला भारतीय महिलांचा आदर्श पुढें ठेवून भारतकन्यांना देशाचे सर्वांगीण उन्नतीच्या कार्यासाठीं उद्युक्त करणें हें कार्य या लिखाणांनीं होत गेलें. त्यांचे कन्याशाळेंत सुद्धां अशाच प्रकारचें कार्य चालत होतें. एक पुरुष कार्यकर्ता जितक्या जणांना स्फूर्ति देऊं शकतो त्यापेक्षां कितीतरी जास्त जणांना स्त्री-कार्यकर्ती स्फूर्ति देऊं शकते हें भगिनींनीं या पुस्तकद्वारें, तसेंच स्वतःच्या उदाहरणानें जगास दाखवून दिलें.

आध्यात्मिक क्षेत्रांतून त्या कशा प्रेरणा मिळवीत हेंसुद्धां पाहण्याजोगें आहे. सर्व उपनिषदांचें सार अशी जी भगवद्गीता तिच्याबद्दल त्यांना नितांत आदर वाटत असे. सर एडविन् आर्नोल्ड यांनीं केलेले "Song Celestial" हें गीतेचें इंग्लिश भाषांतर त्यावेळीं उपलब्ध होतें. त्यावरून व इतर मार्गांनीं त्यांनीं या ग्रंथाचा अभ्यास करून तो आत्मसात् केला होता. ज्या ठिकाणीं श्रीकृष्णांनीं अर्जुनाला गीताकथन केलें तें परमपूज्य ठिकाण कुरुक्षेत्र डोळ्यांखालून घालण्यासाठीं त्या एकदां मुद्दाम तिकडे गेल्या. तेथील वर्णन त्यांनीं एका ठिकाणीं केलें आहे त्याचा गोषवारा असा :—

भगवद्गीतेचें कथनक्षेत्र जें "कुरुक्षेत्र" तेथें जाण्यासाठीं मी ठाणेश्वर स्टेशनावर मध्यरात्रीं उतरलें. गाडी गडद अंधारांत पुढें निघून गेली व मी डाकबंगल्याचा रस्ता धरला. मी एकटीच असल्यानें रात्रीची शांतता भयाण वाटत होती. पण त्या शांततेचा लौकरच भंग झाला. कुरुक्षेत्रावरून ध्वनि ऐकूं येऊं लागला :—

“ कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ”

पवित्र ठिकाणचे दगडमातींतूनसुद्धां पवित्र शब्द ऐकूं येतात. पण ते सर्वांना ऐकूं येत नाहींत तर फक्त पवित्र माणसांनाच ऐकूं येतात व स्फूर्ति पण देतात. भगिनींना कुरुक्षेत्राचे भूमींतून, गौतमबुद्धाचे साधना स्थळापासून तसेंच दिल्ली व आग्रा येथील किल्ल्यांमधून सुद्धां संदेश ग्रहण करतां आले, कारण तशी पात्रता त्यांचे अंगीं होती. वनस्पतींनाच चंद्रापासून जीवन मिळतें, दगडमातीला मिळत नाहीं. असो.

याशिवाय “ मॉडर्न रिव्ह्यू ” या मासिकांत “ Religion and Dharma ” या सदराखालीं त्यांनीं एक लेखमाला लिहिली. त्यांतील लिखाण तर अतिशयच उद्बोधक ठरलें. सुमारें पस्तीस वर्षानंतर त्याचा मराठींत अनुवाद सानेगुरुजी त्यांनीं “ राष्ट्रधर्म ” या नांवाखालीं करून प्रसिद्ध केला व तेव्हांसुद्धां हा अनुवाद अत्यंत लोकप्रिय व स्फूर्तिदायक असा ठरला. त्याग, आत्मविश्वास, दिखाऊपणा, सामर्थ्य, स्वाभिमान, महत्वाकांक्षा, शिक्षण, सेवा, शील, ध्येय अशा अनेक विषयांवर लिहिलेलीं हीं छोटीं लिखाणें आज तारखेसद्धां स्फूर्तिदायक ठरतात. नमुन्यादाखल थोडीं उदाहरणें पहा :—

“ राष्ट्रीय जीवन :— आजचें राष्ट्रीय जीवन म्हणजे सर्व राष्ट्राची झगडा करण्यासाठीं उठावणी. हिमालयापासून रामेश्वरापर्यंत, पुरीपासून द्वारकेपर्यंत सर्वांनीं उठलें पाहिजे व सर्वांनीं हल्ले चढविले पाहिजेत ........ हरहर महादेव व अल्ला हो अकबर अशा गर्जना करून विशाल कर्मक्षेत्रांत विजयी होण्यासाठीं घुसा. उज्ज्वल भारताच्या पुत्रांनो, ........ अर्वाचीन जगाचीं सारीं भांडारें, सारे खजिने आपलेसे करून घेण्यासाठीं सीमोल्लंघन करा, पुढें चला, पुढें चला. भारतमातेच्या शूर सैनिकांनो, आतां मागें बघूं नका, माघार घेऊं नका. पुढें – पुढें – पुढें. शत्रुचे किल्लेकोट काबीज करा,

कावीज केलेले शिबंदी राखून सांभाळा. मोठ्या हिमतीनें, मोठ्या किमतीनें व मोठ्या श्रमानें जिंकलेले भाग पुन्हां गमवूं नका. प्रयत्न करतां करतां तुम्ही थकलां असाल तर मरा. तुमच्या मुड्यावरून तुमच्या पाठीमागून येणाऱ्या नव्या ताज्या दमाच्या तुकडीला वर चढूं दे व निशाण फडकवूं दे."

"त्याग :—हिंदुस्थानची आजची सामुदायिकरीत्या सुसंघटित रीतीनें इंग्लंडकडून लूट चालली आहे, तिचा पायाही त्यागावरच उभा आहे व ही गोष्ट इंग्रजही अभिमानानें सांगतो व आपण इंग्रजांच्या देशभक्तीचें उदाहरण म्हणून शाळांतून शिकतो. दिल्लीच्या बादशाहाची मुलगी बरी केल्याबद्दल डॉ. हॅमिल्टन् यानें स्वत:साठीं कांहींएक न मागतां आपल्या कंपनीसाठीं व्यापारी सवलती मागून घेतल्या. आपल्या संस्थेचा, संघाचा फायदा त्यानें पाहिला. ज्या चळवळींत त्याग नाहीं, ज्या चळवळीच्या बुडाशीं आध्यात्मिक त्यागाची शक्ति नाहीं, ज्या चळवळींत संन्यासाचें धगधगीत तेज नाहीं त्या चळवळीची कोणासही भीति वाटावयास नको. परंतु त्यागावर उभारलेली चळवळ, फकिरांनीं चालवलेली चळवळ, ही विश्वाला गदगदां हालवील."

"ध्येय (हातीं पडलेलें काम) :— महान् ध्येय दाखवितांच बहुजन समाज उचंबळतो, त्या महापुरुषाच्या कामांत भाग घ्यावयास सारे धाव घेतात. मोठ्या यंत्रांतील लहान लहान भाग होणें याहून महत्त्वाचें दुसरें कांहीं नाहीं. महाकाव्यांतील शब्द बना, भगवद्गीतेंतील अक्षर बना, फुलाच्या हारांतील फूल बना, फुलांतील पाकळी बना, चक्रांतील स्क्रू बना, सतारीची खुंटी बना, तार बना, सिंधूंतील लाटा बना, लाटांतील बिंदु बना, दगडांतील अणुपरमाणु बना—मोठ्या गोष्टींत मिळून जाऊन स्वत:ही मोठे व्हा. राष्ट्रांत प्रचंड क्रांति सुरू होतांच तिच्यांत पडेल तें काम करण्यास तयार व्हा. जें ध्येय राष्ट्रानें समोर ठेवलें असेल त्याच्या-भोंवतीं प्रदक्षिणा घालावयास लागा. त्या ध्येयपुरुषाचे रक्तांतील शुद्ध रक्तच आपल्याही नसांनसांतून उडो, उसळो. ध्येयाला अहितकारक, ध्येयाला

कमीपणा आणणारे, ध्येयाला मारक, कांहींही आपण करतां कामा नये. ध्येयाला फुलविणारें, वाढविणारें जें जें असेल तें केल्याशिवाय राहतां कामा नये."

"दिखाऊपणा :— आपण आपलें कार्य गाजावाजा न करतां निसर्गाप्रमाणें मुकेपणानें अहोरात्र करूं या. कळीचें सुंदर फूल होतें पण किती शांतपणें, रात्रंदिवस झगडून तें होतें ? कांहींतरी करून प्रसिद्ध होण्याची जी वृत्ति, आत्मश्लाघेची ही जी फाजील आवड, त्यांना आपण झगडून फेकून देऊं या. आपलें कार्यच आपण शब्दांपेक्षां थोर करूं या. आजकालचें जग गाजावाजाच फार करतें; आजच्या जगाला ती संवयच लागली आहे. आपल्या पूर्वजांची गंभीर व धीरोदात्त वृत्ति, निरहंकारी परंतु तेजस्वी अभिमान, यांपासून आपण दूर जात आहों. आपल्या पूर्वजांना अहंकार नसे. ही अहंकारशून्यताच, स्वतःची जाणीवही विसरणें यांची आपणांस आज फार जरूरी आहे. निरहंकारी होण्याचा मार्ग एकच आहे. त्यासाठीं आपले विचार व आपलीं ध्येयें स्वतःच्या जीवनाहून आपणांस थोर वाटलीं पाहिजेत."

"महत्त्वाकांक्षा :— खाणावळी व हॉटेलें काढण्याच्या महत्त्वाकांक्षा द्या फेकून. कारकून व नोकर होण्याच्या महत्त्वाकांक्षा घाला त्या चुलींत. आपण शिकूं व जगाला शिकवूं ही महत्त्वाकांक्षा बाळगा, मानवजातीला देण्यासाठीं आपणही सत्य शोधून काढूं ही इच्छा धरा."

यांशिवाय "प्रबुद्ध भारत" मासिकांतील प्रासंगिक स्फुट लेख दरमहा भगिनीच लिहीत असत. तसेंच न्यू इंडिया, डॉन्, संध्या, वंदेमातरम्, स्टेट्समन या नियतकालिकांशीं त्यांचा संबंध लेखद्वारें अगर इतर मार्गांनीं येत असे. यापैकीं बरेच स्फुट लेख नंतर पुस्तकद्वारें प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. "Foot-Falls from Indian History," "Civic and National Ideals," "Hints on National

Education in India", "Religion and Dharma" हीं भगिनींचीं पुस्तकें बहुशः अशा संकलित लेखांपासून बनलीं गेलीं. जाणूनबुजून ग्रन्थ म्हणून लिहिलेलीं पुस्तकें ह्यांशिवाय इतर आहेतच.

ह्या वेळीं अधिकारावर असलेले गव्हर्नर जनरल लॉर्ड कर्झन् ह्यांच्याबद्दल पूर्वी थोडासा उल्लेख आला आहेच. ब्रिटिश साम्राज्याचे एक बळकटपैकीं हस्तक म्हणून जशी त्यांची ख्याति आहे तशीच दडपशाहीच्या बाबतींत पण आहे. त्यांच्या दडपशाहीच्या धोरणामुळें "कर्झनशाही" हा नवीनच शब्द दडपशाही ह्या अर्थानें या वेळीं रूढ झाला हें वाचकास माहीत असेलच. बंगालमध्यें जें राजकीय आंदोलन चालूं होतें त्यामुळें शासनयंत्रावर बराच ताण पडत होता व राज्यकारभाराचे सोईसाठीं म्हणून त्यांनीं बंगालची फाळणी करण्याचें ठरवलें. प्रक्षुब्ध बंगाल्यांचीं मनें ह्यामुळें जास्तच प्रक्षुब्ध झालीं व सर्वशक्ति एकवटून जनतेनें आपला विरोध व्यक्त करण्याचें ठरवलें. ता. १६–१०–१९०५ ही वंगभंगाची तारीख ठरविण्यांत आली होती. त्या वेळीं भगिनी आजारी असल्यानें हवापालटीसाठीं दार्जिलिंगला गेल्या होत्या, तरी त्यांचें सर्व लक्ष कलकत्त्यांतील हालचालीकडे होतें. हा दिवस बंगालभर सुतकाचा दिवस म्हणून पाळण्यांत आला, उपवास करण्यांत आले, हरताळ पडले व ठिकठिकाणीं निषेधदर्शक सभा भरवून मिरवणुकी काढण्यांत आल्या. यानंतर राष्ट्रीय आंदोलनास एकदम उठाव मिळाला, शाळा-कॉलेजांवर बहिष्कार पडूं लागले, राष्ट्रीय शिक्षणासाठीं फंड गोळा करण्यांत येऊं लागला व वातावरण गंभीर झालें. सरकारी धोरणाविरुद्ध प्रतिकार म्हणून स्वराज्य, राष्ट्रीय शिक्षण, परदेशी मालावरील बहिष्कार व स्वदेशीप्रचार या चतुःसूत्रीवर भर देण्यांत आला. परदेशी मालावरच्या बहिष्काराचें क्षेत्र इतकें विस्तृत झालें होतें कीं दोन-दोन चार-चार वर्षांच्या मुलांनांसुद्धां देशी व विदेशी हे शब्द माहीत झाले. डांस चावूं लागले म्हणून एवढ्याशा एका लहान मुलानें आईला विचारलें कीं "डांस हे देशी आहेत कीं विदेशी ?"

"देशी आहेत" असें उत्तर मिळाल्यावर तो म्हणाला, "मग मी त्यांना मारणार नाहीं." सबंध देशांतील वातावरण जणूं जादूच्या कांडीनें बदलून गेलें होतें.

राष्ट्रीय सभा ही संस्था अद्यापपर्यंत अर्जविनंत्या यापलीकडे गेली नव्हती. पण तिनेंसुद्धां १९०५ चे बनारस येथील अधिवेशनांत जहाल राजकारणाचा अंशतः स्वीकार केला. नामदार गोखले हे या अधिवेशनास अध्यक्ष म्हणून होते. त्यांनीं हिंदी जनतेच्या तक्रारी व आकांक्षा इंग्लंडमध्यें ब्रिटिश सरकारच्या कानांवर घातल्या होत्या व बंगालचे फाळणीमुळें होत असलेला अन्याय पण ब्रिटिश सरकारपुढें व जनतेपुढें मांडून ते नुक्तेच परत आले होते. या अधिवेशनांत बहिष्काराचा ठराव प्रत्यक्षपणें आला नाहीं तरी त्यावर वाटाघाट बरीच झाली. मात्र पुढील वर्षाचें अधिवेशन कलकत्ता येथें दादाभाई नौरोजी यांचे अध्यक्षतेखालीं भरलें तेव्हां अध्यक्षांचे वजनामुळें चतुःसूत्रीस पूर्ण मान्यता मिळाली. कॉंग्रेसमध्यें खरें वर्चस्व प्रागतिक पक्षाचेंच अजूनही होतें तरीपण लो. टिळक, अरविंद घोष व भगिनी यांच्यासारख्या जहाल पुढाऱ्यांचे मतांस अध्यक्षांच्या वैयक्तिक धोरणामुळें थोडीशी किंमत मिळाली. जहाल पक्षाच्या हातांत राष्ट्रीय सभेचीं सूत्रें यानंतर सुमारें आठ वर्षांनीं (लो. टिळक कारागृहांतून सुटून आल्यानंतर) आलीं.

राजकीय आंदोलनाचे झंझावातांत भगिनी पडल्या होत्या तरीपण भारताचे उद्धाराचीं इतर विधायक साधनेंही त्यांचे दृष्टीआड झालीं नव्हतीं. १९०४ चे अखेरीस त्यांनीं जगदीशचंद्र बोस, रवींद्रनाथ टागोर, स्वामी सदानंद व स्वामी शंकरानंद यांचेसह बोधगयेस एक सांस्कृतिक दौरा काढला. तेथें गौतमबुद्धास ज्या ठिकाणीं निर्वाणप्राप्ति झाली त्या बोधीवृक्षाखालीं त्या बसल्या असतां त्यांना वज्रचिन्हांकित अशी आसनशिला दिसून आली. त्यावरील वज्राचे चिन्हावरून त्यांनीं

त्याचा इतिहास ध्यानांत आणला. हें इंद्राचें शस्त्र सर्व शस्त्रांत प्रभावी असें असून कशाचाही चुराडा करण्यास तें समर्थ आहे व याकरितां दधीचि ऋषींना आपला देह अर्पण करावा लागला हें सर्व वर्णन त्यांना आठवलें. संपूर्ण बलिदान करण्याचें ध्येय या चिन्हावरून व्यक्त होतें, तसेंच अचाट सामर्थ्याचीसुद्धां जाणीव होते म्हणून त्यांना हें चिन्ह फार आवडलें व त्यांनीं लिहिलेल्या सर्व पुस्तकांवर त्यांनीं हें चिन्ह मुद्रांकित करण्याचें ठरविलें. त्यांचे पुस्तकांवर आजही हें चिन्ह आढळून येतें.

बोधगया येथील दिव्य वातावरणांत त्यांनीं एक आठवडा काढल्यानंतर उरुबेल, राजगीर, बनारस व प्रयाग या ठिकाणीं त्यांनीं यात्रागमन केलें. बुद्धदेवांस साधनकाळीं पायस देऊन जीवदान देणाऱ्या सुजाताचें उरुवेल हेंच गांव. सुजाताचा भक्तिभाव व बुद्धदेवाची साधना यांचीं भगिनींना स्मृति येऊन गहिंवरून आलें व या भावनेनें त्यांना धन्यसें वाटलें. तेथून नालंदा येथील गुप्तकालीन महाविद्यालयाचे अवशेष पाहण्यास त्या गेल्या. अशा प्रत्येक स्थळापासून त्यांना कांहींतरी स्फूर्ति मिळाल्याशिवाय राहात नसे. अशी स्फूर्ति नेहमीं मिळत राहावी म्हणून येथील अवशेषांपैकीं एक वीट तसेंच सारनाथ येथील स्तूपांपैकीं एक दगड त्यांनीं बरोबर घेतला. कलकत्त्यास आल्यानंतर या वस्तु तेथील स्फूर्तीची स्मृति म्हणून त्यांनीं जपून ठेवल्या व त्या वस्तु आपलें कार्य सतत करीत होत्या. सहा वर्षांपूर्वीं अमरनाथ यात्रा केल्यानंतर स्वामीजींनीं त्यांना सांगितलें होतें कीं "ही यात्रा आतां तुम्ही केली आहे व तिचेपासून सतत स्फूर्ति व दिव्य असा आनंद तुम्हांला मिळाल्याशिवाय राहाणार नाहीं." स्वामीजींचें म्हणणें त्या विसरल्या नव्हत्या व इतर यात्रांपासूनसुद्धां त्यांना तसा अनुभव येत होता. म्हणूनच दगडविटांचा संग्रह करण्यास त्यांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं. ह्या दगडविटासुद्धां त्यांच्याशीं सांकेतिक भाषेंतून बोलत असत व भारताचे गत ऐश्वर्याची जाणीव करून देत असत.

गौतमबुद्धाचे दिव्य जीवनाविषयीं स्वामी विवेकानंद यांना अतिशय आकर्षण वाटत असे व खरोखरीच तशा दिव्यत्वाचा अंश स्वामीजीं-मध्येंसुद्धां वास करीत होता. भक्त परमेश्वराशीं जसा एकरूप होतो तसें स्वामीजी बुद्धिजीवनाशीं एकरूप होत होते व हें भगिनींना माहीत होतें. त्या एकरूपत्वाची स्मृति म्हणून त्यांना बुद्धदेवाप्रमाणें पद्मासन घालून बसलेलें असें स्वामीजींचें चित्र करून घ्यावें अशी कल्पना सुचली. त्याळवेचे सुप्रसिद्ध कलाकार अवनींद्रनाथ टागोर हे भगिनीचे चाहते होते व भगिनींनीं त्यांना अनेक तऱ्हांनीं उत्तेजन देऊन मार्ग-दर्शन केलें होतें. योजलेलें चित्र तयार करण्यासाठीं त्यांनीं त्यांना बोलावून घेतलें तेव्हां अत्यंत कलात्मक व तादात्म्ययुक्त असें त्यांचें संभाषण झालें तें असें :—

आपले एक सहाध्यायी सुरेंद्र गांगुली यांचेबरोबर अवनींद्रनाथ भगिनीकडे गेले तेव्हां कोचावर नेहमींप्रमाणें खालीं पाय सोडून बसले. भगिनींनीं हातांत बुद्धदेवांचा पद्मासनस्थ पुतळा घेतला व याप्रमाणें बसा अशी त्यांना विनंति केली. त्याप्रमाणें ते जमिनीवर बसल्यानंतर "तुम्ही बुद्धरूप आहां" असें त्यांना म्हणून "हा पुतळा कोणाचा आहे ?" असें विचारलें. हा बुद्धदेवाचा पुतळा आहे असें साहाजिकच त्यांनीं उत्तर दिलें. पण त्यावर त्या म्हणाल्या "नाहीं. हा स्वामीजींचा पुतळा आहे."

जरा वेळ थांबून त्यांनीं त्यांना 'स्वामीजींचें या आसनांतील तैलचित्र बनविण्याची विनंति केली. खुद्द चित्रकार, ज्याचा भाव चित्रांत व्यक्त करावयाचा ती व्यक्ति व ज्याचें चित्र काढावयाचें ती व्यक्ति हे तिघेही एकरूप झाल्याशिवाय कलाकृति चांगली उठणार नाहीं ही गोष्ट अशा तऱ्हेनें भगिनींनीं त्यांच्या नजरेस आणली. असो.


त्याचप्रमाणें भगिनींनीं अजिंठा येथील लेण्यांचीं तैलचित्रें तयार करण्या-साठीं नंदलाल व असितकुमार या कलाकारांना पाठवलें होतें व त्यांचें

काम पहाण्यासाठीं त्या स्वतः पण तिकडे गेल्या होत्या. स्वामीजींनीं त्यांना भारतीय कला व स्थापत्य यांबद्दल वेळोवेळीं सूचना दिल्या होत्या. त्या फलद्रूप व्हाव्या व भारतानें या बाबतींतसुद्धां आघाडीवर असावें अशी त्यांना तळमळ होती. शिवाय " भारतमातेचा उद्धार हेंच कलेचें आजचें ध्येय आहे " अशी त्यांची धारणा होती.

या काळांत कांहींतरी दिव्यशक्ति भगिनींचे अंगीं संचारून आपलें इच्छित कार्य करून घेत होती असें दिसतें. या काळांत त्यांचा तत्कालीन सर्व प्रमुख व कर्तृत्ववान् व्यक्तींशीं परिचय होत होता व त्यापैकीं अरविंद घोष यांचा तर प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे. इंडियन् सिव्हिल् सर्व्हिस्‌चे परीक्षेंत हे पहिल्या वर्गांत पास झाले व नंतरचे अश्वारोहणाचे चाचणींत मात्र उत्तीर्ण झाले नाहींत ही एक दैवी घटनाच म्हटली पाहिजे. जर ते यांत उत्तीर्ण झाले असते तर त्यांचें सर्व आयुष्य बहुतेक परकी सरकारचे मुलकी अधिकाराचे नोकरींत गेलें असतें, त्यांचे कर्तृत्वाला वाव मिळाला नसता, भरतभूमि एका कार्यकर्त्याला मुकली असती व सर्व जग एका योगीश्वराला मुकलें असतें. पण नियतीला तसें करावयाचें नव्हतें म्हणूनच ते अश्वारोहणाचे चांचणींत अनुत्तीर्ण झाले. बडोद्याचे तत्कालीन महाराज सयाजीराव गायकवाड यांनीं त्यांना ताबडतोब आपले संस्थानचे नोकरीसाठीं म्हणून बोलावलें व तेथेंच होळकर कॉलेजमध्यें प्रिन्सिपल्‌चें काम करीत असतां १९०६ सालीं त्यांना आपले नियुक्त कामासाठीं बाहेर पडण्याचा आदेश मिळाला. त्यांना योगमार्गाची आवड असल्यानें या मार्गांत त्यांची यावेळीं थोडी प्रगति झाली होती व त्याशिवाय राजकारणांत ज्वलज्जहाल-मतवादी असल्यानें " इदं ब्राह्ममिदं क्षात्रं शापादपि शरादपि " ही भूमिका त्यांचे अंगीं बाणली होती. राष्ट्रीयत्व म्हणजेच धर्म व धर्माचे अधिष्ठाना-विरहित भारतांत राष्ट्रीयवाद वाढू शकणार नाहीं अशी त्यांची खात्री होती. तत्कालीन राष्ट्रीयवाद हा एक परमेश्वराचा अवतार असल्यानें तो कोणा-

कडूनही नष्ट केला जाणें शक्य नाहीं, असें त्यांनीं आव्हान दिलें होतें. श्रीरामकृष्ण परमहंस यांची आध्यात्मिकता व स्वामी विवेकानंदांचा राष्ट्रधर्म हीं दोन्ही त्यांनीं आत्मसात् केलीं होतीं. अर्थात् भगिनी निवेदिता करीत असलेले कार्याचें महत्त्व त्यांनीं जाणलें होतें व त्यास त्यांनीं संपूर्ण हातभार लावला यांत नवल नाहीं. बडोद्यास असतांनाच बंगालमधील राजकीय क्रांतीची पूर्वतयारी करण्यास त्यांनीं हस्तें-परहस्तें मदत केली होती व शेवटीं वंगभंगानंतर १९०६ सालीं बडोदें येथील व्हा. प्रिन्सिपलची ७५० रु. पगाराची नोकरी सोडून कलकत्त्यांत राष्ट्रीय कॉलेजमध्यें फक्त १५० रुपयांवर प्रिन्सिपल म्हणून ते रुजू झाले. यावेळेस काम व कांचन यांची आसक्ति त्यांनीं संपूर्णपणें टाकून दिली होती व क्रांतिकारकांनासुद्धां ते आधार देत असत. माणिकतोळा बॉंबप्रकरणांत त्यांचा हात असावा अशा संशयावरून सरकारनें त्यांना पकडून तुरुंगांत ठेवलें व खटला भरला. पण एक वर्ष तुरुंगवासानंतर निर्दोषी म्हणून त्यांना मुक्त करण्यांत आलें. या एक वर्ष एकांताचा फायदा घेऊन त्यांनीं तीव्र अशी 'योगसाधना तुरुंगांत केली व अखेरीस भगवान् श्रीकृष्णांनीं त्यांचे हातांत भगवद्गीता देऊन मार्गदर्शन केलें अशा प्रकारचें दर्शन त्यांना झालें.

यानंतर वैयक्तिक कर्तृत्वाबद्दलचीसुद्धां त्यांची आसक्ति कमी होत चालली व एकांतांत योगसाधना करण्याचा आदेश त्यांना येऊं लागला. कांहीं महिने कलकत्त्यास काढल्यानंतर ते १९१० सालीं पॉंडिचरी येथें योगसाधनेसाठीं गेले तेव्हां भगिनींना आपले एक सहकारी गेल्याबद्दल अतिशय वाईट वाटलें. तेथून पुढें एकांतांत राहाण्याचें त्यांनीं ठरविलें त्यामुळें कोणाचीच त्यांची गांठभेट होईनाशी झाली. १९५० सालीं समाधिस्थ होईपर्यंत तेथेंच आपल्या साधनेंत ते गर्क होते. १९०२ ते १९१० या कालांत त्यांनीं भगिनींना अनेक प्रकारें सहकार्य देऊन राजकीय आंदोलनांत झंझावाताप्रमाणें भाग घेतला होता हें खरें. पण त्यांचा पिंड मुख्यतः राजकारणी नसून योगसाधनेस अनुकूल असाच होत



योगी अरविंद घोष

व म्हणूनच आयुष्याचीं शेवटचीं चाळीस वर्षें त्यांनीं पाँडिचरी येथें पूर्ण एकांतांत योगसाधना करण्यांत घालवलीं. हा त्यांचा नैसर्गिक कल जाणून भ. निवेदिता यांनीं त्यांना सुरुवातीसच स्वामी विवेकानंदकृत " राजयोग " हें पुस्तक भेटीदाखल दिलें होतें.

असो. १९०३ ते १९०७ च्या मध्यापर्यंतच्या काळांत दुर्दम्य उत्साह, असामान्य धारणा व आत्यंतिक तळमळ यांचे जोरावर भगिनींनीं किती क्षेत्रांत कार्य रेटलें होतें याची थोडीशी कल्पना वाचकांना आली आहेच. स्वतःचे शरीराची पर्वा न करतां अव्याहतपणें कार्याचे आघात सहन करणें त्यांच्या मनास शक्य झालें पण शरीरावर मात्र अनिष्ट परिणाम होत गेले. त्या भारतांत आल्या तेव्हां " स्वतः म्हणजे मूर्तिमंत आरोग्य व मूर्तिमंत उत्साह आणि मुखकमलावरून तर मुसमुसणारें तेज ओसंडून जात होतें " असें त्यांच्या शरीरप्रकृतीचें वर्णन सौ. अबला बोस यांनीं केलें आहे. पण कामाचा फाजील ताण पडल्यामुळें त्यांची प्रकृति वरचेवर ढासळत गेली. १९०३ सालीं कामाच्या शिणवट्यामुळें त्यांना बरीच अस्वस्थता आली होती तर १९०५ सालीं तीस दिवस मुदतीचा दोषी ताप व मेंदूतील ताप यांमधून त्यांना जिवानिशी कसें तरी पार पडावें लागलें. पुनः १९०६ चे अखेरीस त्या आजारी होत्याच. या सर्व दुखण्यांतून बाहेर पडण्यांत त्यांची किती तरी शक्ति खर्च झाली व त्यांची पूर्वीची देहयष्टि त्यांना पुनः उपलब्ध झाली नाहीं. पण देह हा नियुक्त कार्यासाठीं झिजल्यानेंच त्याचें साफल्य होतें व आत्मस्वरूप कधींच झिजत नाहीं, फुटत नाहीं व तुटत नाहीं, हें तत्त्व त्यांचे अंतरंगांत पूर्णपणें बाणलेलें असल्यामुळें त्यांनीं देहाची पर्वा कधींच केली नाहीं. पर्वा केली फक्त नियुक्त कार्याची.

या अवधींत कन्याशाळेचे संचालनाची जबाबदारी 'इतर भगिनीवर्गानें स्वीकारली होती पण आर्थिक बाजू पाहणें भगिनींच्याकडेच होतें. शाळेच्या व इतर सर्व कार्यांचे जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्याकरितां

भगिनींना या अवधींत ३-४ ग्रंथांचें लेखन करून पैसा कमवावा लागला. पैशाची टंचाई सारखी भासत होती म्हणून मध्यंतरी कांहीं काल शाळा बंद ठेवावी लागली होती* व नंतरचे सालीं त्या आजारी होत्या तेव्हां औषधोपचारापुरतेसुद्धां पैसे त्यांचेजवळ नव्हते.

" आपले कार्यासाठीं पैसा कोठून आणावा ? " असा प्रश्न स्वामी विवेकानंद यांना एकजणानें केला होता. त्याचें उत्तर स्वामीजींनीं प्रश्नानेंच दिलें होतें. तो प्रश्न हा :– " मनुष्य पैसा तयार करतो कीं पैसा मनुष्यास तयार करतो ? "

अशा दिव्य शिकवणींतून तावूनसुलाखून भगिनी निघाल्या होत्या. त्यांनीं पैशांबद्दल कोणांजवळ अक्षरहि न काढतां परदेशांत जाऊन पैसा मिळवून आणण्याचें ठरविलें व १९०७ चे मध्याचे सुमारास त्यांनीं इंग्लंड-कडे प्रयाण केलें. भारतासाठीं पाश्चात्य देशांत कांहीं कार्य करण्याचीसुद्धां त्यांची इच्छा होती व त्यांच्या हलक्या झालेल्या प्रकृतीस हवापालटपण पाहिजे होती.

× × ×

---

* राष्ट्रीय कन्याशाळेस सुरुवातीस कांहीं अडथळे आले पण तिचें कार्यच राष्ट्रीय असल्यानें पुढें ती भरभराटीस आली व १९१८ मध्यें रामकृष्ण मिशननें ती ताब्यांत घेतली.

१९५२ सालीं या शाळेचा अर्धशत-सांवत्सरिक उत्सव कलकत्त्यास साजरा झाला तेव्हां राज्यपाल श्री. मुकर्जी यांचे अध्यक्षतेखालीं प्रचंड सभा भरली होती व भारताचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, यांच्यासह अनेकांचे शुभसंदेश आले होते.

लंडन येथेंसुद्धां या सुमारास ( १९५३ चे सुरुवातीस ) भगिनींच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठीं श्रीरामकृष्ण वेदांत केंद्रामार्फत सभा भरवली होती. येथें राजेसाहेब, राणीसाहेब यांचे तसेंच श्री. अर्ल् माउंटबॅटन्, श्री. बिधनचंद्र रॉय, श्री. मोरारजी देसाई, श्री. बाळ गंगाधर खेर वगैरेंचे शुभसंदेश आले होते.

# ७ : शांतताकाळांतील कार्य

" फारच थोडें कार्य झालें आहे. अजून कितीतरी व्हावयाचें आहे. "

*भ. निवेदिता*

*    *    *

" भारताचे आधिभौतिक उन्नतीसाठीं लागणारें द्रव्य पश्चिमेकडूनच यावें लागेल. "

*स्वा. विवेकानंद यांची भविष्यवाणी*

*    *    *

" नारिकेल कवचाऐसें । हें शरीर तुज दिधलेसें ।
साधनीं ।
जइं कर्मसाधना झाली । बुडुं दे तें कर्मी खालीं ।
ना गणीं । "

*स्वा. विवेकानंद*—भाषांतर डॉ. सावरकर

*    *    *

भ. निवेदिता या खेपेस पाश्चात्य देशांत गेल्या त्या सुमारें दोन वर्षें इंग्लंड–अमेरिकेंत होत्या. श्री. जगदीशचंद्र बोस हे यावेळीं आपल्या वनस्पतिक्षेत्रांतील संशोधनांना मान्यता व प्रसिद्धि मिळविण्या-साठीं वरचेवर तिकडे येत–जात होते, त्यांची व सौ. बोस यांची भगिनीशीं नेहमीं गांठ पडत असे. त्यांचे स्वतःचे ग्रंथांचें प्रकाशनकार्य भगिनींना लंडनमध्यें करावयाचें होतें. शिवाय भारतीय नियतकालिकांसाठीं त्या तेथून-पण लिखाण पाठवीत असत व त्यांचें ग्रंथलिखाण पण चालूंच होतें. त्यांनीं तेथें अनेक व्याख्यानद्वारां भारतीय जीवनाची चक्षुर्वैसत्यम् हकीकत पाश्चात्य जनतेपुढें मांडली व त्यामुळें ख्रिस्ती मिशनरी व साम्राज्यशाही घटकांकडून भारताबद्दल जो अपप्रचार चालविला जात होता त्यास सडेतोड उत्तरें मिळत गेलीं. या मुदतींत त्यांना तिकडे पैसापण भरपूर मिळाला, तसेंच भारतासाठीं तनमनधन अर्पण करणाऱ्या व भारताचे उन्नतीसाठीं मुक्तहस्तें द्रव्यदान करणाऱ्या अनेक व्यक्ति त्यांना भेटल्या. १८९८ सालीं त्यांचेबरोबर काश्मीरयात्रा करणाऱ्या महिला श्री. ओलबुळ (धीरामाता) व कु. मॅक्लेऑड् (जया) यापण त्यांना भेटल्या. श्री. ओलबुळ् यांनीं त्यांना आपले स्वतःचे कन्येप्रमाणें मानलें होतें व त्यांच्याच बिऱ्हाडीं भगिनी बरेच दिवस राहात असत.

शरीरस्वास्थ्याच्या दृष्टीनें हे दिवस त्यांना चांगले गेले. त्यांचें तन तिकडे होतें पण मन मात्र भारताकडे असल्यामुळें इकडील सर्व बातम्या व घटनांकडे त्या डोळे लावून पाहात असत. लॉर्ड कर्झन् यांची कारकीर्द संपली व लॉर्ड मिंटो हे गव्हर्नर जनरल झाले होते तरी दडपशाहीचे धोरणांत कांहीं फरक पडला नव्हता. नाममात्र अशा कांहीं राजकीय सुधारणा जनतेला देण्याचा मात्र विचार राजकीय गोटांत चालू होता. नवीन प्रेस् ॲक्ट् झाल्यानें राष्ट्रीय बाण्याचे सर्व वृत्तपत्रांची मुस्कट-दाबी झाली होती व अनेक पत्रें बंद पडलीं होतीं. महाराष्ट्रांत लो. टिळकांवर खटला होऊन त्यांची मंडालेला रवानगी झाली होती. अरविंद

अनुक्रम ३२८९३ दि. ...
क्रमांक ...१०२६... नों. दि. ...

घोष व लाला लजपतराय यांना वर्ष, सहा महिने स्थानबद्ध करण्यांत आलें होतें. तसेंच बाँब तयार करण्याबद्दल व त्यांचे प्रयोग केल्याबद्दल संशयित गुन्हेगारांना अटकवून ठेवून भयंकर प्रमाणांत शिक्षा देण्यांत येत होत्या, व यानंतर देशांत धीरगंभीर अशी शांतता वावरत होती.

दडपशाहीचा वरवंटा इतक्या क्रूरपणें फिरवला जात होता कीं जनता दिङ्मूढ होऊन गेली व पुढारी तुरुंगांत असल्यानें चोहोंकडे सुन्न असें वातावरण उत्पन्न झालें होतें. तत्कालीन स्टेट सेक्रेटरी यांनींसुद्धां इतक्या तीव्र दडपशाहीबद्दल आपलें प्रतिकूल मत व्यक्त केलें होतें व व याचा परिणाम बाँबचे प्रयोगांतच होण्याचा संभव आहे अशी सूचना त्यांनीं गव्हर्नर जनरल लॉर्ड मिंटो यांना केली होती.

देशांत ज्वलज्जहाल आंदोलन चालू होतें तरीपण राष्ट्रीय सभा अजून नोकरीवाल्यांचे व प्रागतिकांचे वर्चस्वाखालींच होती. १९०७ सालीं सुरत येथील अधिवेशनांत जहाल पक्ष व प्रागतिक पक्ष यांचे मतभेद इतके विकोपास गेले कीं प्रत्यक्ष जोडाजोडी होऊन अधिवेशन उधळलें गेलें. पक्षांपक्षांतील भांडणापायीं आपण आपला अमूल्य वेळ व साधनें वायां घालवीत आहों हें पाहून भगिनींना खेद वाटला. त्या म्हणतात— "वस्तुतः राष्ट्रीय सभा ही पक्षीय राजकारणासाठीं नाहींच. देशांतील सर्वांगीण आंदोलनाचें एकच एक असें राजकीय अंग म्हणजेच राष्ट्रीय सभा."

१९०९ सालीं भगिनींच्या आई इंग्लंडमध्यें आजारी पडल्या तेव्हां त्यांना भेटण्यासाठीं त्या अमेरिकेहून मुद्दाम आल्या. त्यांची व आईची ही शेवटचीच गांठ-भेट. इंग्लंडबाहेरील जगांत उलथापालथ करणाऱ्या आपल्या कन्येला पाहून त्यांना गहिंवरून आलें व वेळेवर गांठ पडल्यानें त्यांचा जीव शांत झाला. लौकरच आईचे दिवस भरले व भगिनींना

त्यांचे अंत्यसंस्कार करूनच तेथून निघावें लागलें. तेथून परभारेंच त्या हिंदुस्थानला रवांना झाल्या.

इकडे देशांत दहशतवादी कृत्यांचे आविष्कारानंतर झालेल्या दडपशाही-मुळें राजकीय क्षेत्रांत धीरगंभीर असें वातावरण उत्पन्न झालेलें भगिनींच्या नजरेस आलें व त्यांचे मनांत उलटसुलट असे अनेक विचार येऊं लागले. जनता असंतुष्ट होती तरीपण मोर्ले-मिंटो सुधारणा राबवून घ्याव्यात असा मतप्रवाहच जास्त प्रामुख्यानें दिसून येत होता. अरविंद घोष हे एक वर्षाच्या बंदीवासानंतर नुक्तेच मुक्त झाले होते व त्यांच्याशिवाय एकही जहाल कार्यकर्ता बाहेर उरला नाहीं, असें भगिनींना दिसून आलें. त्यांनीं त्यांचेबरोबर विचारविनिमय केला. मोर्लें-मिंटो सुधारणा म्हणजे केवळ दिखाऊ आहेत असें दोघांच्याही नजरेस आलें.

अरविंद घोष हे एक वर्षपर्यंत स्थानबद्ध होते. तेवढ्यांत त्यांनीं एकांताचा फायदा घेऊन आपल्या आवडत्या योगविद्येंत बरीच प्रगति केली होती व त्यांना दिव्यदर्शनप्राप्ति पण झाली होती. पण त्यामुळें त्यांचा कार्यकर्त्याचा अहंकार व त्वेषभाव कमी झाला होता. तुरुंगांतून बाहेर पडल्यानंतर त्यांनीं उत्तारपारा येथें एक सार्वजनिक भाषण केलें त्यांत त्यांची बदललेली भूमिका स्पष्ट झाली. राष्ट्रसंवर्धन म्हणजेच धर्म-संवर्धन हें त्यांनीं ठांसून ठांसून सांगितलें,* तरीपण ज्वलज्जहाल व प्रक्षुब्धकारक अशी राजकीय आंदोलनें आतां त्यांचेकडून होणार नव्हतीं.

---

"When, therefore, it is said that India shall rise, it is the Sanatan Dharma that shall rise. When it is said that India shall be great, it is the Sanatan Dharma that shall be great. When it is said that India shall expand and extend herself, it is the Sanatan Dharma that shall expand and extend itself over the world."

*Aurobindo Ghose.*

११५२१

" सर्व विष्णुमयं जगत् " असा तुरुंगांत त्यांना अनुभव आला होता व ज्या परमेश्वरी शक्तीनें राजकीय आंदोलनास जोर मिळालें, तीच अनेकविध मार्गांनीं आपलें योजलेलें कार्य करीत आहे असें त्यांना दिसून आलें.

" या काळीं वावरत असणारी राजकीय क्षेत्रांतील मृतवत् शांतता हीसुद्धां भगवंतानें आपले हेतुपूर्ततेसाठीं निर्माण केली आहे, विरोधकांचा विरोध चालतो तोसुद्धां भगवंताचे मर्जीनेंच चालतो आणि अनुकूल व प्रतिकूल दिसणाऱ्या सर्वच घटना भगवंताचे नियोजित कार्यास साहाय्यभूत होत असतात. राष्ट्रोद्धाराचें कार्य हेंच आज भगवंताचें नियोजित कार्य आहे व तें अनेकांच्या हस्तें तो करवून घेत आहे. व्यक्तीस वाटतें कीं माझ्या करण्यानें असें होतें तसें होतें. पण हा निव्वळ अहंकार असून परमेश्वरी शक्ति हीच खरी कार्य करणारी असून मनुष्य हें केवळ साधन आहे. अशा अनेक साधनांचा उपयोग त्या शक्तीस वेळोवेळीं करावा लागतो; पण हें व्यक्तीचे लक्षांत येत नसल्यानें त्याला स्वतःच्या कार्याचेंच अवास्तव महत्त्व वाटत असतें " अशा प्रकारची दृढ विचारसरणी त्यांची बनली होती.

" तुझे कार्यासाठीं या दिव्यशक्तीवर विश्वास ठेव व निश्चिंत रहा " असा संदेश त्यांना मिळाला होता व पुढील पिढींत राष्ट्रीय जागृति वाढणार असून जास्त लायक असे पुढारी पण निर्माण होणार आहेत व कार्य व्यवस्थित पुढें चालणार आहे असें भविष्य त्यांना दिसत होतें. जहाल आंदोलन करणारे अरविंद घोष यांचें हें मत-परिवर्तन म्हणजेच राजकीय संन्यासाची पूर्वतयारी होय हें भगिनींच्या लक्षांत आलें. तरीपण राष्ट्रांत चेतना आणण्याचें कार्य या दोघांनीं परस्पर साहाय्यानें पुनः सुरू केलेंच. अरविंद घोष यांनीं ' कर्मयोगिन् ' या नांवाचें नवीन साप्ताहिक सुरू केलें व विधायक अशा राजकीय जागृतीचे कार्याची पुनः मुहूर्तमेढ रोवली.

" कर्मयोगिन् " पत्राचें धोरणच मुळीं पूर्वींच्या जहाल-पक्षीय धोरणा-पेक्षां वेगळें असें आखण्यांत आलें. राष्ट्रीय आंदोलन हा परमेश्वराचा अवतार आहे व तें कोणाकडूनही नष्ट होणें शक्य नाहीं ही पूर्वीप्रमाणें आतां पण धारणा राहिलीच; पण आतां आध्यात्मिक व नैतिक मूल्यावर जास्त भर देण्यांत येऊन त्याद्वारां सर्वंकष जागृति होणार आहे असें सूचित करण्यांत आलें. उच्च ध्येयास अनुसरून मार्ग पण उच्चच असले पाहिजेत यावर भर देण्यांत येऊं लागला. अमुक प्रकारची शासनपद्धति असावी कीं नसावी अशा तात्पुरत्या मुद्द्यावर जोर देण्यांत येत नसून राष्ट्राची भरीव उन्नति कशी होईल इकडे लक्ष द्यावें हें ध्येय म्हणून जाहीर करण्यांत आलें. राजकारण हा या सर्वंकष उन्नतीचा केवळ एक भाग आहे हें पण स्पष्ट करण्यांत आलें. १९०९-१० सालीं या पत्रांतून प्रसिद्ध झालेले कांहीं लेख खालीलप्रमाणें होते :—

" कर्मयोग्याचा आदर्श ", " कर्मयोग, " " कांहींही असो ( बारीक-सारीक जय किंवा अपजय ), " " भारताचा जागृत होणारा आत्मा, " " स्वार्थत्यागाचें तत्त्व, " " उत्क्रांतीची पद्धति, " " शांततेंतील सामर्थ्य * ( योगसामर्थ्य ), " " तीन पुरुष ( क्षर, अक्षर व पुरुषोत्तम ), " " अंतःशक्तीचें जोरदार कार्य, " " मानवी व्यक्तीचा मोठेपणा, " " विचारशक्तीचे नियम " वगैरे वगैरे.

यांपैकीं शेवटचे दोन लेख भगिनींच्या हातचे आहेत. लेखांचे नांवावरूनसुद्धां पत्राचे वरील धोरणाची कल्पना येते. तरीपण असलें शंभर

* "The immense and inscrutable processes of the world all perfect themselves within a deep and august silence, covered by a noisy and misleading surface of sound — the stir of innumerable waves above, the fathomless resistless mass of the ocean's waters below."

*Aurobindo Ghose.*

टक्के विधायक असें राष्ट्रकार्यसुद्धां गोऱ्या नोकरशाहीचे डोळ्यांत खुपूं लागलें व अरविंद घोष यांना लौकरच पकडण्यांत येणार आहे अशा बातम्या प्रसृत होऊं लागल्या.

व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो यांच्या पत्नी लेडी मिंटो यांनीं या सुमारास भगिनींचे घरास व शाळेस भेट दिली. शाळेचें निरीक्षण केल्यानंतर भगिनींनीं त्यांना दक्षिणेश्वर मंदिरास भेट देण्याची पण विनंति केली व त्याप्रमाणें त्यांनीं तिकडे पण जाऊन तेथील वातावरणाचें निरीक्षण केलें. लेडी मिंटो यांनीं स्वतः ही आठवण लिहून ठेवली आहे. "भगिनींना हिंदुधर्मांत अत्यंत अद्भुत अशा गोष्टी आढळून येतात पण त्यांचे म्हणण्याचें आकलन होणें कठीण आहे. हजारों वर्षांच्या काळापासून धार्मिक विचार जगांत कसकसे उन्नत होत गेले याचा त्यांनीं अभ्यास केला आहे आणि तत्त्वज्ञान व इतर सर्व प्रकारचें ज्ञान हें हिंदुस्थानांतच प्रथम निर्माण झालें असें त्या प्रतिपादन करतात" असा त्यांचा भगिनीं-बद्दल अभिप्राय आहे. असो.

अरविंद घोष यांना तुरुंगवासाची धास्ती होती असें नाहीं, पण त्यांचें लक्ष आतां एकांतिक योगसाधनेकडे जास्त जास्त ओढूं लागलें व कलकत्त्यांत राहिल्यास स्वतःस राजकारणांत पडावें लागेल तें त्यांना नको होतें. त्यामुळें त्यांनीं भगिनींना "कर्मयोगिन्" पत्र चालविण्यास सांगितलें व एक दिवस चंद्रनगरला निघून गेले. तेथून पुढें लौकरच त्यांनीं पॉंडिचरीचा रस्ता धरला व एकांतांत योगसाधना चालू ठेवली.

या घटनेमुळें भगिनींना राजकीय क्षेत्रांत कोणीच साथीदार राहिला नाहीं. त्यामुळें त्यांनीं पण हळूहळू राजकीय आंदोलनांतून आंग काढून घेतलें. आंदोलनाचे वेळीं प्रसंगास जागे राहून सर्व पक्षाचे सर्व पुढाऱ्यांनीं आपला वांटा उचलण्यास मागेंपुढें पाहिलें नव्हतें व त्यामुळें या काल-खंडांत इतिहासांत अपूर्व असें एक पान लिहिलें गेलें. त्यानंतर आतां कांहीं

काल शांततेचा जाणें अपरिहार्य होतें. भरतीच्या वेळीं सागरांतील लाटा प्रचंड आकांडतांडव मांडतात पण ओहोटीची वेळसुद्धां पाठोपाठ येणार असतेच. ज्या ईश्वरी शक्तीनें भरती आणली तीच शक्ति ओहोटीपण आणीत असते व त्यांतही कांहीं उद्देश व सूत्रबद्धता असते. मानवानें मात्र ओहोटीच्या वेळींसुद्धां शांततेच्या द्वारें का होईना पण नियुक्त कार्य करीत राहिलें पाहिजेच.

भगिनींच्या तर कार्याला अगणित पैलू होते हें वाचकांनीं पाहिलें आहेच. श्री जगदीशचंद्र बोस यांचें "वनस्पतींच्या संवेदना" हें पुस्तक आतां अखेरच्या अवस्थेंत लिहिलें जात होतें व या कार्यांत भगिनींनीं आपला जणूं प्राण ओतला. शिवाय त्यांचें स्वतःचें सुद्धां ग्रंथलेखन जोरांत सुरू झालें. मात्र या वेळीं भगिनींना आपलें आयुष्य संपुष्टांत येत चाललें आहे याची जाणीव होऊं लागली. इतकेंच नव्हे तर "माझें जीवित जेमतेम दोन वर्षेंच उरलें आहे असें त्यांनीं श्री. ओलबुल यांना लिहिलेल्या एका पत्रांत स्पष्ट केलें होतें. ही भविष्यवाणी खरीपण ठरणार होतीच.

१९१० च्या उन्हाळ्यांत भगिनी व बोस-दांपत्य यांनीं केदारनाथ व बद्रीनारायण या हिमालयांतील यात्रा केल्या. हीं मंदिरें सुमारें ११ ते १२ हजार फूट उंचीवर असून शेकडों मैल पायीं अगर घोड्यावर अगर दांडींतून प्रवास करावा लागत असे. गेल्या पन्नास वर्षांत या भागांत बऱ्याच सडका झाल्या असून मोटर-वाहतुकीनें बरेंच अंतर काटलें जातें त्यामुळें प्रवास बराच सोपा झाला आहे. पण १९१० सालीं हरिद्वारचे पलीकडे केवळ पायीं चालणारांनाच जातां येईल इतक्या रुंदीचा रस्ता होता. उतरण्याचे ठिकाणांची काय सोय आहे, किती मैल चालावें लागेल, किती दिवस लागतील व किती खर्च येईल याची प्रवाशांना साधारणतः कांहींच कल्पना नसे. सर्वसाधारण यात्रेकरू जवळ असलेले २००-४०० रुपये बरोबर घेऊन, परत येऊं किंवा कदाचित् तिकडेच खलास होऊं या तयारीनेंच यात्रा करीत असत. ज्यांनीं यात्रा केल्या आहेत ते तोंडीं कांहीं

तरी माहिती सांगत असत त्यावरून संकटें अतिशय आहेत एवढाच बोध नवीन यात्रेकरूंना होत असे. पुष्कळ वेळां पाण्याच्या कडेला एकादे दगडावर पीठ कालवून तेथेंच विस्तव करून त्यावर रोट्या भाजून खाणें व रस्ता आक्रमण करतां करतां मिळेल तशा जागेंत रात्र काढणें अशा जीवनाचा अवलंब त्यांना करावा लागत असे.

भ. निवेदिता, सर जगदीशचंद्र बोस व लेडी अबला बोस या सुसंस्कृत माणसांची ही सहल होती तरी पण ती चैनीची होती असें मुळींच नाहीं. " देहे दु:ख तें सुख मानीत जावें " या रामदासांचे उक्तीप्रमाणें ती त्यांना सुखाची मात्र होती. एकतर यावेळेस श्री. जगदीशचंद्र हे सरही नव्हते व सौ. बोस या लेडीपण नव्हत्या. श्री. जगदीशचंद्र बोस यांच्या संशोधनांबद्दल अनेक पाश्चात्य शास्त्रज्ञांना असूया उत्पन्न झाली होती. त्यांचें संशोधन तर त्यांच्यापैकीं एका अप्रामाणिक शास्त्रज्ञानें स्वत:चे नांवावर प्रसिद्ध करण्यापर्यंत मजल गेली होती. कसेंही करून हें संशोधन शास्त्रीय जगांत मान्य केलें जावें याबद्दल त्यांनीं अटोकाट प्रयत्न केले होते ; पण त्यांत त्यांना अजून यश आलें नव्हतें. शास्त्रीय क्षेत्रांतील हें बोस-युद्ध सुमारें १९१४ सालापर्यंत चालू होतें, व त्यामुळें या सफरीचे वेळीं त्यांचें मन व्यग्र होतें, यांत नवल नाहीं. थकलेल्या व हताश जीवास उत्तेजित करून पुन: कार्यमग्न करण्यासाठींच त्यांना ही सफर उपयोगी पडणार होती. भारताचा मानदंड जो हिमालय त्याचे मांडीवर लोळण्याचें सद्भाग्य त्यांना मिळणार होतें ही एकच बाब आनंदाची होती.

भगिनींना पण असाच आनंद मिळवून धन्य व्हावयाचें होतें, पण त्यांचे नियुक्त कार्याचा त्यांना क्षणभरही विसर पडला नाहीं. या दोन-अडीच महिन्यांच्या प्रवासांत, इकडील संस्कृति कोणकोणत्या काळीं कोणकोणत्या अवस्थेंतून गेली या विषयाचें संशोधन त्यांनीं केलें व यासाठीं उपलब्ध होणारी लहानसहान संधिसुद्धां त्यांनीं वायां जाऊं दिली नाहीं. वैयक्तिक बाबींना त्यांनीं इतकें गौण स्थान दिलें होतें कीं

त्यांचेबरोबर यात्रेकरू कोणकोण होते याचा देखील उल्लेख त्यांचे प्रवास-वर्णनांत कोठेंही आला नाहीं. भारताचे संस्कृतींत व आध्यात्मिकतेंत त्यांचें मन इतकें गर्क होऊन जात असे कीं हिमालयाच्या थंडगार व शांतशुद्ध हवेंत रात्रीच्या निवांत वेळीं वाऱ्यानें वृक्षांच्या पानांचा सळसळाट होत असे त्या तालबद्ध आवाजांतून त्यांना " परब्रह्मन्–परब्रह्मन् "* असा आवाज ऐकूं येत असे. जें मनांत ते जनांत. भागीरथी, अलकनंदा व मंदाकिनी या स्वर्गगांचें नर्तन पाहून व गायन ऐकून त्या स्वतःला विसरत असत व या नद्यांचे प्रपातांतून त्यांना " Hara, The Free, Hara The Free " असे आवाज ऐकूं येत असत. मधूनमधून इतकीं निबिड अरण्यें लागत असत कीं रस्त्याचे आजूबाजूस कितीही लांब-पर्यंत व कितीही उंचीपर्यंत नजर टाकली तरी दगडमाती बिलकूल न दिसतां हिरवीगार वृक्षसंपत्ति व त्यांतून झिरपणारे ओहोळ एवढेंच दृष्टोत्पत्तीस येत असे. अशा ठिकाणीं जेथें पाणी वरून खालीं पडतें असें ठिकाण पाहून त्यांना शंकराचे जटेंतून पडणाऱ्या गंगेची आठवण येत असे व सर्व वनश्रीबद्दल संपूर्ण पूज्यभाव वाटत असे. हिंदुलोक नद्यांची पूजा करतात यांत पाश्चात्यांना त्यांचा वेडगळपणा दिसत असे पण भगिनींनीं त्यांतून वेगळाच अर्थ काढला. पूज्य मानलेले वस्तूस आपण नुसतें गंधफूलच वाहात नाहीं तर अत्यंत स्वच्छ स्थितींत ठेवतों. गंगामातेस आपण पूज्य मानलें म्हणजे तिचें पाणी घाण करण्याचें आपण टाळतों व त्यामुळें पिण्यास शुद्ध पाणी मिळतें हा काय थोडा उपयोग झाला गंगापूजनाचा ?

---

* "At Chhantikhal we were for the first time amongst the pines. How wonderful it is to lie awake at night and listen, in darkness, to the sound in their branches, like the song of the sea 'Para-brahman', 'Para-brahman'."

*Sister Nivedita.*

मार्गदर्शनासाठीं त्यांनीं हरिद्वारपासूनच एका पंड्यास बरोबर घेतलें होतें. पायरस्त्यानें मार्ग काटीत असतांना जेथें जेथें सरकारी डाक बंगला उपलब्ध असेल तेथें तेथें ते बंगल्यांत मुक्काम करीत असत, पण इतर ठिकाणीं अन्य यात्रेकरूंच्यापेक्षां विशेष जास्त सोयीची अशी जागा मिळणें त्यांना शक्यही नव्हतें व जरूरही नव्हतें. कोठेंही आपण कोणी विशेष प्रकारचे यात्रेकरू आहों ही भावना त्यांना स्पर्श देखील करीत नव्हती.

हरिद्वार ते ऋषिकेश, देवप्रयाग,* रुद्रप्रयाग, गुप्तकाशी, गौरीकुंड ते केदारनाथ हा सुमारें १७५ मैलांचा प्रवास हा या यात्रेचा पहिला टप्पा. केदारनाथ मंदिर भव्य असून त्याचे पाठीमागें सुमारें २-२॥ मैलांवर बर्फमय डोंगराची भिंत उभी असलेली दिसते. महाभारतकाळीं याच ठिकाणीं पांडवांचें अवतारकार्य संपलें व ते महानिर्वाणास पोचले. या ठिकाणास महानिर्वाण असेंच आजही म्हणतात. केदारनाथमंदिरापासून बर्फमय डोंगराकडे जाणारा हा महानिर्वाणाचा रस्ता चाळून जाण्यास आपले यात्रेकरू चुकले नाहींत.

केदारनाथ मंदिरांत त्यांना एक विशेष घटना पाहावयास मिळाली. एक वृद्ध गृहस्थ आजारी असूनसुद्धां केदारनाथाचे दर्शनासाठीं आला होता. आपल्या वेगानें तो चालत चालत कसातरी ठिकाणावर पोंचला होता. विरक्तीमुळें त्याचे जगांतील सर्व वस्तूंबद्दलचें आकर्षण नष्ट होऊन गेलें होतें. केदार-दर्शन हें एकच ध्येय त्याचे नजरेपुढें होतें व

---

* देवप्रयागबद्दल भगिनी म्हणतात :—

"The waters roar and a perpetual tempest wails and rages. And as long as a thing is too much for one's mind to grasp, does it matter whether it is once or fifty times too much Infinite is the terror of the waters of Deoprayag. Victory to the Infinite. Glory to the Terrible."!

या दर्शनाशिवाय जगांत कोणत्याही गोष्टींत त्याला राम वाटेनासा झाला होता. शेवटीं केदारनाथानें त्याचा हेतु जाणला व त्याला तेथपर्यंत कसें तरी येऊन दर्शन घेऊं दिलें. पोंचल्याबरोबर हर्षभरानें मृत्युंजय शंकरास साष्टांग प्रणिपात घालून तो धन्य झाला व पुन: उठलाच नाहीं. तो शिवस्वरूप झाला व त्याचा मृत देह बाहेर काढावा लागला. देहत्याग करतांना केवळ ईश्वरीभाव मनांत राहणें हें परमपुण्याचें लक्षण असून हें क्वचितच एकाद्या साधकाला साध्य होतें. हें दृश्य केवळ पाहून सुद्धां आपल्या यात्रेकरूंना धन्यता वाटली.

“ यं यं वापि स्मरन् भावं त्यजत्यंते कलेवरम्।
तं तमेवेति कौंतेय सदा तद्भावभावित: ।”

यानंतरचा यात्रेचा दुसरा टप्पा म्हणजे केदारनाथ ते बदरीनारायण हा सुमारें १३० मैलांचा. हा रस्ता उखीमठ, पिपलकोटी, जोशीमठ व विष्णुप्रयाग या ठिकाणांवरून जातो. बदरीनाथ येथील मंदिरांचे आवारा-भोंवतीं उंच अशा भिंती असून त्यायोगानें तें वस्तीपासून अलग करण्यांत आलें आहे व त्यामुळें पूजा-प्रार्थनेस योग्य असें वातावरण उत्पन्न होण्यास मदत झाली आहे. पण वेळोवेळीं ज्या दुरुस्त्या करण्यांत आल्या व पुरवण्या जोडण्यांत आल्या त्या मूळचे शिल्पकामांस अगदीं विसंगत असल्यानें भगिनींच्या कलात्मक दृष्टीस डोकेंदुखीस कारण झाल्या. प्रवेश-द्वाराच्या भिंती व कमानी या तर मोगल शिल्पकलेच्या धाटणीच्या असल्यानें अशा पुरातन मंदिरास धेडगुजरी स्वरूप प्राप्त झालें आहे असें त्यांना दिसून आलें. दुरुस्तीच्या नांवावर प्राचीन शिल्पवस्तूवर झालेलें हें आधुनिक शिल्पाचें आक्रमण गैर आहे व त्यामुळें पवित्र स्थानाबद्दलच्या सांस्कृतिक भावनांना धक्का बसतो असा अनुभव त्यांना आला. असो. बदरीनारायणाहून परत येतांना कमीत कमी चाल पडावी या हेतूनें त्यांनीं कर्णप्रयाग, श्रीनगर, पौडी ते कोटद्वारा स्टेशन हा सुमारें १६० मैलांचा रस्ता पसंत केला. या संपूर्ण यात्रेमध्यें भगिनींना ज्या शिल्पवस्तु व ज्या देवदेवतांच्या

मूर्ति दिसून आल्या, त्या लहान असोत कीं मोठ्या असोत, त्यांचेकडे त्यांनीं ऐतिहासिक दृष्टीनें सुद्धां पाहिलें व सखोल निरीक्षण केलें. त्याचा नमुना असा :–

"इसवीसनापूर्वी सुमारें २०० वर्षें हा काल म्हणजे बुद्धधर्मीय संस्कृतीचा अत्यंत भरभराटीचा काळ. या संस्कृतीचा हात या प्रदेशावर त्यावेळींच पसरला होता. तरीपण हिमालयांतील हीं प्राचीन क्षेत्रें त्यापूर्वी पण अस्तित्वांत होतीं व त्यांतून बहुश: शैवपंथाचें वर्चस्व असावें. कारण तत्कालीन शिवपिंडी कांहीं कांहीं ठिकाणीं आढळून येतात. नंतरच्य बुद्धसंस्कृतीच्या भरभराटीच्या काळीं जें बुद्धधर्मीय पुरातन वाङ्मय भूर्जवृक्षाचे सालीवर लिहिलें गेलें त्यांपैकीं बरेच आजचे म्युझियममधून आढळून येतें व तें या हिमाचल प्रदेशांतून गोळा करण्यांत आलें असा तेथें उल्लेख केलेला आढळतो. शिवाय तिबेट हा बुद्धधर्मीयांचा प्रदेश असून त्याचे रस्त्यावर हीं जीं ठिकाणें आहेत तेथें बुद्धधर्मीयांचा हात फिरला जाणें अगदी संभवनीय होतें. यामुळें या भागांतील शिल्पस्थानांवर व देवदेवतांवर या संस्कृतीची छाप बरीच वर्षें पडली होती. आज जीं मंदिरें आहेत त्यांपैकीं कांहींचा त्यावेळीं मठासारखा उपयोग होत असावा, कारण बुद्धधर्मीयांना मूर्तिपूजा तितकीशी मान्य नव्हती. नंतर जसजसा वैदिक संस्कृतीच्या छत्राखालीं हा प्रदेश पुन: येत गेला, तसतशा या ठिकाणींच हळूहळू मूर्तिस्थापना होत गेल्या असाव्या. हा काल म्हणजे इ. सन ७०० चे सुमाराचा आद्यशंकराचार्यांचा काळ. या काळीं शैव पंथाचा पुरस्कार बराच जोरांत इकडे झाला. पण या काळांत स्थापन झालेल्या शिवपिंडी अगदींच वेगळ्या आकाराच्या व बसक्या अशा होत्या व कांहीं कांहीं ठिकाणीं तर ओबडधोबड अशा शिलाखंडांचीच स्थापना करण्यांत आली होती. (उदाहरणार्थ, केदारनाथ व बिल्वकेदार येथील शिव) आजचें बदरीनारायण-मंदिर हें सुद्धां त्यावेळीं शैवपंथाचें पूजास्थान असावें. कारण याचा रक्षणकर्ता म्हणून घंटाकर्णाची मूर्ति

आजसुद्धां येथील आवारांत आहे. घंटाकर्ण हा इतका अनन्य शिवभक्त होता कीं विष्णूचें नांवसुद्धां कानांवर पडूं देण्यास तो तयार नसे. त्यानें दोन्ही कानांना घुंगरें बांधलीं होतीं. विष्णूचें नांव कोणी उच्चारूं लागल्यास मान हालवून तीं तो वाजवीत राही व स्वतःचें त्या नांवापासून रक्षण करीत राही. या मंदिरांत त्याचेशिवाय विष्णुभक्त गरुड याची पण मूर्ति आहे पण ती अगदीं नंतर स्थापलेली आहे हें स्पष्ट दिसून येतें. त्यामुळें हें मंदिर एके काळीं शिवस्थानच असावें असें दिसतें. यानंतर ३००-४०० वर्षांनीं या भागांत वैष्णव सांप्रदायाचा बराच प्रसार झाला त्यामुळें सत्यनारायण, त्रिजुगीनारायण, विष्णुप्रयाग अशीं वैष्णवकेंद्रें स्थापन झालीं व बहुधा याच तडाख्यांत बदरीनारायण हेंसुद्धां वैष्णवकेंद्र बनलें असावें व विष्णुलक्ष्मी यांच्या मूर्ति स्थापन झाल्या असाव्या. ''

असे किती तरी संशोधनाचे धागे भगिनींनीं त्याकाळीं दाखवून दिले आहेत. ऐतिहासिक संशोधनासाठीं वेळोंवेळीं नवेनवे पुरावे उपलब्ध होत असतात व त्यावरून पूर्वी झालेले संशोधनाचे निर्णय अनेक वेळां बदलावे लागतात. त्यामुळें आजतागायत झालेलें संशोधन वरच्याप्रमाणेंच असेल असें म्हणवत नाहीं. पण पन्नास वर्षांपूर्वी एका आंग्ल विदुषीनें भारताविषयीं स्वाभिमान वाटून केलेलें हें अभ्यासपूर्ण संशोधन आहे व या दृष्टीनें त्याला चिरंतन महत्त्व आहे. हजारों वर्षांच्या काळांपासून धार्मिक विचार व संस्कृति जगांत कसकशा वृद्धिंगत होत गेल्या याचा त्यांनीं कसून अभ्यास केला होता त्याचाच एक लहानसा भाग म्हणून वरील संशोधनाचा उल्लेख करण्यांत येत आहे.

भारताच्या इतिहाससंशोधन कार्यांत भगिनींना इतकें लक्ष घालावेसें वाटलें याचें आणखी एक कारण म्हणजे त्यांना स्वतः शिकवतांना तशा अडचणी आल्या होत्या. त्यांच्या शाळेंत त्या मुख्यतः इतिहास, अंकगणित व चित्रकला हे विषय शिकवीत असत. त्यांपैकीं इतिहासाचीं त्यावेळीं उपलब्ध असलेलीं पुस्तकें राष्ट्रीय शिक्षणाचे दृष्टीनें कुचकामी आहेत असें

त्यांना दिसून आलें व त्यामुळें त्यांना हा विषय पुस्तकाशिवायच शिकवावा लागत असे. या बाबतींत त्या म्हणतात ( अनुवाद – साने गुरुजी ) :—

" **इतिहास :**— भारताचा इतिहास ! कोणी लिहिला आहे भारताचा इतिहास ? भारताचा इतिहास अजून लिहिला गेला नाहीं, तो लिहिला गेला पाहिजे. हल्लीं विशेषतः इंग्रजींत हिंदुस्थानचे म्हणून जे इतिहास लिहिले जातात त्या इतिहासांना प्लासीची लढाई व वॉरन हेस्टिंग्ज यांच्यापासून सुरुवात केलेली असते. त्यापूर्वींचा दोनचार हजार वर्षांचा इतिहास दहावीस पानांत देऊन हे पठ्ठे मोकळे होतात. त्यांना हा इतिहास म्हणजे अडगळच जणूं वाटते, सारा केरकचरा वाटतो. अगदींच सोडतां येत नाहीं म्हणून आरंभीं देतात थोडी हकीकत. या विशाल राष्ट्राचा असा इतिहास लिहिणें म्हणजे निवळ थट्टा आहे. हे सारे इतिहास गचाळ व रद्दी समजून फाडून, तोडून, फेकून दिले पाहिजेत, जाळून धुळींत मिळवले पाहिजेत. असले इतिहास भारतीय मुलांच्या हातांत पडणें म्हणजे महापाप आहे. भारताच्या इतिहासांत भावना ओताव्या लागतील, मानवजातीचें हृदय शोधावें लागेल. आजच्या भारतीय संतानांना तो इतिहास स्फूर्तिप्रद, पेटवणारा व चेतवणारा, नवमहाकाव्यास उठविणारा असा वाटला पाहिजे. भारताचा इतिहास म्हणजे फुंकलेलें रणशिंग असा वाटला पाहिजे, असा वठला पाहिजे .... कलकत्ता, मुंबई, मद्रास हीं हिंदुस्थानच्या इतिहासांतील मुख्य केंद्रें म्हणून आज मुलांना दाखविण्यांत येतात. आपले ते थोर पूर्वज हें दृश्य पाहून वरतीं रडत नसतील तर निदान हसत तरी असतील. ' असें कसें हें आपलें पोर नादान, शेळपट व नेभळट ? ' असें त्यांना वाटत असेल. भरताचा इतिहास म्हणजे काय या मासेमाऱ्या बकाली शहरांचा इतिहास ? ठाणेश्वर व कुंभेरी, हळदीघाट व पानिपत, सिंहगड व पावनखिंड - कोठें गेलीं ? .... अयोध्या आणि हस्तिनापूर, द्वारका आणि मथुरा, गया आणि काशी, इंद्रप्रस्थ आणि पाटलिपुत्र, उज्जयिनी आणि दिल्ली, कांजीवरम् आणि अमरावती, भागानगर

आणि प्रतिष्ठान – त्या काळांत तीं तीं पुरें चमकलीं, शोभलीं, तो काळ, ती सृष्टि कोठें आहे ? तीं अदृश्य जगें कोण शोधणार ? कोण उकरणार, कालोदरांतून कोण वर काढणार ? ”

“ भारतमातेच्या पुत्रांनो, आपल्या उज्ज्वल व दिव्य भूतकाळाची पूजा करावयास चला. अयोध्या व मथुरा, नालंदा व तक्षशिला, अजिंठा व वेरूळ पूजावयास चला. पेटलेल्या व भावनोत्कट मनानें उठा. भूतकाळाचें संपूर्ण सांगोपांग व सविस्तर ज्ञान मिळविण्यासाठीं वेडे व्हा. ज्ञानासाठीं बाळ नचिकेता मृत्युदेवाजवळ गेला, सत्यासाठीं सावित्री यमापाठोपाठ गेली. ज्ञानासाठीं अविरत श्रम करावयास आनंदानें उठा, ज्ञानासाठीं जीवनें द्या. हा जुना इतिहास तुमचा तुम्हींच संशोधला पाहिजे. ‘ हे बुद्धि व हृदय यांचें पोषण करणाऱ्या देवा, सत्यावरचें आवरण काढून आम्हांला सत्य काय तें दाखवा ’ अशीं त्या थोर ऋषींची थोर प्रार्थना होती. त्यांचेच वंशज तुम्ही असाल तर स्वतःच्या इतिहासांतील सत्य शोधून काढावयास पोटतिडिकेनें व उत्कटतेनें तुम्ही उठाल. ”

या ज्वलंत लिखाणानंतरच्या पन्नास वर्षांत भगिनींच्या या बाबतींतील सर्व आकांक्षा पुऱ्या झाल्या आहेत हें आजचीं इतिहासाचीं पुस्तकें पाहून वाचकांच्या लक्षांत येईलच. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळांत या बाबतींत एकदम जास्त उचल मिळाली आहे. असो.

हिमालयांतील तीर्थयात्रांहून परत आल्यानंतर थोड्याच महिन्यांनीं भगिनी पुनः इंग्लंड-अमेरिकेस गेल्या. तिकडे असतांना श्री. जगदीशचंद्र बोस यांचे त्रेपन्नावे वाढदिवसानिमित्त त्यांनीं त्यांना अभिनंदनपर संदेश पाठविला. इंग्लंडमध्यें मागचे वर्षी त्यांच्या मातेचें निधन झाल्याचा पूर्वी उल्लेख आला आहेच. या खेपेस त्या तेथें गेल्या तेव्हां त्यांच्या अस्थि संस्थापित करण्याचा कार्यक्रम करण्यांत आला. मातेचे जीवात्म्यास शांतता मिळावी म्हणून केंब्रिज येथील प्रार्थनालयांत सगेसोयरे व इष्टमित्र जमले असतां प्रार्थना करतांना येशूमाता मेरी या सर्वांचे नजरेपुढें होत्या.

# A LETTER FROM SISTER NIVEDITA TO THE HOLY MOTHER

Sunday Dec. 11. 1910. Cambridge. Mass.

Beloved Mother — this morning, early, I went to church — to pray for Sara. All the people there were thinking of Mary, the Mother of Jesus — and suddenly I thought of you. Your dear face, and your loving look, and your white Sari, and your bracelets. It was all there. And it seemed to me that yours was the Presence that was to soothe and bless poor S. Sara's sickroom. And — do you know? — I thought I had been very foolish to sit in your room at the evening service to Sri Ramakrishna, trying to meditate. Why did I not understand that it was quite enough to be a little child at your dear feet? Dear Mother! You are full of love! And it is not a flushed and violent love, like ours, and like the world's — but a gentle peace, that brings good to everyone and wishes ill to none. It is a golden radiance — full of play. What a blessed Sunday that was, a few months ago, when I ran in to you, the last thing before I went on the Ganges, and came back to you for a moment, as soon as I came back! I felt such a wonderful freedom, in the blessing you gave me. And you welcome me!

Dearest Mother — I wish we could send you a wonderful hymn, or a prayer. But somehow even that would seem too loud, too full of noise! Surely you are the most wonderful thing of God — Sri Ramakrishna's own Chalice of His Love for the world — a token left with His children, in these lonely days, and we should be very still and quiet before you — except indeed for a little fun! Surely the 'wonderful things of God' are all quiet — stealing unnoticed into our lives. The air and the sunlight and the sweetness of gardens and of the Ganges — These are the silent things, that are like you!

Do send to poor S. Sara the mantle of your peace. Isn't your thought, now and then, of the high ~~peace~~ and calm that neither loves nor hates — Isn't that sweet benediction that trembles in God, like the dewdrop on the lotus-leaf, and touches not the world. Ever, my darling Mother,

Your foolish Khooki.

Nivedita.

Courtesey : 'Prabuddha Bharat', Calcutta

पण भगिनींना मात्र यावेळीं शारदामातेची आठवण झाली. त्यांचेकडूनही आईचे जीवात्म्यास शांतीचा अंत:संदेश मिळावा म्हणून त्यांनीं मुद्दाम त्यांना हिंदुस्थानांत पत्र पाठवून विनंति केली. या पत्रांत त्यांच्या बालकोमल भावना व अपूर्व भक्तिभाव यांचा मनोहर संगम झाला असून त्यांचे हस्ताक्षरांतील पत्र, जसेंच्या तसें, या पुस्तकांत देण्यांत येत आहे.

तिकडे अमेरिकेंत श्री. ओलबुल ( धीरामाता ) यांना भगिनी निवेदिता व श्री. जगदीशचंद्र यांचे कार्याबद्दल जास्त जास्त आस्था वाटूं लागली. त्यांच्या प्रेमळ व उदार स्वभावामुळें त्यांना " धीरामाता " हें टोपण नांव देण्यांत आलें होतें व त्यांनीं या दोघांही कार्यकर्त्यांना मातेप्रमाणें आधार दिला होता. त्यांची प्रकृति आतां ठीक नसल्यामुळें भगिनी त्यांना भेटण्यास गेल्या व त्यांचा देहत्याग होतांनासुद्धां त्या तेथेंच असल्यानें परस्परांना हायसें वाटलें. धीरामातांनीं जगाचा निरोप घेण्यापूर्वीं भगिनींच्या राष्ट्रीय शाळेस मदत म्हणून २००० पौंड दिले व बोस-संशोधन कार्यासाठीं मदत म्हणून ३००० पौंड दिले. एवढे पैसे सत्कारणीं लागल्यामुळें त्यांना अत्यंत समाधान वाटलें.

स्वामी विवेकानंद यांचें जीवनचरित्र लिहिण्याचें भगिनींच्या मनांत बरेच दिवसापासून होतें व त्यांसाठीं त्यांनीं बरीच माहिती गोळा केली होती. यापूर्वीं स्वामीजींचे समग्रग्रंथ इंग्लिशमधून प्रसिद्ध झाले होते व त्यास भगिनींनीं प्रस्तावना लिहून दिली होती. समग्र ग्रंथांचें मराठी भाषांतर कर्नाटक पब्लिशिंग हाउसकडून १९१२ सालापासून ग्रंथवार प्रसिद्ध व्हावयास लागलें. पहिल्या भागांतच स्वामीजींचें थोडक्यांत जीवनचरित्र सादर करण्याचा प्रकाशकांचा विचार होता, पण तोंपर्यंत अधिकृत असा चरित्रग्रंथच अस्तित्वांत नव्हता त्यामुळें त्यांना ती कल्पना सोडून द्यावी लागली. भगिनींनीं लिहून ठेवलेली चरित्रग्रंथाची सामुग्री त्यांचे हयातीनंतरच उपयोगांत आणावी लागली, कारण सामुग्री गोळा झाल्यानंतर त्यांचा देह फार दिवस टिकलाच नाहीं.

स्वामीजींच्या ग्रंथांचें चिरकालीन महत्त्व जाणून त्यांनीं समग्र ग्रंथांच्या प्रस्तावनेंत भविष्य केलें होतें कीं "इंग्रजी भाषा हिंदुस्थानांतून समूळ नष्ट होण्याची वेळ कधींकाळीं आलीच तर त्या वेळींही त्या भाषेंतून स्वामीजींनीं केलेलें ज्ञानदान शिल्लक राहून साऱ्या जगास फलद्रूप होईल." इंग्रजी भाषेचें हिंदुस्थानांतील स्थान अस्थिर आहे हें त्यांच्या नजरेस आलें होतें व आजही पन्नास वर्षांनंतर अशी प्रचीति येत आहे.

असो. भगिनी या खेपेस हिंदुस्थानांत परत आल्यानंतर अवघ्या चारच महिन्यांनीं त्यांचें अवतारकार्य संपणार होतें. तेवढ्यांतच स्वामी विवेकानंद यांच्या माताजी भुवनेश्वरी देवी यांची अखेरची सेवा करण्याची संधि त्यांना मिळाली व भुवनेश्वरी देवींचा थोड्याच दिवसांनीं अंत झाला. भगिनींच्या उत्तरायुष्यांत किती तरी महान् जीवांचें ऐहिक जीवन संपलें होतें व अनेकांचे देह कामीं आल्याचें त्यांनीं पाहिलें. आपलेंही नियोजित कार्य आतां संपलें आहे अशी त्यांना तीव्र जाणीव होऊं लागली "आपला संदेश सांगून झाला, मंत्र सांगून झाला कीं महात्म्यांनीं महायात्रेस निघून जाण्याची काळजी घ्यावी" हे त्यांचेच शब्द त्यांना आतां आठवले असले पाहिजेत. त्यांचें बारा वर्षांचें उत्तरजीवन त्यांचे नजरेखालून जाऊं लागलें तसतसें त्यांना धन्यता वाटूं लागली. स्वामीजींनीं घडवून आपणाला या पात्रतेस आणलें असें त्यांना वाटत होतें तर स्वामीजींना वाटत असें कीं कालीमातेनेंच त्यांना घडविलें होतें. कालीमातेची शक्ति व स्वामीजींचें सामर्थ्य एकरूपच आहेत हाच कां याचा अर्थ?

"तुमची प्रकृति क्षीण झाली आहे तर विसावा घेण्यासाठीं तुम्ही दार्जिलिंगला चला" असें बोस दांपत्यानें त्यांना सुचविलें. पण आगामी मृत्यूची चाहूल त्यांना लागली होती व आतां त्यांना विसाव्याचीही जरूरी नव्हती. म्हणून त्यांनीं मृत्युपत्रसुद्धां करून टाकलें व त्याअन्वयें सर्व रोकड व पुस्तकप्रकाशनापासून होणारें सर्व उत्पन्न यांचा विनियोग भारतीय स्त्रियांच्या शिक्षणाप्रीत्यर्थ व्हावा अशी तरतूद केली. अंतकालीचें

वातावरण केवळ प्रार्थनामय असावें म्हणून "असतो मा सद्गमय। तमसो मा ज्योतिर्गमय...." ही रुद्रप्रार्थना प्रसृत करण्यासाठीं त्याच्या कांहीं प्रती त्यांनीं छापवून घेतल्या (हेंच त्यांचें मुख्य मृत्युपत्र) व शेवटीं सर्वांचे आग्रहाखातर त्या दार्जिलिंगला रवाना झाल्या. तेथें आजारी-पणांत त्या सर्वस्वी बोसदांपत्यावर अवलंबून होत्या. लंडन येथें त्यांनीं बोसदांपत्याची आजारीपणांत सेवाशुश्रूषा केली होती व आतां त्यांचेकडून स्वत:ची सेवाशुश्रूषा करून घेण्याची त्यांना वेळ आली.

त्यांचें दुखणें अतिसाराचें होतें तें जास्त जास्त विकोपाला जाऊं लागलें व नंतर नंतर डॉक्टरलोकही फारशी आशा दाखवीनासे झाले. आसपासचे वातावरणांत साहजिकच खिन्नतेची दाट छाया पसरली; मात्र भगिनींचे अंत:करणांत खिन्नतेचा मागमूसही नव्हता. नितांत शांतता व प्रसन्नता त्यांचे मुखावर खेळत होती व शेवटीं शेवटीं जपमाळेवरील हाताचे हालचालीशिवाय इतर सर्व शारीरिक हालचाली बंद झाल्या.

"यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरम्।
तं तमेवैति कौंतेय सदा सद्भावमाश्रितः॥"

तसेंच

"वासांसि जीर्णानि यथा विहाय—
—नवानि गृह्णाति नरोऽपराणि।
तथा शरीराणि विहाय जीर्णा—
—न्यन्यानि संयाति नवानि देही॥"

या भगवंताचे वचनांवर त्यांची नितांतश्रद्धा होती. देहाचें मरण याचा अर्थ आत्म्याचें या खोलींतून निघून दुसऱ्या खोलींत जाणें इतकाच त्या घेत असत; त्यामुळें अंतकाळीं शांत राहून सच्चिदानंद स्वरूपांत लीन व्हावें एवढीच त्यांची इच्छा होती.

" दिसों लागे मृत्यू, परि न भिववूं तो मज शके ।
तयाच्या भेटीचें, असत मजला ज्ञानचि निकें ॥"

या अवस्थेंत त्या असतांना त्यांची शेवटची रात्र आली. " नौका खचत चालली आहे, पण सूर्यप्रकाश दिसेलच " असें त्यांनीं बोलून दाखविलें. " तमसो मा ज्योतिर्गमय .... " अशी प्रार्थना मनोमय चालू असतांच ता. १३–१०–१९११ रोजीं सूर्योदयप्रकाश त्यांनीं पाहिला व त्यांचें ऐहिक जीवन खलास झालें.

ॐ शांतिः शांतिः शांतिः *

× × ×

" नौका खचत चालली आहे पण सूर्यप्रकाश दिसेलच " हा त्यांचा आशावाद केवळ त्यांचे पार्थिव शरीरापुरता नव्हता. हिंदमातेबद्दलसुद्धां हीच त्यांची दुर्दम्य आशा होती, कारण त्या हिंदमातेशीं एकरूप झाल्या होत्या.

त्यांचेबरोबर ज्यांनीं नियुक्त कार्याची धुरा वाहिली असे अनेक महात्मे पाठीमागें राहिले. तसेंच ज्यांनीं त्यांना तनमनधनानें साह्य केलें, ज्यांनीं त्यांचीं भाषणें ऐकलीं, ज्यांनीं त्यांचें लिखाण वाचलें, ज्यांनीं त्यांना डोळ्यांनीं पाहिलें व ज्यांनीं त्यांची केवळ कीर्ति ऐकली असे अनेक जीवात्मे पृथ्वीवर वावरत होते. " अखिल जगांतील मानवी जीवांमध्यें एकत्व (अविभक्तपणाआहे " याचा प्रत्येकाला थोडाफार अनुभव आला होता.

---

* भगिनींच्या मृतदेहाला वैदिक पद्धतीनें मंत्राग्नि देण्यांत आला व दार्जिलिंग येथें हिमाचलाच्या पोटांत त्यांच्या अस्थीवर स्मारक बांधण्यांत आलें. त्यांच्या प्रथम वार्षिक श्राद्धदिनीं अस्थींचा शेषभाग इंग्लंडमध्यें उत्तर-डेवन् स्मशानवाटिकेंत संस्थापित करण्यांत आला व अशा रीतीनें पूर्वपश्चिमेची देवाणघेवाण पुरी झाली.

भगिनींचा देह पंचत्वाप्रत गेला तरी या सर्वांच्यामुळें त्यांच्या कार्याची ज्योत तेवत राहिली व तिला सत्याचा आधार असल्यामुळें ती फोफावत चालली हें वाचक जाणतातच.

भगिनींच्या जीवनाबद्दल अनेकजणांना कृतज्ञता वाटत होती. त्यांपैकीं कांहींजणांचे अभिप्राय पुढचे भागांत दिले आहेत.

—×—×—

## ८ : कृतज्ञता

" माझ्या इंग्लंडमधील कार्याचे रोपास जीं फुलें आलीं त्यांतील सर्वोत्कृष्ट फूल म्हणजे भ. निवेदिता."

—*स्वा. विवेकानंद*

* * *

" जनसेवेसाठीं आपण आपला वेळ देतों, द्रव्य देतों व फार तर प्राण देतों. पण आपण आपलें सर्वस्व म्हणजे आपलें अंतःकरण मात्र अर्पण करीत नाहीं. आपल्यामध्यें व भ. निवेदिता यांच्यामध्यें फरक आहे तो हाच. कोणीही हिंदबांधव, मग तो कोणत्याही जातीचा असो, कोणत्याही मतप्रणालीचा असो व कोणत्याही धर्माचा असो त्याला भ. निवेदिता प्रिय वाटत असत. कारण प्रत्येकांशीं त्या आपुलकीनें व मोकळेपणानें मिसळत असत व आपण कोणावर दया करतों अशा दृष्टीनें न पाहतां प्रत्येकाकडे आदरभावानें पाहात असत."

—*रवींद्रनाथ टागोर*

* * *

" दुर्मिळ व प्रसादतुल्य असे अनेक गुण भगिनींना जन्मतःच प्राप्त झाले होते व त्यामुळें पाश्चात्य देशांतसुद्धां उज्वल असा भविष्यकाळ त्यांचेसमोर होता. पण सद्गुणांचा हा सर्व ठेवा त्यांनीं

आमचे मातृभूमीसाठीं उपयोगांत आणला. इंग्लंडबद्दल त्यांना कमी भक्ति वाटत होती असें नाहीं पण त्यानें न्यायनीतीची चाड बाळगली तरच तें मोठें राहील अशी त्यांची श्रद्धा होती. त्या आपल्या समाजाशीं इतक्या एकरूप झाल्या होत्या कीं ' हिंदुस्थानची गरज ' ' हिंदुस्थानच्या स्त्रिया ' असा शब्द त्यांचे तोंडून मी कधींही ऐकला नाहीं. ' आपली गरज ', ' आपल्या महिला ' अशीच भाषा त्या बोलत असत. "

—*लेडी अबला बोस*

* * *

" भारतीय प्रश्नावर विचारपूर्वक ध्यान सतत करीत राहाणें हेंच त्यांच्या जीवनाचें स्वरूप असे. जेव्हां वेळेची मर्यादा पडत असे किंवा मानवी विचारशक्ति व मानवी ताकदच कमी पडत असे तेव्हांच या ध्यानांत खंड पडत असे."

—*जे. एफ्. अलेक्झांडर*

* * *

" भ. निवेदिता यांच्या ग्रंथावरून त्यांचा वाङ्मयीन प्रसादगुण दिसून येतो हें खरें. पण त्यांच्या उत्तमोत्तम ग्रंथावरूनसुद्धां त्यांच्या बुद्धिमत्तेची कुवत व पल्लेदारपणा यांचें निदर्शन होतेसें मला वाटत नाहीं. "

—*एस्. के. रॅटक्लिफ*

* * *

" पुस्तकी पांडित्य म्हणजे ज्ञान नव्हे तर अंतरंगांत उतरलेलें ज्ञान तेंच खरें ज्ञान. भ. निवेदितांनीं भारतीय संस्कृतीचें व विचार-परंपरेचें जवळ जवळ परिपूर्ण असें ज्ञान प्राप्त करून घेतलें होतें.

या बाबतींत त्यांची बरोबरी कोणीही केली नाहीं व जास्त मजल तर कोणी मारली नाहींच. भारतीय जीवन तसेंच भारतीयांची कुटुंबसंस्था व इतर संस्था यांत जें उदात्त तत्त्व अंतर्भूत झालें आहे तें त्यांनीं आपल्या अंतर्दृष्टीनें व जोरदार लेखणीनें लिहून ठेवलें आहे व याद्वारें त्यांनीं अखिल जगाची तशीच भारताची उत्कृष्ट सेवा केली आहे. ”

—*रामानंद चतर्जी*

* * *

“ भारताविषयींच्या सर्वकष प्रेमानें या आंग्ल महिलेचें पूर्णपणें परिवर्तन झालें होतें. आधुनिक भारतीय सुशिक्षित समाजापैकीं-सुद्धां फारच थोड्यांना मातृभूमीच्या प्रेमामुळें इतकी प्रेरणा मिळाली आहे. ”

—*बिपिनचंद्र पाल*

* * *

“ ज्या मातृभूमीनें भगिनींना दत्तक घेतलें होतें तिच्यावर त्यांचें नितांत प्रेम होतें व तिच्या मोठेपणाचें व भलेपणाचें त्यांना कौतुक वाटत असे. भारतमातेबद्दल कोणी वाईट शब्द वापरले तर त्या त्यांची हजेरी घेतल्याशिवाय राहात नसत. ”

—*सर जदुनाथ सरकार*

* * *

“ भ. निवेदिता म्हणजे स्वार्थत्यागाचा केवळ अवतारच. युरोपांतील स्त्रीपुरुषसमाजापैकीं कोणी एकानेंसुद्धां इतक्या उत्कट-पणानें भारतावर प्रेम केलें नाहीं. ”

—*मोतीलाल घोष*

* * *

" कु० नोबल यांनीं हिंदी स्त्रीसमाजाचें जें निरीक्षण केलें आहे त्याला विशेष महत्त्व आहे. कारण भारतीय जीवनाचें हें एक ऐश्वर्ययुक्त व महत्त्वपूर्ण अंग आहे व याबद्दल आपण ( इंग्लिश लोक ) पूर्णपणें अज्ञानांत आहों. "

—*टाइम्स–लंडन*

* * *

" कु० नोबल्चें हें पुस्तक म्हणजे इंग्लंड व हिंदुस्थान यांना जोडणारी सांखळी आहे. आमची ( ब्रिटिश सरकारची ) मुलकी यंत्रणा परिपूर्ण आहे असा आम्हांस अभिमान वाटतो तरीपण तिच्याकडूनसुद्धां असें कार्य होणें कधींच शक्य नाहीं. "

—*पॅाल मॅाल गॅझेट*

× × ×

" कालीमातेनें भ. निवेदितामार्फत मला अज्ञात स्थळीं ( चंद्रनगर ) जाण्याचा आदेश दिला. "

—*योगी अरविंद घोष*

* * *

" निवेदितादेवींची तेजस्वी व अधिकारयुक्त अशी वाणी व लेखणी होती. त्यांच्या लेखांत एक प्रकारची प्रतिभा व खोल दृष्टि आहे. भारतीय संस्कृति व ध्येयें यांचा त्यांना अपरंपार अभिमान आहे. "

—*साने गुरुजी*

* * *

आपलें ध्येय हस्तगत होण्यापूर्वींच भगिनींच्या देहाला मृत्यूनें ग्रासलें. सत्कार्य करणाऱ्या महात्म्याची अशी स्थिति होतेच हें आपणास माहीत आहे. हूकर यानें असें म्हणलें आहे कीं हे महात्मे मशालीप्रमाणें इतरांना मार्गदर्शन करतात व स्वतः मात्र

अग्निदिव्यांतून जाऊन नष्ट होतात. पण हें मात्र ध्यानांत ठेवा कीं त्यांचे मृत्यूमुळें त्यांचे कार्य व ध्येयवाद नष्ट होणार नाहींत. ”

—*रासबिहारी घोष*

* * *

“ भ० निवेदिता या आंतून बाहेरून पूर्णपणें भारतीय होत्या. त्यांचें नागरिकत्व ही एक केवळ बाह्य घटना होती व त्यांचा जीवात्मा भारतीयच होता. पुरातन कालच्या कोणत्या तरी ऋषीच्या जीवात्म्यानें हा अवतार धारण केला होता असें वाटतें. त्याचा हा विचार असावा, कीं पाश्चात्य जीवनांतून चैतन्य ग्रहण करून नंतर पूर्वीच्याच वातावरणांत पूर्वीच्या आपल्या बांधवांचीच सेवा करावी. ”

—*सुरेंद्रनाथ बानर्जी*

* * *

“ भ० निवेदितांची विचारसरणी महिलाजीवनापुरतीच मर्यादित नव्हती. इतरांबद्दल त्यांना जी सहानुभूति वाटत होती तिचें क्षेत्र भारताइतकें विशाल होतें. भारताचें आध्यात्मिक, सामाजिक, राजकीय, वाङ्मयात्मक व पुराणकालीन हितसंबंधांकडे-सुद्धां त्यांचें लक्ष होतें. त्यांचा मुख्यतः हिंदुधर्माशींच जास्त संबंध येत होता तरीपण इस्लामचें सामर्थ्य व महत्त्व याचीसुद्धां त्यांना जाणीव होती व बुद्धधर्माबद्दल त्या विवेचन करीत तें ऐकून तर कोणालाही असें वाटे कीं त्या बुद्धधर्मीयच आहेत. ”

—*फ्रेजर ब्लेअर*

* * *

“ भारतानें पूर्वकाळीं अनेक महान् तत्त्वांचा अंगीकार केला होता व भगवंताची कृपा असेल तर तो भविष्यकाळींही इतर

महान तत्त्वांचा अंगीकार करील. पण भ. निवेदिता यांनीं हीं महान् तत्त्वेंच फक्त स्वीकारलीं असें नाहीं. दोष व उणीवा यांसहित जसा भारत आहे तसाच त्यांनीं स्वीकारला. असें करतांना आमच्या खडतर जीवनांतील अडचणी, आमचें अज्ञान, आमचा धर्मभोळेपणा व आमचें अस्वच्छ जीवन यापैकीं कशानेंही त्यांचें पाऊल मागें पडलें नाहीं. आश्चर्याची गोष्ट हीच कीं त्यांनीं भारताचा संपूर्णतया स्वीकार केला व याचें महत्त्व शब्दांनीं वर्णन करतां येणार नाहीं."

— *नामदार गोखले*

* * *

"भ. निवेदितांचें व्यक्तिमत्व आश्चर्यकारक होतें व जगाचें भलें व्हावें अशी त्यांची निरपवाद इच्छा होती. त्यांच्या निधनानें जग जास्त निराधार झालें आहे."

—*लेडी मिंटो*

* * *

"आत्मनिवेदन ही सर्वांत उच्च प्रकारची भक्ति होय असें हिंदु धर्मग्रंथांत सांगितलें आहे. कु. मार्गारेट नोबल् यांनीं स्वामी विवेकानंदांचें शिष्यत्व पत्करलें व ईश्वर, मानववंश आणि भारत यांच्या सेवेप्रीत्यर्थ आत्मसमर्पण केलें तेव्हां भ. निवेदिता हें यथायोग्य नांव त्यांना देण्यांत आलें. श्रद्धा व अनुकंपा यांच्या जोरावर त्यांना भारतीय जीवनांतर्गत सूक्ष्मतत्त्वांचें ज्ञान करून घेतां आलें व पाश्चात्य राष्ट्रांना तें विशद करून सांगतां आलें."

*सॉलिसिटर बा. गं. खेर*

* * *

"अखिल जीवसृष्टीमध्यें एकत्व (अविभक्तपणा) आहे याची भगिनींना प्रचीति आली होती व त्याचें हें वैशिष्ट्य कोणाचेंही नजरेस आल्याशिवाय राहात नाहीं. अखिल जगांतील मानवी जीवन अविभाज्य आहे अशी अनुभूति त्यांना प्राप्त झाली होती. त्या स्वत:ची दृष्टि अंतर्मुख राखून आत्मस्वरूपाशीं एकरूप होत असत व ज्यांच्यांशीं त्यांचा परिचय होत असे त्यांनाही अंतर्मुख दृष्टि ठेवून अंतरात्म्याची ओळख करून घेण्यास त्या प्रवृत्त करीत असत. यामुळें आपण कोणत्याही प्रकारचा त्याग करीत नसून स्वत:चेंच आत्मिक बळ वाढवीत आहों अशी त्यांना प्रचीति प्राप्त झाली होती."

— एच्. एस्. पोलक

—×—×—

स्वलक्षत.
अनुक्रम ३१८०३ वि: चरित्र
क्रमांक १०२६ नों: दि: ४/१/८२

# प रि शि ष्ट

## अ. निवेदितांचें ग्रंथरूपी वाङ्मय

1. The Master as I saw Him.
2. Web of Indian life.
3. Civic and national ideals.
4. Cradle tales of Hinduism.
5. Notes on some wanderings with Swamiji.
6. Kali the mother.
7. Hints on national education in India.
8. Kedarnath and Badri Narayan.
9. Footfalls from Indian History.
10. Religion and Dharma.

Booklets—

11. Lambs among wolves.
12. Aggressive Hinduism.

Incomplete works—

13. Shiva and Buddha.
14. Myths of the Hindus and Buddhists.

# विषयसूचि


अकबर ६०
अजिंठा ९२
ॲडलवर्ट, रेसिडेंट ४३
अतिदिव्यशक्ति ७२
अद्वैतधर्म १९
अमरनाथ ४०
अरविंद घोष ४६, ७३, ८१, ९४, ९९, १००, १०२, १०३, १२१
अलेक्झांडर, जे. एफ्. ११९
अवनींद्रनाथ टागोर ९२
असितकुमार ९२
अहंकार ४३, ८८
अच्छाबल ४१
आत्मबलिदान ७३
आध्यात्मिक उन्नति ५८
इंग्रज, जेता २१
इंग्रजी भाषा २०, ११४
इंग्लिश व्यक्ति २९
इतिहास, भारताचा ११०
उखीमठ १०८
उपनिषद् संदेश ५९
उरुवेल ९१
ओल्बुल् ४०, ४१, ५०, ९८, ११३
कन्याशिक्षण ४९
कर्झन्, लॉर्ड् ६६, ६७, ८९
कर्णप्रयाग १०८
कर्मयोगिन् पत्र १०१
कार्य ९७
कार्यक्षेत्र ८७
काली–माता ३४, ४५, ५३, ५४
काश्मीर मठयोजना ४३
काश्मीर सहल ४०, ४१
कुरुक्षेत्र ८५
केदारनाथ १०४, १०७
कोटद्वारा १०८
खुकी ( छोकरी ) ५२
खंडगिरि ७०
खेर, सॉलिसिटर १२३
गाजावाजा ८८
गुड्विन् २७, ३७
गुप्तसंघटना ७९, ८०, ८१, ८२
गुप्तकाशी १०७
गुलाब–मा ५६
गोखले, नामदार ८१, ९०, १२३
गोपालेर–मा ५५, ८२
गोरा ( कादंबरी ) १६
गोरेलोक ६०
गौतमबुद्ध ६०
गौरीकुंड १०७
गंगा १०६
घंटाकर्ण १०९
चटणी-काली ६२
चतुःसूत्री ८९

जगदीशचंद्र बोस ३४, ६१, ६३
८२, ९०, १०४, ११४
जदुनाथ सरकार ८१, १२०
जोशीमठ १०८
टाइम्स्, लंडन् १२१
टिळक, लोकमान्य ७३, ८१, ८३
८४, ९०
त्रिजुगी नारायण ११०
त्याग ८७
दडपशाही ९९
दादाभाई नौरोजी ८४, ९०
दिखाऊपणा ८८
दिल्ली ४७
दिल्ली-दरबार ७८
दिव्यज्ञान २६, ६५
दुष्काळ, प्रचंड ८०
देऊसकर ८३
देवप्रयाग १०७
देशमुख बॅरिस्टर ७४
देहाचें मरण, अर्थ ११५
धर्म, खिस्ती ४२
धर्म, मुसलमानी ४२
धर्म, वैदिक ४२, ७०
धर्म, बौद्ध ४२
धर्मग्रंथ–बुद्धिवाद २४
धीरामाता ४०
ध्यान, देहभाव ४४
ध्येय ८७
नचिकेता ११२
नाम-जप ५९
नालंदा–अवशेष ९१
**भगिनी निवेदिता**
अखंड कार्य ९५
अंतकाळ शब्द ११६
अद्वैततत्त्व १९
अरविंद–भेट ७४
आईची अखेर भेट ९९
आजारीपण ८२
आयर्लंड–स्वातंत्र्य ६६
आयुष्याचा अंत १०४, १०६
इंग्लंड–प्रचार ६६
ईश्वरार्पण, १८, ४६
कन्येचें नातें ५८, ७७
कलकत्ता–जीवन ५१
कालीमाता ६४
काली–वाहन ५६
ग्रंथरूपी वाङ्मय १२५
चर्चेचें तंत्र ३९
चर्चेचे विषय ३८
जन्म १८
जागृति, राजकीय ७३
जीवनाचे पैलू ८३
दगडविटा ९१
दत्तक जाणें १४, ३२
दार्जिलिंग–गमन ११४
दिव्यशक्ति ९३
देहयष्टि–झीज ५२, ९५
धर्मग्रंथकथा १८
नदी–पूजा १०६

भगिनी निवेदिता
नागपूर कॉलेज ७४
पौर्वात्य संस्कार ३८
प्रेरणा घेणें ८६
ब्रि. राज्यकर्ते ६६
भगवंताचें वचन ११५
भारतसेवा १९, २७
मद्रास—दौरा ७७
मद्रास—महिला ७५
महासती सावित्री १६, ३०
मानव्य—माहात्म्य १६
रामकृष्ण मिशन ७३, ७८
वडील १८, २९
वाङ्मय ८८, ८९
वारसा १८
विचार—आक्रमण ३६
विवेकानंद सोसायटी ७५
विस्तृत कार्यक्षेत्र ५१
शारदामाता ११३
शिल्पवस्तु १०८
शिक्षिका १८
संपूर्ण निवेदन १५
संस्कृति—संशोधन १०९
समाजसेवा ५१
सुशिक्षित विद्यार्थी ७४, ७५
सेवाभाव, ६९
समाधि—अनुभव ३६
सोसेम् क्लब १८
स्वामीजी शिकवण २२

भगिनी निवेदिता
स्वामीजी अखेर भेट ६८
स्वामीजी—शुभेच्छा ६४
हस्ताक्षर ११३
नोबल्, मार्गारेट १४, १८, २१, २७, २८, २९, ३२
नंदलाल बोस ९२
परब्रह्मन् १०६
पारतंत्र्य जाणीव १३
पार्श्वभूमि, चरित्राची १३
पिपलकोटी १०८
पेहेल्गांव ४०
पैसा ९६
पॉलमॉल गॅझेट १२१
पोलक, एच्. एम्. १२४
पाडी १०८
प्रेम, निःस्वार्थी २३
प्लेग, कलकत्ता ३३
फ्रेझर ब्लेअर १२२
बद्रीनारायण १०४, १०८
बारींद्र ८४
बिपिनचंद्र पाल ८१, ८४, १२०
बुद्धगया ८२, ९१
बेलूर-मठ ३२, ५०
बोस, लेडी अबला ३५, ५१, ५२, ११९
बोस-युद्ध १०५
बंकीपूर-संघटना ८२
बंकीमचंद्र ८४
बंगाल फाळणी ८९

बंगाल-महाराष्ट्र ८३
ब्रह्मज्ञान २५, २६
ब्रह्मचर्य ७६
ब्रि. साम्राज्य १३
भगवद्गीता ८५
भगिनी ख्रिस्टिन् ७९
भरतभूमि ३८, ५३, ५४
भारत १३, ६१, ६६, ७३, १११
११२
भारतीय महिला ७५
भुवनेश्वरी देवी ११४
भूमाता देणग्या ७७
भौतिक शास्त्रें २४
भ्रमण, सद्गुरु ४८, ५८
महत्त्वाकांक्षा ८८
महात्मा गांधी-भेट ६७
महानिर्वाण १०७
मॅक्लेऑड् (कुमारी) ४०, ४१
माताजी महाराणी ४९, ५०
मानवी जीव ११६
मानवी मनःसामर्थ्य २२
मायाममता ३०
मिंटो, लॉर्ड् ९८, ९९
मिंटो लेडी १०३, १२३
मुलर, कुमारी २७, ५०
मृग-जळ २४
मोतीलाल घोस १२०
मोर्ले-मिंटो सुधारणा १००
मोहोर, पूजेसाठीं ४६
येशू ख्रिस्त ७०
योगप्रगति ६०
योगिन–मा ५६
यंत्रयुग ७९
रमेशचंद्र दत्त ८१
रवींद्रनाथ टागोर १५, ९०, ११८
रॅटक्लिफ्, एस्. के. ११९
राजकीय चळवळ ७९
राजकीय दास्य ८०
राजकीय जागृति ८०
राजयोग २०
राणी, हिंदुस्थानची १४
रामकृष्ण मिशन् ७०, ७३, ७८
रामानंद चतर्जी १२०
रासबिहारी घोष ८१, १२२
राष्ट्रधर्म ८६
राष्ट्रीयशाळा १४, ४९, ६८
राष्ट्रीय जीवन ८६
राष्ट्रीय सभा ८३, ९०, ९९
रुद्रप्रयाग १०७
लक्ष्मी दिदी ५५
लाल-बाल-पाल ८४
लाला लजपतराय ८४, ९९
वज्र–चिन्ह ९०
विश्वदेवालय ३१
विष्णुप्रयाग १०८, ११०
वेड्यांचा बाजार ६२
वंदेमातरम् ८४
शांतता (राष्ट्रांतील) १००, १०३

भगिनी

स्थळप्रत.

शारदामाता ५२, ५४, ११२
शिवपिंडी १०९
शिष्याची अवस्था ५९
श्रीनगर ४१, १०८
श्रीरामकृष्ण परमहंस ५४
सतीचा आदर्श ७५
सरकारी धोरण ७९
सहल, शैक्षणिक ३५
सहानुभूतीची भावना ७६
सानेगुरुजी ८६, १२१
सामर्थ्य—अप्रतिकार ५९
सुजाता ९१
सुधीरा बोस ७९
सुप्त सामर्थ्य २३
सुरेंद्र गांगुली ९२
सुरेंद्रनाथ बानर्जी ८३, १२२
सूर्य ( ब्रि. साम्राज्यावरील ) १३
सेव्हियर दांपत्य २७
सोऽहम्, आवाज ४०
संप्रदाय-स्वातंत्र्य २३
संस्कृति, हिमालयीन १०५
स्त्री कार्यकर्ती ८५
स्वदेशी-प्रसार ८९
स्वधर्म व स्वदेश ७६
स्वराज्य ८३
स्वामी तुरियानंद ५५
स्वामी विवेकानंद १५,१७, २०,२२, २८, ३९, ५२, ५६, ५७, ६०, ६३, ६८, ६९, ९२, ११३, ११८
स्वामी शंकरानंद ९०
स्वामी सदानंद ९०
स्वामी स्वरूपानंद ३२
हरद्वार १०७
हॅमल्टन्, डॉक्टर ८७
हिंदु-मुस्लीम एकी ४२
हृषीकेश १०७
क्षीरभवानी ४५
ज्ञान २५

REFBK-0011591
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११५९१

# आधारभूत वाङ्मय ( संदर्भ ग्रंथ )


1. The Master as I saw Him — Sister Nivedita.
2. Some wanderings with Swamiji — Sister Nivedita.
3. Kali the mother — Sister Nivedita.
4. Kedarnath and Badrinarayan — Sister Nivedita.
5. Sister Nivedita — Monie Bagchee.
6. Letters of Swami Vivekananda — Advaita Ashram Mayawati.
7. Disciples of Ramakrishna — Advaita Ashram Mayawati.
8. History of Ramakrishna Math and Mission — Advaita Ashram Mayawati.
9. Prabuddha Bharat Magazine — Advaita Ashram Mayawati.
10. Yogi Aurobindo — Shri R. R. Diwakar.
11. Mind and heart of India — Shri B. M. Gore.
12. The Ideal of Karmayogin — Shri Aurobindo.
13. स्वामी विवेकानंद समग्र ग्रंथ – कर्नाटक पब्लिशिंग हाउस
14. स्वामी विवेकानंद – रामकृष्ण आश्रम, नागपूर
15. सत्याचे प्रयोग – महात्मा गांधी
16. राष्ट्रधर्म – भ. निवेदिता; अनुवाद – सांने गुरुजी
17. कालसमुद्रांतील रत्नें – ब्रॅ. गो. वि. देशमुख
18. नामदार गोखले चरित्र – श्री. पां. स. साने



क्रमांक .... नोंद दि: ......